१ डिसेंबर ८८

## शि व रा ज

कथा कविता स्पर्धा - ३६ प्रशस्तीपत्रके असलेली भव्य स्पर्धा!

३० डिसेंबर ८८

## 'शि वां ज ली'

भित्तीपत्रकाचे उद्घाटन स्वामीकार रणजित देसाई यांच्या हस्ते.

३० डिसेंबर ८८

## ज्यु नि अ र

कॉलेज नामकरण समारंभ संपन्न मा. खासदार बाळासाहेब माने, श्रीमंत शाहू महाराज, स्वामीकार रणजित देसाई, आ. श्रीपतराव शिंदे यांची उपस्थिती.

## प्रौढ शिक्षण

प्रौढ शिक्षणाचे ५ वर्ग मोठ्या उत्साहात सुरु झाले.

## N. C. C.

उज्वल यश क्रॉसकंट्री प्रथम- बायोनेट फायटिंगमध्ये दुसरा क्रमांक.

१८ मार्च ८९

## प्लॅ निं ग

फोरमतर्फे पंचवार्षिक योजनावर आधारित प्रदर्शन भरविले. अत्याळ खेडे दत्तक.

२८ ऑगष्ट ८८

## र क्षा बं ध ना चा

कार्यक्रम विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्साहात सहभागी.

## हुं डा बं दी

समितीची स्थापना- हुंडा न घेण्याविषयी अनेकांच्या प्रतिज्ञा.

## शि व रा ज

विद्यार्थिनीची पोलीस सब. इन्स्पेक्टर म्हणून निवड.



## ग्रं था ल य

इमारतीचे बांधकाम सुरू होणार.

१ मार्च ८९

## स त्का र

सूर्याचा अस्त - महाराष्ट्राचे नेते वसंतरावदादांचे दुःखद निधन.

## क र्ती

सुधारक हरपला! - महाराष्ट्राचे आचार्य, सुधारकांचे अग्रणी गं. बा. सरदार यांचे दुःखद निधन.

१ एप्रिल ८९

## सं यु क्त

महाराष्ट्राच्या चळवळीचे शिल्पाचार्य एस्. एम्. जोशी यांचे कर्करोगाने निधन.

## पु. ल. देशपांडे

माना कै. रा. म. गडकरी पुरस्कार प्राप्त.

## कॉ म्प्यु ट र ची

खरेदी - शिवराज महाविद्यालयात कॉम्प्युटर खरेदी.

## 'उ च ल्या' ला

आत्मकथनात्मक पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार!

## ७५० ग्रॅम

वजनाचा पेढा!




## ज्ञा न पी ठ

पारितोषिक वि. वा. शिरवाडकरांना यंदाचे ज्ञानपीठ पारितोषिक 'हा तर पारितोषिकाचा बहुमान!'

सर्वात मधुर स्वर
ना मैफलीतील गाण्याचा
ना पहाडातून झरणाऱ्या पाण्याचा
ना सागराचा ना कूजनाचा
ना आमंत्रक ओठातील हसण्याचा,
सर्वात मधुर स्वर
कोठे तरी
कोणाच्या तरी
मनगटावरील शृंखला
खळळ्ळ्या तुटण्याचा!

# शिवराज ८९



अनिल शिवूडकर
बि.ए.२



प्रकाश जाधव
बि.ए.२



सुनील जाधव
बि.कॉम.१



जयसिंग पाटील
बि.एस्सी.२



दीपक शिवणे
बि.ए.१



टी. के. पाटील
बि.ए.१



आबाजी जाधव
बि.कॉम २



दिनकर पावणे
बि.कॉम.२



दयानंद खोराटे
बि.कॉम.१



प्रतापसिंह नलावडे
बि.एस्सी.१



एन्. ए. पाटील
बि.एस्सी.२



आर. डी. पाटील
१२ वी, कला.



टी. ए. शिंदे
१२ वी, कला.



महेंद्र चव्हाण
११ वी, कला.



कृष्णा पंडित
११ वी, वाणिज्य.



मदन पाटील
११ वी, शास्त्र.



विजय शिंदे
११ वी, शास्त्र.



व्ही. एम. कोचरी
११ वी, शास्त्र.

## वर्ग प्रतिनिधी

# शिवराज ८९

## रौप्य महोत्सवी वर्ष

(१९६४–८९)



# शिवराज ८९

## संपादक समिती

**अध्यक्ष**
मा. प्राचार्य डी. व्ही. तोगले

**प्रमुख संपादक**
प्रा. सुधीर चिं. जोशी

**सदस्य**
प्रा. बी.एम.कुलकर्णी
प्रा.सौ. एस्.ए.मजुमदार
प्रा. पी.डी.सावंत
प्रा. के.आर.पाटील
प्रा. एम.बी.महाजन
प्रा. एस.डी.पाटील
प्रा. अनिल गवळी

**विद्यार्थी प्रतिनिधी**
श्री. सागर पाटील

**छायाचित्रे**
श्री. मारुती चव्हाण

**मुखपृष्ट**
श्री. अशोक सुतार

**मुद्रण**
एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स,
बेळगांव.

**जाहीरात विभाग**
प्रा. एम.बी.पाटील (प्रमुख)
प्रा. पी.बी.पाटील
प्रा. व्ही.बी.कुरळे.

**इमारत बांधकाम समिती**

| | | |
|---|---|---|
| मा. डी.एस्.कदम | — | अध्यक्ष |
| मा.प्रि.डॉ. डी.व्ही.तोगले | — | सेक्रेटरी |
| मा. के.जी.पाटील | — | सदस्य |
| मा. शं.बा.चव्हाण | — | सदस्य |
| मा. रामभाऊ चव्हाण | — | सदस्य |
| डे.इंजिनिअर बी.अँन्ड.सी.गड. | — | सदस्य |
| प्रतिनिधी फॅन्सी डिझाईन, कोल्हापूर | — | सदस्य |
| मा. बी.एस्.मोहिते | — | अकौंटंट |



कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

अध्यक्ष



मा. खासदार बाळासाहेब माने

उपाध्यक्ष



मा. डी. एस् कदम



मा. डॉं डी.व्ही. तोगले

# मनोगत

प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले.

गेली पंचवीस वर्षे ज्ञानदानाचे काम करणारे आमचे महाविद्यालय रौप्य महोत्सवाच्या उंबरठ्यावर उभे आहे. जूनमध्ये या रौप्यमहोत्सवाची मंद झुळूक जाणवली व पुन्हा एकदा आम्ही अधिक वेगाने व तितक्याच दमदार निष्ठेने या वर्षीच्या उपक्रमात झोकून दिले. दोन तपांचा काळ नजरेसमोरून गेला. ज्यांनी या महाविद्यालयाला आकार दिला, त्यांची प्राण प्रतिष्ठा केली, त्या सर्व पूर्वसुरींबद्दल मनोमन कृतज्ञता आम्ही सदैव बाळगली आहे.

एका बाजूला कर्मवीर शिंदे, दुसऱ्या बाजूला छत्रपती शिवराय तर पुढे विज्ञान शाखेचे झेपावणारे गरूडपंख माझ्या नजरेसमोर आहेत. गडहिंग्लज शहराचे नागरी जीवन संपन्न व समृध्द करणारे शेकडो विद्यार्थी 'शिवराज' ने पुरविले आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण साहित्याच्या तिसऱ्या पिढीचे नेतृत्व शिवराजच्या विद्यार्थ्यांकडे जाते हीच तर आमची खरी कमाई आहे.

मुंबई महानगरपालिकेपासून केंद्रीय नियोजन मंडळापर्यंत आमचा विद्यार्थी स्वतःची 'शिवमुद्रा' उमटवीत आला आहे. गेल्या पंचवीस वर्षात गडहिंग्लज तालुक्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक परिवर्तनाचे केंद्र ही भावना व भूमिका कायम ठेवून शिवराजने योगदान दिले आहे. आजही आपापल्या खेडेगावचा चेहरामोहरा बदलणारा विद्यार्थी 'शिवराजने आम्हाला घडवले' असे म्हणतो तेव्हा उर अभिमानाने भरून येतो.

प्रारंभीच्या काळात गडहिंग्लज, आजरा व चंदगड या तिन्ही तालुक्यांचा त्रिवेणी संगम इथे झाला. शैक्षणिक विश्वाबाहेरच्या जगाचे दर्शन घडवणाऱ्या कर्त्या व जाणत्या विचारवंतांनी सुसंस्कृत व ग्रामीण युवकाबरोबरच डोळस विद्यार्थी घडवण्याचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नांचे बघता बघता गेंदिदार वृक्षात रूपांतर झाले आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व पुरोगामी विचारधारेचे प्रतीक मा. खा. बाळासाहेब माने यांच्या खंबीर व समर्थ नेतृत्वाने प्रत्येक वर्षी या महाविद्यालयाला अनेक अंगांनी श्रीमंत केले आहे. ७ लाख रूपयांची प्रासादतुल्य वास्तु हीच तर आमची रौप्य महोत्सवी वर्षाची खरी भेट होती. त्याचबरोबर ग्रंथालयासाठी यु. जी. सी. ने जाहीर केलेली मदत म्हणजे सुवर्ण-कळसच होय. हे महाविद्यालय 'सरस्वती महाल' म्हणूनच ओळखले जाते. अर्थात मंदिराचे पावित्र्य टिकवण्याची व जोपासण्याची जबाबदारी सर्व संबंधित घटकांची आहे.

वास्तुशांती समारंभ, कनिष्ठ महाविद्यालयाचा कै. संभाजीराव माने कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, कोल्हापूरचे छत्रपती श्रीमंत शाहू महाराज, आ. दिग्विजय खानविलकर, मा. विश्वासराव धुमाळ, साहित्यिक रणजीत देसाई, यांच्या उपस्थितीत पार पडलेला समारंभ खरोखर संस्मरणीय होता.

पंचवीस हजार निलगीर-वृक्ष लागवड हा संकल्प एन. एस. एस. विद्यार्थ्यांच्या सहाय्याने पूर्णत्वास गेला.

अभ्यास, क्रीडा, अभिनय, नेतृत्व या सर्व क्षेत्रात भव्य दिव्य करू पाहणारी तेजस्वी पिढी आम्ही राष्ट्रांच्या चरणी अर्पण करू! कर्मवीर वि. री. शिंदे शिक्षण संस्था या नावाला परिमाण प्राप्त करून देण्याचा प्रयत्न नेहमीच आम्ही केला आहे.

प्रथम श्रेणीतल्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या, स्पर्धा, परीक्षेची तयारी, हे लक्षात घेवून विशेष मार्गदर्शन विभाग अस्तित्वात आले आहेत.

गेल्या दोन वर्षात अनेक व्यक्तींना तोंड देत, हे महाविद्यालय तिन्ही तालुक्यातील आम जनतेच्या सहकार्याने वाढत्या संस्थेने व जाणीवेने संपन्न व समृध्द होत आहे. पुढे येणाऱ्या पंचवीस वर्षांचे भान ठेवूनच आम्ही कार्यरत राहू! शब्द छापता येतात. भावना नव्हे. तरी सुध्दा हे महाविद्यालय आपल्या जन्मापासूनच्या संकल्पापासून दूर जाणार नाही. शिक्षणसंस्था ही राष्ट्राची श्वसनसंस्था असल्याने राष्ट्राचे स्पंदन समजण्याचे तेच एक स्थान आहे. समाजाला डोके टेकवण्यासाठी काही 'पाय' ही असतात. तर काही वेळा विवेक बुध्दीचे रखवालदारही ( Conscience-keepers ) असतात. याचे भान ठेवून आम्ही हाती घेतलेले व्रत व वसा विसरणार नाही याची ग्वाही शिवराज परिवाराच्या वतीने मी पुनश्च देत आहे.

# श्रध्दांजली



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
वसंतरावदादा पाटील

थोर विचारवंत–गं.बा.सरदार
स्वातंत्र्य सेनानी–एस.एम.जोशी

साहित्यिक–श्री. ज.जोशी
समीक्षक–रा.श.वाळिंबे
सोबतकार–ग.वा.बेहरे
हिंदी साहित्यिक–जैनेंद्रकुमार
कमलादेवी चट्टोपाध्याय
कवी–नरेंद शर्मा
उर्दू कवी–इकबाल महमद खान
कन्नड नाटककार–वणी
'ग्रेट शोमन' राजकपूर
चित्रपट निर्माता–माधव शिंदे
संगीत दिग्दर्शक–एम.बी.श्रीनिवासन्
न्यायमूर्ती–एम.एम.बेग
पत्रकार–पी.बिहारी सन्याल
क्रिकेट समालोचक–जे.डी.मेहता
विरोधी पक्षनेते–कृष्णराव धुळुप
मधुसूदन वैराळे
राष्ट्रीय बॉडमिंटनपटू–सय्यद मोदी
पुरातत्व शास्त्रज्ञ ह.धि.सांखलिया
अभिनेत्री–रत्नमाला
माजी नगराध्यक्ष–दादा पेडणेकर.
क्षानपीठ विजेते गुजराथी साहित्यिक–पन्नालाल पटेल





# संपादकीय

शिवराज या वार्षिकाच्या संपादनाचे काम स्वीकारत असताना कामाच्या ओझ्याची जशी चटकन जाणीव झाली तशीच हे चालू वर्ष महाविद्यालयाचे २५ वे वर्ष आहे, रौप्यमहोत्सवी वर्ष आहे हेही लक्षात आले. रौप्यमहोत्सवी वर्षाचे वार्षिक आपल्या संपादकत्वाखाली प्रकाशित होणार याबद्दल आनंदही झाला आणि हा मला माझा बहुमानही वाटला. वार्षिक संपादनाच्या कामाला यंदा अधिकच उत्साहात सुरूवात झाली. संपादक मंडाळाच्याही आपल्या पातळीवर साहित्य, मजकूर जमविण्याच्या हालचाली सुरू झाल्या. याच वेळेला मायबोली मराठीला साहित्यातील सर्वोच्च बहुमान मिळाला. वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज यांना यंदाचे ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले! यंदाचा अंक हा कवी कुसुमाग्रजांच्या विचारांनी, त्यांच्यावरील लेखांनी खुलवावा, सजवावा असे मनात विचार येत होते. ह्या दिशेने काही वाटचाल होत होती. कुसुमाग्रजांना मिळालेले पारितोषिक हे सर्व महाराष्ट्राच्या आनंदाचे कारण होत असताना आपणही आपला आदर विद्यार्थ्यांसह वार्षिकाच्या माध्यमातून व्यक्त करावा असे वाटत असतानाच आनंद सागरात बुडालेल्या या महाराष्ट्रावर अशुभ आघात होत गेले आणि यातून कोणत्याही क्षेत्रातला निखळ आनंद उपभोगणे किती दुरापास्त असते याचा त्रिवार प्रत्यय आला.

सुरूवातीला महाराष्ट्राचे आचार्य, थोर विचारवंत, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक, संतसाहित्यातील सामाजिकतेचे दर्शन घडविणारे कृतीशील समाजसुधारक श्री गं. बा. सरदार यांचे दुःखद निधन झाले. या धक्क्यातून साहित्य क्षेत्रातील आणि सामाजिक क्षेत्रातील इतर विचारवंत, कार्यकर्ते सावरतात न सावरतात तोच महाराष्ट्राच्या क्षितिजावरील सहकार सूर्याचा अस्त झाला! महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री वसंतदादा पाटील यांचा देहान्त झाला. महाराष्ट्राच्या सामाजिक, वैचारिक आणि राजकीय क्षेत्राला आकार आणि रंग देणारे दोन 'कर्ते' पुरूष काळाआड लुप्त होत असतानाच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील भीष्माचार्य थोर स्वातंत्र्य सेनानी आणि प्रखर समाजवादी नेते श्री एस्. एम्. जोशी यांचे देहावसान झाले!

राष्ट्र जीवनातील समरात स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना किंकर्तव्य मूढ करणाऱ्या आणि विचारी माणसाला क्लेश देणाऱ्या घटनामुळे मन सुन्न झाले. महाराष्ट्र निराधार झाला. कुसुमाग्रजांच्या यशाने फुलून आलेला महाराष्ट्रीयांचा आनंदकंद या नियतीच्या निर्दय आनंद भोगण्याच्या क्रियेने तत्काल सुकून गेला. आनंद डोंगराएव्हढा आणि दुःखही डोंगराएव्हडे असा न भूतो न भविष्यती प्रसंग महाराष्ट्राच्या जीवनात क्वचितच आला असेल!

या आनंदाचे, दुःखाचे साद महाराष्ट्राच्या साहित्यिक, सामाजिक, राजकीय जीवनावर उमटत असतानाच संवेदनशील अशा आमच्या विद्यार्थीवर्गावर व विचारी प्राध्यापकांवर आणि कर्मचाऱ्याच्या ठाई हे पडसाद अपरिहार्यपणे उमटत होते. आणि याचे परिणाम माझ्या संपादन कार्यावरही होत होते.

या वार्षिकाच्या निमित्ताने रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयाच्या पुढील उज्वल भविष्याविषयीची स्वप्ने पहात असतानाच आणि त्यानिमित्ताने काही गतकालीन आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करीत असतानाच महाराष्ट्राच्या थोर पुरूषांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करणे हे माझे कर्तव्य ठरते.

या वार्षिकाचे संपादन करीत असताना आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डॉ. डि. व्ही. तोगले सर, कार्यालय अधिक्षक जयंत सबनीस व त्यांचे सहकारी, संपादक मंडळातील माझे सर्व सहकारी, जाहिरात विभागाचे प्रमुख आणि सदस्य तसेच या वार्षिकाच्या निमित्ताने लिहिते झालेले विद्यार्थी यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले आहे.

धन्यवाद!

**प्रा. सुधीर चिंतामण जोशी**
प्रमुख संपादक

## प्राध्यापक वर्ग



## संपादक समिती



## प्रशासन विभाग



# प्राध्यापक वर्ग १९८८-८९

**इंग्रजी विभाग**

प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले
प्रा. के. बी. केसरकर
प्रा. जी. जी. गुळवणी
प्रा. एन. आर. सावंत
प्रा. सौ. एस. ए. मुंजूमदार
प्रा. आर. बी. कांबळे
प्रा. के. ए. सावेकर

**मराठी विभाग**

प्रा. बी. बी. देशमुख
प्रा. व्ही. एस. बन्ने
प्रा. सुधीर जोशी
प्रा. ए. बी. कुंभार
प्रा. व्ही. एम. सुरंगे
प्रा. ए. मी. गवळी

**हिंदी विभाग**

प्रा. डॉ. एस. जी. गोकाककर
प्रा. डॉ. के. आर. पाटील
प्रा. एम. बी. महाजन

**अर्थशास्त्र विभाग**

प्रा. ए. ए. पवार
प्रा. डी. आर. खटके
प्रा. एन. बी. जाधव
प्रा. सौ. एन. के. चव्हाण
प्रा. पी. वाय. निंबाळकर
प्रा. सौ. एस. वाय कोले
प्रा. एस. एस. येळेकर

**समाजशास्त्र विभाग**

प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड
प्रा. के. व्ही. कुराडे
प्रा. एम. आर. धनगर
प्रा. एम. बी. पाटील.

**राज्यशास्त्र विभाग**

प्रा. पी. डी. सावंत
प्रा. एस. बी. भोळे
प्रा.सी. ई. घुमाळ

**मानसशास्त्र विभाग**

प्रा. बी. के. सोरटे
प्रा. व्ही. बी. सकटे
प्रा. एस. एस. क्षीरसागर

**शारीरिक शिक्षण विभाग**

प्रा. ए. एस. नाळे
प्रा. एस. एस. सावंत

**वाणिज्य विभाग**

प्रा. सी. एस. गवसणे
प्रा. एन. डी. खिचडी
प्रा. आर. बी. तेली
प्रा. आर. एन. हारगुडे
प्रा. एम. ए. बामणे
प्रा. पी. बी. पाटील
प्रा. वाय. पी. कोले
प्रा. एस. बी. कडूकर

**रसायनशास्त्र विभाग**

प्रा. टी. एन. पाटील
प्रा. डॉ. पी. जी. मोरे
प्रा. टी. एन. पवार
प्रा. बी. जे. देसाई
प्रा. बी. बी. जमदाडे
प्रा. एस. डी. पाटील
प्रा. बी. ए. पाटील
प्रा. व्ही. बी. कुरळे
प्रा. पी. एम. भोईटे
प्रा. एस. एच. रावण

**फिजिक्स डिपार्टमेंट**

प्रा. एस. ए. जोडगुद्री
प्रा. आर. बी. खामकर
प्रा. बी. डी. मुरगी
प्रा. एम. पी. पाटील
प्रा. बी. एम. कुलकर्णी
प्रा. एस. एम. कदम
प्रा. ए. वाय. पाटील
प्रा. बी. डी. पाटील
प्रा. एस. पी. गुरव

**संख्याशास्त्र विभाग**

प्रा. डी. एम. म्हेतर
प्रा. आर. के. देशपांडे

**गणित विभाग**

प्रा. डी. जी. वाठोरे
प्रा. एन. एम. गरूड

**प्राणीशास्त्र विभाग**

प्रा. सौ. यु. आर. कणसे
प्रा. आर. एन. कणसे
प्रा. के. एस. पुजारी

**वनस्पतीशास्त्र विभाग**

प्रा. डॉ. एस. वाय. कोतमिरे
प्रा. डॉ. एस. के. नेर्ले
प्रा. जे. व्ही. सरतापे

**जीवशास्त्र**

प्रा. पी. टी. कट्टी

# प्रशासकीय कर्मचारी १९८८-८९

**कार्यालयीन अधिक्षक**

श्री. जे. ए. सबनीस

**ग्रंथपाल**

श्री. टी. ए. पाटील

**वरिष्ठ लिपिक आणि अकौंटंट**

श्री. बी. एस. मोहिते

**वरिष्ठ लिपिक**

श्री. व्ही. एम. गवळी
सौ. पी. बी. सावंत

**लिपिक**

श्री. बी. डी. रेंगडे
श्री. वाय. डी. पाटील.
श्री. बी. एस. सावंत
श्री. डी. एम. मोरे

**प्रयोगशाळा मदतनीस**

श्री. डी. जी. रेंदाळे
श्री. आर. बी. आयरनाईक

**शिपाई**

श्री. बी. आय. रामपुरे (वरिष्ठ शिपाई)
श्री. एस. एस. गवळी
श्री. पी. के. जाधव
श्री. सी. एल. गोरूले

**लायब्ररी अटेंडंट**

श्री. ए. जी. कदम
श्री. एम. एच. देसाई
श्री. एन. एस. पवार
श्री. एस. बी. गुसळे
श्री. आर. एम. अत्तार (डेली वेजिस)
श्री. एम. बी. माने (डेली वेजिस)
श्री. एस. एस. हजारे (डेली वेजिस)
श्री. एस. एम. मोरबाळे (डेली वेजिस)

**लॅब अटेंडंट**

श्री. पी. जी. पोवार
श्री. बी. डी. मोरे
श्री. एम. जी. खोत
श्री. एस. डी. पाटील
श्री. टी. आर. देवडकर
श्री. व्ही. व्ही. कोंडूसकर
श्री. एस. बी. खोत
श्री. टी. बी. कांबळे
श्री. आर. के. वडर

# अभिनंदन!



वि.वा.शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज साहित्यातील 'ज्ञानपीठ' हा सर्वोच्च बहुमान प्राप्त झाल्याबदद्ल मन:पूर्वक अभिनंदन! कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पारितोषिक हा तर 'ज्ञानपीठा' चा गौरव!

*कवण कवणा अलंकारिले?*

श्री. पु.ल.देशपांडे
अखिलभारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे
कै.राम गणेश गडकरी पारितोषिक देण्यात आले.
अभिनंदन!



*महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तीमत्व!*

श्री. लक्ष्मण गायकवाड यांच्या उचल्या या परिल्याच आत्मनिवेदनपर लेखनास साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले. *अभिनंदन!*

प्रा.डॉ. प्रकाश मोरे.



राशयामधील उच्च संशोधन यशस्वीपणे पूर्ण केले. अभिनंदन!

प्रा.पी.वाय्.निंबाळकर



एम.फिल.पदवी प्राप्त. अभिनंदन!

कु. विजया हिरेमठ.



शिवराज कालेजच्या या विद्यार्थिनीची शासनाने महिला पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवड केली आहे. अभिनंदन!

*अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष*
*श्री. के.ज.पुरोहित तथा कवी शांताराम.*
*तसेच*
*अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष*
*श्री. राजाराम शिंदे यांचे अभिनंदन.*

# GADHINGLAJ TALUKA
# SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.
# GADHINGLAJ.

TAL. GADHINGLAJ DIST. KOLHAPUR.
*(MAHARASHTRA STATE)*

## SALIENT FEATURES

1. Manufacture of White Crystal Sugar.
2. Maximum Price to the Cane Growers.
3. Recipient of Commendation Certificate from National Federation of Co-operative Sugar Factories Ltd., New Delhi for efficient Technical Performance shown contineously for three years.
4. Established Ultra modern Distillery first of its kind in India of Continuous Fermentation process based on 'VOGAL BUSH' Multicont Technology of Austria with incineration treatment ensuring ZERO POLLUTION.
5. Ambitious 'Cane Development Programme' for the benefit of Cane Growers.
6. Aim of alround development of Gadhinglaj Taluka.

**(Shri. D.V.Yadav)**
**I/c.MANAGING DIRECTOR**

**(Ad.Hanamantrao Patil)**
**VICE CHAIRMAN**

**(Dr.S.S.Shahapurkar)**
**CHAIRMAN**

**BOARD OF DIRECTORS.**

* * * * *

# मागे वळून पाहताना......

जयंत सबनीस

महाविद्यालयाच्या जीवनाशी २५ वर्षे बऱ्यावाईट प्रसंगातून निर्माण झालेले नाते सांगताना मला जे जाणवले ते, शिवराज कॉलेजच्या जन्मामागे सामाजिक जाणीवांच्या खोल आकलनातून निघालेल्या प्रेरक प्रेरणा आहेत. पिचलेली मने आणि खचलेल्या भावना यांना नवा प्रकाश पुरविण्याची आकांक्षा आहे. अक्षरांची कवाडे बंद असलेल्या असंख्य अभाग्यांच्या जीवनाला नवी संजीवनी मिळाली, त्याचबरोबर त्यांच्यात स्वत्वाची जाणीव यावी अशी तळमळ आहे. शिक्षणाशिवाय मुक्ती नाही याची जाणीव आहे. आज या मुक्तीची खरी गरज खेडूत समाजाला आहे. ग्रामीण भागाला आहे. हे ओळखून २५ वर्षापूर्वी शिक्षण महर्षी श्री. व्ही. टी. पाटील यांनी गडहिंग्लजचे भूषण कै. डॉ. एस. एस. घाळी, कै. डॉ. ए. बी. गुणे, त्यांचे इतर सहकारी आणि सामाजिक जाण असणारे इतर असंख्य शिक्षण प्रेमी यांच्या सहकार्याने ताराराणी विद्यापीठामार्फत या महाविद्यालयाची मुहूर्त मेढ २६ जुन, १९६४ साली रोवली.

महाराष्ट्राचे लाडके, द्रष्टे आणि कर्तृत्ववान नेते कै. बाळासाहेब देसाई, यांनी या महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कै. भाऊसाहेब महागावकर व पहिले प्राचार्य कै. अरविंद याळगी यांनी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या, जे मनसुबे रचले, त्या अपेक्षा आज बऱ्याच अंशी पूर्ण करण्याचे भाग्य या महाविद्यालयाला लाभले आहे. अवघ्या ९४ विद्यार्थी विद्यार्थीनींसह सुरू केलेले हे आर्टस् व कॉमर्सचे वर्ग असणारे महाविद्यालय आज अक्षरशः 'वेलू गेला गगनावरी' प्रमाणे वृध्दींगत झाले आहे. या महाविद्यालयात आज ११ वी आर्टस्, कॉमर्स, सायन्स ते बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी. पदवी पर्यंतचे व एम. ए. चे वर्ग असून सुमारे सुमारे १७०० विद्यार्थी विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. तर ७५ प्राध्यापक व ३० प्रशासकीय कर्मचारी येथे काम करीत आहेत.

आजवरच्या आपल्या दैदिप्यमान परंपरांनी हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठात अनेक बाबतीत अग्रेसर असून आपला एक स्वतंत्र असा ठसा उमटवून राहिले आहे. अनेक अडचणी असताना सुध्दा त्यातून मार्ग काढत, अनेक आपत्त्या आणि झंझावात यांना यशस्वी तोंड वाटचाल करीत या महाविद्यालयाने रौप्य महोत्सवी वर्षापर्यंत मजल मारली आहे. आजरा, चंदगड आणि गडहिंग्लज या तीन तालुक्यांना हे महाविद्यालय म्हणजे एक भूषण आहे. महाविद्यालयाची झालेली प्रगती लक्षणीय तर आहेच परंतु नोकरी करणारे, व्यावसाईक व प्रामुख्याने उच्च शिक्षणापासून वंचीत अशा असंख्य मुलांच्या जीवनात एक नवा प्रकाश या महाविद्यालयाने निर्माण केला आहे. विविध प्रयोगातून व महत्वाकांक्षेतून गडहिंग्लज नगरीच्या आसमंतात अमूलाग्र बदल घडवून आणावा, पिढ्यानूपिढ्या तृषार्त मनाला शिक्षणाची नवी उभारणी द्यावी असा प्रयत्न करण्याची जिदद् बाळगूनच शिवराजची स्थापना झालेली आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

१९६४ साली स्थापन झालेले हे महाविद्यालय १९७४ साली तेव्हाचे जि. प. अध्यक्ष आणि विद्यमान खासदार रा. शं. तथा बाळासाहेब माने यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेने चालवावयास घेतले व महाविद्यालयाच्या कुचंबलेल्या प्रगतीचा मार्ग खुला झाला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राजर्षि शाहू जन्मशताब्दी व राष्ट्रपुरुष पुण्यश्लोक छत्रपती शिवरायांच्या त्रिशताब्दी वर्षाचा योग साधून नवीन संस्थेने ही शिक्षण संस्था चालवावयास घेतली आणि महाराष्ट्रातील कोठेही न घडलेला शिक्षण क्षेत्रातील लोकशक्तीचा, सत्तेच्या विकेंद्रीकरणांचा एक आगळा वेगळा प्रयोग येथे सुरू झाला. खा. बाळासाहेब माने यांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी राजकीय विचार, शैक्षणिक मूल्ये यांची कधीही व कोठेही गल्लत न करता शुध्द शैक्षणिक दृष्टी ठेवून महाविद्यालयाच्या प्रगतीचा आराखडा अस्तित्वात आणला आहे. श्री. डी. एस. कदम, कै. गणपतराव तथा दादा देसाई, प्रा. बी. एम. चांडके, आमदार श्रीपतराव शिंदे श्री. धोंडीराम पताडे, प्रा. भैरव कुंभार, डॉ. जी. पी. सावंत, श्री. शंकरराव चव्हाण, श्री. किसन पाटील, प्रा. किसन कुराडे, प्रा. मानसिंग जगताप, प्रा. आनंदराव नाळे, श्री. टी. ए. पाटील, श्री. बळीराम देसाई, श्री. वसंतराव देसाई, श्री. बाबा अडकुरकर, श्री. शिवाजीराव सावंत भोसले, श्री. अमृतकाका देसाई, श्री. व्यंकटराव देसाई, कोवाडकर, श्री. नागप्पाआण्णा बटकडली, श्री. आनंदराव चव्हाण, श्री. अनंतराव तेलवेकर, प्रा. जे. वाय. बारदेसकर, श्री. वय. आर. तथा बाबूराव मोहिते व इतर अनेक कार्यकर्ते अशा सर्व पक्षीय विचारांचे लोकांनी घेतलेल्या पुढाकारातून नवीन संस्थेने अवघ्या एक तपाचे काळात चांगलीच उभारी धरली. आणि स्वतःच्या इमारतीचा संकल्प पहिल्या तीन वर्षात काही प्रमाणात पुरा केला. आज सुमारे १५ लाखाच्या इमारती संस्थेने बाधून पुर्ण केल्या असून ग्रंथालयासाठी स्वतंत्र अशी ६ लाखांची इमारत लौकरच हाती घेतली जाणार आहे. महाविद्यालयाच्या शास्त्र विभागाला मा. डी. एस. कदम यांनी सामाजिक जाणीवेने दिलेली २ लाख रू ची देणगी स्विकारून त्यांच्या दातृत्वाचा गौरव म्हणून त्यांचें नाव देण्यात आले आहे. तर संस्थेचे अध्यक्ष खा. बाळासाहेब माने यांच्या एकुलत्या एका मुलाचे अपघाती निधन झाल्यामुळे त्यांचे स्मारक म्हणून ज्युनियर विभागाला संभाजीराव माने यांचे नाव देण्यात आले आहे. इमारतीच्या बांधकामाचा यज्ञ गडहिंग्लज परिसरातील असंख्य देणगीदार, संस्थेचे पदाधिकारी, व सदस्य, संकेश्वर साखर कारखाना, अर्बन बँक, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज, महाविद्यालयाचा प्राध्यापक व कर्मचारी वर्ग अशा अनेकांचे उदार देणगीतून यशस्वी होत आहे. महाविद्यालयाच्या विकास व या भागातील शैक्षणिक गरजेचा विचार करून १९८२ साली येथे सायन्स शाखा सुरू करण्यात आली. आजवर सुमारे ६ लाख रुपये प्रयोगशाळा साहित्यावर खर्च झाले असून शास्त्र शाखा हे महाविद्यालयाचे भूषण ठरले आहे. सायन्स शाखेने विद्यापीठाच्या परीक्षेत इतिहास निर्माण केला आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या

सर्व विकास योजना आमचे महाविद्यालय राबवित असून आता पर्यंत सुमारे ९ लाखाचे अनुदान आम्हाला विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळाले आहे. या वर्षी १ लाख रूपयाचा कॉम्प्युटर विद्यापीठ अनुदान मंडळाकडून आम्ही घेतला असून लौकरच कॉम्प्युटर सायन्सचा डिप्लोमा कोर्स सुरू करण्याचा आमचा मानस आहे. महाविद्यालयाचे ग्रंथालय हे आमचे भूषण असून आज तेथे रु. ६ लाखाची ३५ हजार पुस्तके आहे.

आमच्या महाविद्यालयाला प्राचार्यांची एक आगळी वेगळी परंपरा लाभली आहे. ग्रामीण महाविद्यालयाची घडी बसवून त्याला सुस्थिर पायावर उभे करण्याचे कामात प्राचार्य कै. अरविंद याळगी, कै. जी. एस उपळेकर, कै. बी. व्ही. पोतदार, प्रा. डी. जी. कुलकर्णी, प्रा. नरेंद्र कुकडे, डॉ. अंबादास माडगूळकर, डॉ. सुधाकर गोकाककर, प्रा. बलवंत देशमुख, आणि आता डॉ. डी. व्ही. तोगले यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. १९७४ साली नवीन संस्थेकडे महाविद्यालय आल्यानेतर पहिले प्राचार्य म्हणून डॉ. गोकाककर यांनी मजबूत पाया घातला. तर पुढे जवळ जवळ एक दशक समर्थपणे या महाविद्यालयाचा भार सांभाळून प्रा. बलवंत देशमुखानी या महाविद्यालयाच्या यशाची पाऊलवाट मजबूत केली. गेल्या ५ वर्षापासून ग्रामीण भागाशी मातीचे नाते सांगणारे डॉ. डी. व्ही. तोगले यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे. महाविद्यालय म्हणजे केवळ विद्यार्थी संख्या वाढविणे आणि विद्यापीठाच्या व बोर्डाच्या परीक्षा घेणे नव्हे तर एक दर्जेदार ग्रामीण महाविद्यालय बनविणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून डॉ. तोगले प्रयत्न करीत आहेत. शिवराज मधून बाहेर पडणारा पदवीधर वेगळा असावा, समाजाची बांधिलकी मानणारा असावा व स्वतःच्या पायावर उभा रहाणारा विचारी नागरीक व्हावा यादृष्टीने संस्कार घडविण्याचे काम येथे चालू आहे. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचा समन्वय ठेवून शिस्त ठेवण्याचे व नव्या आव्हानांना सामोरे जाण्याचे ध्येय डॉ. तोगले यांनी नजरेसमोर ठेवले आहे. आमचे महाविद्यालय केवळ शैक्षणिक आघाडीवरच पुढे आहे असे नव्हे तर महाविद्यालयाची क्रीडा परंपरा ही शिवाजी विद्यापीठात आपला दबदबा निर्माण करणारी ठरली आहे. महाविद्यालयाच्या एन. सी. सी. चे वि[illegible]ार्थी आ[illegible]ली कीर्ती पताका अखिल भारतीय स्तरावर नेत असून राष्ट्रीय सेवा योजना, प्रौढ साक्षरता, हुंडाबळी, चळवळ, नियोजन मंडळ, सोस्कृतिक चळवळ, सामाजिक चळवळी यातून सामाजिक सेवेद्वारे आदर्श नागरिक बनविण्याचे स्वप्न येथे साकारले जात आहे.

आमचा विद्यार्थी जसा जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर पुढे आहे तसाच आमचा प्राध्यापक वर्ग हा केवळ शिक्षण क्षेत्रात आडकून न पडता एका विशिष्ट ध्येयवादाने व सामाजिक जाणीवेने अनेक क्षेत्रात स्वतःला झोकून देत असतो. देवदासी निर्मूलन असो, सहकाराद्वारे सामाजिक परिवर्तन असो, की शैक्षणिक क्षेत्रात प्राथमिक व माध्यमिक स्तरावरचे कार्य असो आमच्या प्राध्यापकांची सामाजिक चळवळ सतत सतत चालू असते. पण त्याचबरोबर स्वतःची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याची जणू स्पर्धाच येथील प्राध्यापक व कर्मचाऱ्यात चालू असते. समाज जीवनाच्या अनेक आघाड्यांवर एक नवा उन्मेश ही आमच्या प्राध्यापाकांची शैक्षणिक क्षेत्राबाहेरची जमेची बाजू आहे. येथे संस्कारीत विद्यार्थी घडतो आहे. कालचक्राची २५ वर्षे उलटल्यानंतर काळाच्या आरशात या महाविद्यालयाची प्रतिमा पहाताना शैक्षणिक जीवनाचे रंग अधिकच स्पष्ट होत आहेत. ही बाब आमचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व संस्था चालकांना निश्चितच भूषणावह आहे. महाविद्यालयाला विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, स्नेहसंमेलन, व्याख्याने, या निमित्ताने आजवर अनेक मान्यवरांनी भेटी देवून गौरविले आहे. सर्वांचीच यादी दिल्यास ती बरीच मोठी होणार आहे. त्यापैकी मान्यवरांचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य मानतो. त्यामध्ये माजी मंत्री ना. कै. बाळासाहेब देसाई, कै. वसंतदादा पाटील, कै. यशवंतराव चव्हाण, कै. एस. एम. जोशी, श्री. ना. ग. गोरे, डॉ. व्ही. एम. चाटगे, पंडीत जेरेशास्त्री, पंडीत महादेवशास्त्री जोशी, कै. ग. दी. मागगुळकर, श्री. व्यंकटेश माडगुळकर, श्री. शंकर पाटील, श्री. द. मा. मिरासदार, श्री. व. पु. काळे, कै. बॅरि. आपासाहेब पवार, कै. भा. शं. भणगे, बॅ. पी. जी. पाटील, प्राचार्या सौ. विजयाताई पाटील, प्रा. डी. यु. पवार, प्रा. आर. के. कणबरकर, डॉ. के. भोगीशयन, ना. सुशिलकुमार शिंदे, श्रीमती शालीनीताई पाटील, बॅ. रामराव आदीक, श्रीमंत छत्रपति शाहू महाराज, अनिरूद्ध पुनर्वस, कवी वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर, चित्तरंजन कोल्हटकर, डॉ. बा. म. गोगटे, डॉ. अनील अवचट, उपराकार लक्ष्मण माने, कै. डॉ. ग. गो. जाधव, कै. पी. बी. साळुंखे, कै. भाऊसाहेब महागांवकर, रणजीत देसाई, जगदीश खेबूडकर, डॉ. ना. य. डोळे, प्रा. शिवाजीराव भोसले, डॉ. शं. ब. मुजुमदार, खा. उदयसिंगराव गायकवाड, प्रा. पी. बी. पाटील, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. सुमे[illegible]ाई पाटील, बाबा कदम, पै. विष्णू जोशीलकर, कै. बंडू पाटील, कै. जादूगार रघुवीर, डॉ. वि. म. दडिकर, कै. मेघनाथ नागेशकर, डॉ. अनंतराव तोरो, डॉ. आनंद यादव, शंकर खंडू पाटील, मुकुंदराव किर्लोस्कर, अधकवी राम गोसावी, वामन होवाळ, महादेव मोरे, माजी मंत्री कल्लाप्पाआण्णा आवाडे, जिल्ह्यातील अनेक मान्यवर आमदार, शिवाजी विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीचे निमित्ताने अनेक प्राध्यापक, इत्यादिंचा समावेश करावा लागेल. महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या संध्याकाळी क्षीतिजाआड जाणारे २५ वे वर्ष पहात असतांना सहज मनाला वाटून जाते, लौकरच नवीन वर्ष येणार आहे. हे नववर्षा, तुझ्या स्वागतासाठी आम्ही आतूर आहोत. महाविद्यालयाने सुवर्ण महोत्सवाकडे दौड करावी यासाठीच जणू आकाशाने सुवर्ण अलंकार धारण करून गुलाबी रंगाची उधळण करीत पूर्वेच्या अंगणात एक नक्षीदार रांगोळी घातली आहे. दहा दिशांनी मोत्यांची उधळण केली आहे. पक्षी आपल्या नादमधूर सुरांनी तुझे जयगान करीत आहेत. कालच्या धुक्यांची चादर आज हलकेच दूर होत आहे. आणि नवीन वर्ष या महाविद्यालयाच्या जीवनात पुढील आव्हाने पेलण्यासाठी सामोरे येत आहे. महाविद्यालयाच्या जीवनातले एक रौप्यमहोत्सवी वर्ष संपत असतांना भविष्यकालीन योजना आणि स्वप्ने रंगविण्यात आम्ही सर्व गुंग होऊन जाणार आहोत. कदाचित नियतीच्या खेळात या महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी आमच्यातले काही असणार नाहीत पण शैक्षणिक विश्वात महाविद्यालयाच्या इतिहासाचा सारीपाट मांडत असताना दोन शब्द आजच्या कर्तृत्वान पिढीसाठी, त्यांनी केलेल्या त्यागासाठी आणि गडहिंग्लजचे नांव शैक्षणिक विश्वात सतत तळपत ठेवण्यासाठी ज्यांनी सोसले त्यांचेसाठी तिश्चितच खर्च करावे लागतील. रौप्यमहोत्सव ते सुवर्ण महोत्सव या कालखंडात महाविद्यालयाने यशाची नवीन नवीन क्षितिजे, काबीज करावीत, लौकिक वाढवावा, एक आदर्श देशभक्त नागरिक आणि नवी आव्हाने स्वीकारणारे युवक निर्माण करणारे ग्रामीण भागातील एक सर्वोत्कृष्ट महाविद्यालय अशी बिरूदावली या महाविद्यालयाने आपल्या छातीवर अभिमानाने मिरवावी आणि सुवर्ण महोत्सवाच्या मंगल कार्यात आपणही काहीतरी काम करावे अशी प्रेरणा अनेकांना व्हावी त्यावेळी होणाऱ्या मंगल वाद्यांचा गजर, आप्त, स्वकीय, स्नेही, परिजन, थोर मोठे यांची गर्दी प्रवेश द्वारापर्यंत आलेली असावी आणि थकलेले शरीर मन सांभाळीत या आनंद मेळाव्यात उत्सवमूर्तीपर्यंत पोचण्याची शक्यता नसल्याने, प्रवेश द्वाराजवळ थांबून मनोभावे गुंफून आणलेले शुभसूचक असे शब्द पालवीचे तोरण प्रवेशद्वारी बांधावे व रजा घ्यावी...

## आनंद नर्सरी

बसर्गे बु।। ता. गडहिंग्लज. जि.कोल्हापूर.

उत्कृष्ट सुधारित फळाफुलांची कलमे व रोपे.
उत्कृष्ट गुलाब (व्हर्टाइज् १५०) कलमे व रोपे
काजू, नारळ, डाळिंब, चंदन, चिक्कू, फणस,
साबुची रोपे, सीताफळ, बोर, बोनसाय
या शिवाय विविध प्रकारची इनडोअर व
आउटडोअर शोभेची
कलमे/रोपे आमच्या येथे मिळतील.

## दी हायग्रोन टी डेपो

उंची चहाचे व्यापारी

मेन रोड, गडहिंग्लज.

प्रो. आए.अन्.जाधव.

## सुवर्ण
## स्टील भांडी सेंटर

## दीपक रेडिमेड ड्रेसेस्

## हॉटेल शिवनेरी

शाकाहारी व मांसाहारी जेवणाची
सदैव उत्तम सोय!

एकदा अवश्य भेट द्या!!

# मराठी विभाग



## अंतरंग

कुसुमाग्रज विचार
अमृतघाट कुसूमाग्रज
पतितांचा सरदार
वळण
पाकिस्तानी रझिया
मी सलाम ठोकणार आहे
अजून असा
स्त्रीचे सामाजिक...
खरे प्रेम
जरा हेही वाचा
आमच्या बबीच लग्न....
कर्मयोगाचे जीवनातील....
अतूट नाते
भिकारी
ज्ञानदीप
हसा....हसा....हसा....

**विभागीय संपादक**
प्रा. सुधीर जोशी.
प्रा. अनिल गवळी.

प्राथमिक शिक्षकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटणारी, सुवर्णमहोत्सवी, जिव्हाळ्याची......

## दि प्राथमिक शिक्षक सह. बँक लि., कोल्हापूर.

१०३१/क, २ ई वॉर्ड, गवतमंडई, कोल्हापूर.

फोन.नं.हेड ऑफीस–२६१४८, २६१८१.

शाखा–मुख्य शाखा, शाखा–गडहिंग्लज २२८, शाखा–शिरोळ २८, शाखा–मुरगूड, शाखा–हातकणंगले ४२, शाखा–मलकापूर ६०, शाखा–गारगोटी १८, शाखा–राधानगरी १४, शाखा–आजरा १६,

**आमची वैशिष्ट्ये**

(१) ७७ महिने दामदुप्पट ठेव योजना. (२) १०वी शिष्यवृत्ती परिक्षेत पास होणाऱ्या शिक्षकांच्या मुला–मुलिंना उत्स्फुर्त बक्षिस योजना.
(३) स्थापनेपासून आजपर्यंत "अ" ऑडिट वर्ग. (४) मासीक आवर्त ठेव योजना. (५) पगारातून कर्ज हप्ता व रिकरींग हप्ता सोय.
(६) मयत सभासदांच्या वारसांना आर्थिक मदत सहाय्य. (७) २५०००/– पर्यंत कर्ज योजना.
(८) सोनेतारण कर्ज योजना. (९) आकस्मीक कर्ज योजना. (१०) सभासदांच्यासाठी हायरपर्चेस कर्ज योजना, घरबांधणी कर्ज योजना.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | ३००००००००–०० | रिझर्व व इतर फंड | ५६०५९३६–३० |
| खपलेले भाग भांडवल | २२६२८६१०–०० | ठेवी | ३९३२७४७३–२८ |
| निव्वळ नफा | २५८३२२६–९० | खेळते भांडवल | १३००३४५९०–०५ |
| सभासद संख्या | ७५९० | दिलेली कर्जे | १११३७७१९९–०० |

श्री. आ.दा.शिंद
मॅनेजर

श्री. ग.रा.भोई
व्हॉ.प्रेसिडेंट.

श्री. दा.शं.सुतार
प्रेसिडेंट

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :– श्री. आ.ज्ञा.सोहनी, श्री. भु.ह.कांबळे, श्री. म.वि.चौगुले, श्री. पां.चा.पाटील, श्री. आ.द.नादवडेकर, श्री. वि.ना.मांगोरे, श्री. शा.भा.पाटील, श्री. तु.टो.लाड, श्री. सा.पां.पाटील, श्री. व.ग.महाजन, श्री. न.श.धबाले, श्री. पां.वि.मिसाळ

*शिवराज महाविद्यालयास हार्दीक शुभेच्छा*

# चिमणे सन्मित्र सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई.

**मुख्य कार्यालय**:–हिरा अपार्टमेंट, जनता सोसायटी मार्ग, घाटकोपर (पुर्व.), मुंबई–४०० ०७७.

शाखा:–१) मुंबई:–करीरोड. फोन.नं.८९९१४७
२) गडहिंग्लज:–आजरा–संकेश्वर रोड,C/o-238
३) उत्तुर:–जूने एस.टी.स्टँड जवळ. फोन. नं.३३.
४) कोल्हापूर:–शाहुपूरी, ३री गल्ली.

**★ खास वैशिष्ट्ये ★**

★ पाच वर्षात दाम दुप्पट.
★ रिकरिंग ठवीवर व्याज $२३\frac{१}{२}$ %
★ इतर सर्वप्रकारच्या ठेवीवर *बँका पेक्षा जास्त व आकर्षक व्याज*
★ मुख्य कार्यालय चेअरमन श्री. डी.डी.नादवडेकर
★ उत्तुर शाखा सुरुवात ता.१० आक्टो.१९८८ चेअरमन–श्री. जी.आर.पाटील

**★ संस्थेची घोड-दौड ★**

★ १९८५–८६ पर्यंत २३,९७,२१८ : ७३
★ १९८६–८७ —— १,०१,१६,५३४ : ५८
★ १९८७–८८ —— २,३८,५२,४३१ : ००

★ गडहिंग्लज शाखा सुरुवात ता.२४ मे १९८८ चेअरमन–श्री. एस.आय.पाटील
★ कोल्हापूर शाखा सुरुवात ता.९ फेब्रु.१९८९ चेअरमन–श्री. पी.जी.शेट्टी.

## परीचय



# अमृतघट 'कुसुमाग्रज'

कु. अंजली माने, बी. एससी. १

टिळक फुलामुलांचे कवी, गोविंदाग्रज कल्पनारम्य प्रणयाचे कवी, गडकरी प्रेमाचे शाहिर तर कुसुमाग्रज हे मानवतेचे कवी, आजच्या सामाजिक असंतोषाच ज्वालामुखी त्यांच्या कवितांतून इतर काव्यांप्रमाणे नुसता धुमसत नाही तर तो अग्निरसाचा वर्षाव करीत सुटतो.

रत्नहाराचे तेजस्वी सौंदर्य कुणाला समजावून सांगावे लागत नाही, डोळ्यांना ते पहिल्या क्षणीच जाणवते. रातराणीच्या प्रफुल्ल सुगंधाची कुणी चर्चा करीत बसत नाही. वाऱ्याच्या झुळकेबरोबर तो आला की मन उल्हासून जाते. लहान मुलाच्या नाजूक पाप्याची अवीट गोडी कळायला पुस्तकी पांडित्यांची आवश्यकता नाही एका स्पर्शातच त्या अमृताचे माधुर्य कळते. सुंदर आणि सजीव कवितासंग्रह, नाटके, कादंबऱ्या, कथा, ललितलेखनाचेही असेच आहे. तिला प्रस्तावना हवीच कशाला? कवितेच्या आत्म्यापासून तिला वस्त्राभूषणांनी नटविण्यापर्यंत किंबहुना तिचे कुंकू रेखीव करण्यापर्यंत कुसुमाग्रजांची कल्पकता सिध्दहस्त असते. प्रतिभासंपन्न कवीपासून कर्तबगार देशसेवकांपर्यंत विविध मनोवृत्तींच्या लोकांना त्यांच्या कवितेने मोहिनी घातली आहे.

मडगाव येथे १९६४ साली झालेल्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. पुणे विद्यापीठातर्फे त्यांना 'डी. लिट' ही पदवी देण्यात आली. शासनातर्फे त्यांना 'राम गणेश गडकरी' हा पुरस्कार मिळाला आणि परवाच गेल्या सप्टेंबर महिन्यामध्ये त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. मराठी माणसाला अभिमान वाटावा अशी ही घटना घराघरामध्ये पोहोचलेल्या या ज्येष्ठ साहित्यिकाचे लेखन म्हणजे एक जीवनदृष्टी, एक रसयात्राच नव्हे का?

'जीवनलहरी', 'विशाखा', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'मुक्तायन', 'किनारा', 'मराठी माती' इ. कवितासंग्रह, 'कौंतेय', 'दुसरा पेशवा', 'नटसम्राट', 'ययाती आणि देवयानी', 'दूरचे दिवे', 'बीज म्हणाली धरतीला', 'जेथे चंद्र मावळत नाही', इ. नाटके, 'जान्हवी', 'वैष्णव', 'कल्पनेच्या तीरावर', इ. कादंबऱ्या याशिवाय कथा, ललितलेखन ज्यांनी केले ते कुसुमाग्रज आजच्या साहित्यक्षितिजावरील एक तेजस्वी तारा व महाराष्ट्राच्या हिंदभूमीच्या आशा - आकांक्षाचे उद्‌गातेच होय.

टिळक फुलामुलांचे कवी, गोविंदाग्रज कल्पनारम्य प्रणयाचे कवी, गडकरी प्रेमाचे शाहीर तर कुसुमाग्रज हे मानवतेचे कवी आजच्या सामाजिक असंतोषाचा ज्वालामुखी त्यांच्या कवितांतून इतर काव्यांप्रमाणे नुसता धुमसत नाही तर तो अग्निरसाचा वर्षाव करीत सुटतो. काव्यसंग्रहाच्या उपसंहारात स्वतःच्या कवितांबद्दल ते सांगतात-

'समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा
कोठून फुलांपरि वा मकरंद मिळवा?
जात्याच रूक्ष या एकच त्या आकांक्षा
तव आंतर अग्नि क्षणभर तरी फुलवावा

## कुसुमाग्रज विचार

"माझी कविता लौकिक दृष्टीने महालात बसलेली मानिनी नसेल, रस्त्यावर वावरणारी बैरागीण असेल पण एक मिणमिणता दिवा घेऊन ती माझ्याबरोबर नव्हे, माझ्यापूढे सतत चालली आहे. त्या दिव्याच्या उजेडात माझे मी पण तरमला सापडलेच, पण या मीपणाचा भोवतालच्या परिसराशी असलेला संबंधही सापडला. हे कवितेचं ऋण कधीही न फिटणारे आहे आणि तरीही मी कविता जगलो नाही. पण कवितेने मला जगवले आहे आणि माझ्या जगण्याला माझ्यापुरताच एक विशेष अर्थ मिळवून दिला आहे....."

"काव्यासाठी जगणे ही गोष्ट मला कधीच पटलेली नाही, मी असे मानतो की काव्य हे अखेरतः एक जीवनदर्शन आहे, जीवनाचा अन्वयार्थ आहे, जीवनासंबधीची प्रतिक्रिया आहे. म्हणून काव्याची अंतिम बांधिलकी असते ती जीवनाशी, शब्दाची नव्हे, कल्पनेच्या विलासाशी नव्हे, वा साहित्यातील तथाकथित सिध्दातांशी नव्हे."

इंग्रजाची सत्ता गेली पण इंग्रजीची सत्ता येथे वाढत्या प्रमाणात फैलावत आहे. याचा संभाव्य अर्थ हाच की, आपल्या मनातील गुलामगिरीची सावट अद्याप पूर्णतः नष्ट झालेली नाही. भारतातील कोणाही नागरीकाला आपल्याला इंग्रजी येत नाही म्हणून प्रगतीचे अनेक दरवाजे त्याच्यासाठी बंद असावेत ही परिस्थिती खरोखर लज्जास्पद आहे. बहुसंख्य लोकांना न कळणाऱ्या भाषेत आपल्या सर्व वरच्या पातळीवरील आर्थिक राजकीय व्यवहार होत असल्यामूळे लोकांना न कळणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही ही अद्‌भूत घटना आहे.

इंग्रजीवर एक संपन्न भाषा म्हणून माझेही प्रेम आहे. जगातील ज्ञान विज्ञानाशी संपर्क साधणारी ती एक खिडकी आहे. पण खिडकी म्हणजे घर नव्हे आपण घराच्या चार भिंती न बांधता फक्त खिडक्याच उभ्या करीत आहोत आपल्या भाषा मागासलेल्या आहेत हे केव्हाही खरे नाही. कोणतीही भाषा माजघरात वाढत नाही.

ज्ञान विज्ञानाच्या राजकारभारांच्या, आर्थिक व्यवहाराच्या प्रांतात तिचा प्रवेश झाला तरच ती वाढू शकते आणि तशी ती वाढते. हे अनेक राष्ट्रांनी सिध्द केले आहे. आपण कल्पनेची कुंपणे निर्माण करीत आहोत. आणि एका परस्थ भाषेच्या पायावर डोके ठेवून तूच आम्हाला तार म्हणून तिला विनवणी करीत आहोत. देशातील बहुसंख्याना न समजणाऱ्या परस्थ भाषेचा पागुळगाडा घेवून सामाजिक परिवर्तनाचा प्रगतिचा पर्वत आपण चढू पाहत आहोत."

संकलन:
अन्नपूर्णा पाटील
बी. ए. भा ३

कुसुमाग्रज आपल्या कवितांना रूक्ष-समिधा मानतात. परंतु त्यांना उपमा दयायची असेल तर शमीवृक्षाचीच, अगदी त्या वृक्षाप्रमाणेच त्यांच्या अंतरंगात दाहक अग्नि आहेच पण अज्ञातवासातून मुक्त होताना शमीवृक्षाने पांडवांना शस्त्रे तेजस्वी करून दिली तसेच कुसुमाग्रजानी विषमता, पिळवणूक, अन्याय, अनिती या विषयी बहुजनसमाजाची चीड काव्य स्वरूपात दिली.

जुना धर्म, नीती, समाजरचना म्हणते, 'देवाला शरण चला, तो दयाघन व सर्व दुःखांचा परिहारकर्ता आहे'. पण हा भोंदू उपदेश मूर्ख आहे हे कुसुमाग्रजांना कळून चुकले. हा काल्पनिक देव दुर्बलांचा मित्र होऊ शकत नाही तर सत्ताधारी संपत्तीवाल्यांना सहाय्य करतो. म्हणूनच त्यांची 'देवाच्या दारी' ही कविता साकारली. त्यामध्ये ते सांगतात-

म्हणतात तुझ्या दयेला न अंत
पुकारती संत थोरी तुझी
चिमण्यांच्या घरास लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी!
जळातले जीव तापता दुपारी
वाळवंटावरी ओढसी तू!
तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन!

अनुभवाशेवटी देव दगड ठरतो, पण मनुष्य काही केल्या दगड होऊ शकत नाही. आपला उध्दार आपणच करावयास हवा याची जाणीव त्याला होते.

सुधारकांचा दुबळेपणा मानवतेला प्रचित झाला की क्रांतीची कल्पना जन्म घेते. क्षणाक्षणाने व कणाकणाने सुधारणा होऊन मानवजात सुखी होईल हा भोळा आशावाद मागे पडतो. तेव्हा क्रांतीचे निशाण हातात घेतलेल्या समतादेवीकडे समाजाचे डोळे लागले जातात. यामधूनच 'हा काठोकाठ कटाह भर', 'आगगाडी व जमीन, 'बंदी', 'गुलाम', 'जा जरा पूर्वेकडे' अशा तेजस्वी कवितांतून कुसुमाग्रज क्रांतीचा मानवजातीस लागलेला ध्यास रूपकांच्या आश्रयाने मोठ्या तन्मयतेने वर्णितात. क्रांतीची कसोटी म्हणजे त्याग. म्हणूनच भविष्यकाळातील समतेची गोड स्वप्ने पाहणारा समाज सुर्याचे स्वागत करतो, दुर्दम्य आत्मशक्ती, अभंग आवेश, अपरिजीत मनोबळ क्रांतीतून प्रकटते तेव्हा क्रांतीचा जयजयकार साकारतो, व सुभाषिताच्या सामर्थ्याच्या ओळी कुसुमाग्रज लिहितात

'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषाकाल..'
'पोलादाची काय तमा मरणाच्या दारात'
'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार'
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालातुनी भावी क्रांतीचे नेते'.

आजच्या जीवनातल्या, अश्रू, असंतोष, चीड, त्वेष साऱ्या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेत आहेत. 'दूर मनोऱ्यात', 'कोलंबसचे गर्वगीत' व 'सात' या कविता म्हणजे परिस्थितीची जाणीव असूनही न भांबावलेले कुसुमाग्रज.

मार्ग आमुचा राखु शकती ना धन ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा.

कोलंबसच्या गीतातल्या या कुसुमाग्रजांच्या ओळी नवे जग निर्माण करू इच्छिणाऱ्या आजच्या समाजाला मार्गदर्शकच आहेत, होय ना?

कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' कविता वाचून विशाल कल्पनेच्या पंखावर बसून अनंताची आरती गाणाऱ्या सावरकरांची व रूद्रास आवाहन करणाऱ्या भा. रा. तांबेची आठवण झाली तर नवल ते कोणते? 'स्वप्नांची समाप्ती' हे गीत वाचले की कल्पकतेने भरलेले कुसुमाग्रज हे एक 'अमृतघटच' आहेत असंच वाटल्या वाचून रहात नाही.

विष्णू वामन शिरवाडकर यांचे टोपणनाव म्हणजे 'कुसुमाग्रज', ते आपल्या एका कवितेत म्हणतात-

माझी कविता
विजयासाठी कधीच नव्हती
म्हणून तिला
पराजयाची भीती नाही
तिचा जगण्याचा हट्ट नाही
म्हणून मरणाचं भय तिला वाटत नाही.

शिरवाडकारांना नट व पत्रकार होण्याची जबरदस्त इच्छा होती पण त्यात त्यांना अपयशच आले. मानसन्मान, लौकिक याचं त्यांना कधीच अप्रूप वाटत नाही. ज्यानी अपयश पाहिले आहे त्यांच असंच असते.

तीन किंवा चार ओळींच्या कवितेतही त्यांचे कवितेचे कौशल्य, कसब दिसून येते-

'मस्तक ठेवून गेलीस जेव्हा
आगतिक माझ्या पायांवरती
या पायांना ओठ व्हायची
अदम्य इच्छा झाली होती.'

किती लहान पण किती महान व मनाला चटका लावून जाणारी ही कविता आहे ते वाचता क्षणीच लक्षात येते. त्यांच्या कवितांना आशावादाचे जबरदस्त असे वरदान लाभले आहे.

दलितांच्या पोटी जन्माला आलेल्या गुणसंपन्न, माणसालाही दलितच व्हावे लागते. आर्थिक, बौध्दिक, सामाजिक गुलामगिरीतून पूर्ण मुक्त होण्यासाठी एकसुध्दा मार्ग या उपेक्षित बांधवांच्यासाठी आपण मोकळा ठेवत नाही. 'पाचोळ्या'च्या रूपाने शिरवाडकरांनी दलितवर्गाच्या या कारूण्यपूर्ण जीवनाचे किती भेदक चित्रण केले आहे. त्यामध्ये ते म्हणतात-

'आणि जाग ही मोकळी तळाशी
पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी!'

ही सामाजीक दुःखे नाहीशी कशी व्हायची? जुन्या धर्मे, नीती समाजरचनेप्रमाणे 'देव' हाच सर्वपरिहारकर्ता आहे असे मानतात. पण अनुभवाअंती देव दगड ठरतो तर मनुष्य-मनुष्यच राहतो हे कुसुमाग्रजांनी 'देवाच्या दारी' या कवितेत सांगितले आहे. यासाठी स्वतःच स्वतःची प्रगती करायला हवी. प्रत्येकाने आपली स्वताःची प्रगती केली की देशाची उन्नती होते. प्रत्येकाने स्वार्थ सांभाळून उच्च आसन यापेक्षा उच्च कसे होईल असा जर विचार केला तर त्याने केलेली सुधारणा समाजाच्या तळापर्यंत पोहोचू शकणार नाही. हळव्या व आत्मनिष्ठ सुधारकांचा हा दुबळेपणाच होय.

मध्यंतरी जेव्हा जातीय दंगली उसळल्या होत्या तेव्हा शिरवाडकरांनी एक दिवस ठरवले की आपण ईद-ए-मिलादला मशिदीमध्ये जाऊन मुस्लिम बांधवांना ईद मुबारक करावे, आणि ते एकटेच उठून गेले व तेथे उभे राहून त्यांनी प्रत्येक बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तेथे जाणे सुध्दा धोक्याचे होते तेंव्हा मनाशी पक्कं ठरवून केलेली ही घटना. ते म्हणाले- तेथे येणारी माणस गोरगरीब होती. त्यांच्या डोळ्यामध्ये करूणा दिसत होती. घाबरलेल्या लोकांना आमचे या देशात काय होणार याचीच काळजी लागली होती. त्यांच्या वतीने ते मुस्लिम बांधवाना दिलासा देण्यास थांबले. आता हीच जाणीव किती लोकांच्यामध्ये आली असेल? याचे उत्तर तुम्हीच तुम्हाला विचारून पहा म्हणूनच हा मनुष्य नुसता शब्दप्रभू नाही तर कृतीमधून मनात ठरवलेल साकार करणारा आहे हे दिसून येते.
आगदी सर्वांना परिचीत असणाऱ्या-

"सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना
तिमीरातुनी तेजाकडे प्रभू आमुच्या ने जीवना"

हे प्रार्थना गीत त्यांनी कोणत्याही देवाचे नाव न घेता लिहिले आहे. आश्चर्य आहे ना? देवाचे नाव न घेता प्रार्थना त्यांची कवित्वाची जी पातळी आहे ती भावुकतेची नाही तर महाकाव्यांची आहे ज्यामध्ये आकाश, समुद्र, धबधबा या सर्वांचा सुरेख संगम झालेला असतो. 'मुक्तायन' मधील त्यांच्या अलीकडच्या कविता अति विलक्षण अशाच आहेत. त्यातले सौंदर्य म्हणजे भव्यतेचे सौंदर्य आहे. सुक्ष्मतेचे सौंदर्य आहे. दुःखाकडे माणसाने कसे पाहावे, वैफल्याकडे माणसाने कसे पहावे याच्याबद्दलचा नवा आशावाद त्यांच्या काव्यात दिसतो. आभाळाची छाया, धरणीची माया असणाऱ्या हा महान लेखक, मोठा माणूस वि. वा शिरवाडकर यांना परमेश्वर अदंड आयुष्य देवो. यापेक्षा ही जास्त कविता, कथा, नाटके त्यांच्या हातून घडवीत घराघरात पोहोचलेल्या या ज्येष्ट साहित्यिकास लेखन ही म्हणजे एक जीवनदृष्टी व एक रसयात्राच होय. ती रसयात्रा परिपूर्ण होऊन रसिकांना त्या रसाचा आस्वाद घेता यावा.

काव्यप्रेमी रसिक बांधव काव्यप्रांतातल्या त्यांच्या पुढील प्रवासामध्येही कुसुमाग्रजांना विनंती करील.-

'कोट्यावधी जगतात जिवाणू
जगती अन मरती
जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभाखाली
निर्मिती नवक्षितीजे पुढती
चला उभारा शुभ्र शिडे ती गवनि वरती
कथा या खुळ्या सागराला
अनंत आमुची ध्येयासक्ति
अनंत अन अशा
किनारा तुला पामराला!

# पतितांचा सरदार

भूपाल दिवेकर
बी. ए. भाग २

दोन डिसेंबरची सकाळ उगवली. पण ही सकाळ नेहमीप्रमाणे हास्याचे फुलोरे नाही घेऊन आली. तर साहित्य, समाजसेवा, शिक्षण वगैरे क्षेत्रांशी संबंधीत सर्वांना हादरा देणारी ठरली. याचा अर्थ असा नव्हे की कुठे बॉम्ब पडला किंवा कुठं करोडो रुपयांचे नुकसान झाले, पण जे झाले ते करोडो रुपयांनीसुध्दा भरून न निघणारे झाले. आपणातून एक व्यक्ती निघून गेली. पण ती व्यक्ती जाताना थरावर थर बसत चाललेल्या प्रबोधनाच्या इमारतींचे बुरूज कोसळून पडतात की काय अशी बऱ्याच जाणकरांना भिती वाटली. असे हे अतुग व्यक्तिमत्व म्हणजे एक निस्वार्थी कळकळीचा कार्यकर्ता, सत्वगुणी विचारवंत, साहित्यिक प्रा. गं. बा. सरदार होत.

प्रा. सरदारांच्या निधनाने महाराष्ट्रातील बऱ्याच क्षेत्रात एक न भरून निघणारी दरी निर्माण झाली म्हटल्यास वावगे ठरू नये. जवळजवळ दोन पिढ्या त्यांच्या प्रबोधनाने प्रभावित झाल्या आहेत. सरदारांचा जन्म जग्गर येथे झाला. जग्गर येथेच बालपण गेल्याने वारली, ठाकूर, कातकरी, कोळी वगैरे आदीवासींची दुःखे त्यांनी अगदी जवळून पाहिली होती. या आदीवासींची बिकट परिस्थिती. त्यांच्यावरील अन्याय या त्यांच्यासमोर घडणाऱ्या गोष्टी होत्या. आणि यातूनच अगोदरच भावूक असलेल्या त्यांच्या मनात समाजसेवेची ज्योत सुलगली.

वडील व्यापारी असल्याने त्यांची आर्थिक स्थिती बरी होती. यामुळेच ते मुंबईला इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी जाऊ शकले. या त्यांच्या उमेदीच्या काळातच गांधी नावाचे वादळ सगळीकडे धुमाकूळ घालत होते. त्यावेळचे हजारो तरूण त्या वादळाच्या आहारी गेले. त्यातच प्रा. सरदार सापडल्याने फारसे आश्चर्य वाटू नये. १९३० साली गांधीनी मिठाचा सत्याग्रह केला त्यात त्यांनी हिरीरिने भाग घेऊन कारावास भोगला, शिक्षणात खंड पडला, पण तुरूंगातून सुटल्यानंतर त्यांनी आपले उर्वरित महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. नंतर त्यांच्या जीवनात मार्क्सवादाने भुरळ घातली आणि गांधीवादी विचारांची मनावरील पकड थोडी ढीली झाली, मात्र गांधीचे विचार मनातून कधीच पुसले गेले नाहीत. शिक्षकी पेशा स्वीकारल्यानंतर विद्यार्थ्यांविषयीची कळकळ उत्तम वक्तृत्व आणि विद्यार्थ्यांत मिळून मिसळून वागणे यामुळे ते मुलांचे अतिशय आवडते प्राध्यापक म्हणून ओळखले जाऊ लागले. जव्हार येथे राजगवयाकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतल्याने संगीतावरही त्यांची पकड होती. अर्थात पुढे त्यांना संगीत साधना करणे शक्य झाले नाही. पण अभिजात संगीत ऐकण्याची त्यांना खूपच आवड होती. संगीताची सच्ची लकेर त्यांना आकर्षून घेत असे.

प्रा. सरदारांच्याजवळ अप्रतिम वाक्‌कौशल्य होते. त्यांची

परिसंवादातील वक्तव्ये, चर्चा, साहित्य संमेलनातील अध्याक्षीय भाषणे ही वेगवेगळया कारणांनी खूपच गाजलीही. तरीपणं लोकांच्या काळजाला हात घालून किंवा त्यांच्या भावनांना आवाहन करून त्यांनी वक्तृत्वाची वाहवा मिळवण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. तर लोकांच्या विवेकबुध्दीला आवाहन करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यांच्या लेखनाबाबतही हेच आपणास पहावयास मिळते. विनाकारण शब्दांची उधळण करण्यापेक्षा मार्मिक तेवढेच लेखन त्यांनी केलेले दिसते. सरदारांचा संत वाङमयावरचा अभ्यास नावाजण्याजोगा होता. भारतातील मार्क्सवाद्यांनी बाजूला सारलेले संत वाङमय त्यांनी जवळून अभ्यासले, आणि त्याचा सामाजिक आशय जनतेपुढे ठेवला हे खरोखरच त्यांचे महत्त्वाचे कार्य मानावे लागेल. संत वाङमयात केवळ 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' एवढाच उपदेश नाही तर त्यात समाजाची उन्नती करण्यासाठी इतर आवश्यक गोष्टीही आहेत हे त्यांनी दाखवून दिले. जवळ जवळ १५ वर्षे फिरून त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे प्रबोधन केले. अगोदरच
भव्य आणि गौरवशाली परंपरा लाभलेल्या महाराष्ट्राला अधिक गौरवशाली करण्याचे काम सरदारांनी केले.

असे असले तरी सरदारजींचे नेमके वर्गीकरण करणे कठीण आहे, नव्हे तर ते कोणत्या एका वर्गात बसतच नाहीत. गांधीवाद, मार्क्सवाद, संतवाङमय, सावरकर वगैरेंचा त्यांच्या जीवनावरील प्रभाव अमान्य करता येणार नाही. पण त्याचे जे जीवनविषयक तत्वज्ञान होते ते उचले नव्हते तर सगळ्यातून आपले असे वगळे, सर्वसमावेशक होते. सुरवातीस सावरकरांच्या हिंदुत्ववादाचा जरी त्यांच्यावर प्रभाव होता आणि जरी नंतर तो कमी झाला तरी सावरकरांच्या तर्ककर्कष बुध्दीवादाचे आकर्षण त्यांना शेवटपर्यंत राहिले. आंबेडकरांनी घेतलेला दलितांचा कैवार, उपेक्षित, पददलित समाजाची केलेली जागृती यांचाही प्रभाव पडल्याने त्यांनी या 'गावाबाहेरच्यांना' गावात अण्ण्यास लोकांना उद्युक्त केले. आगरकरांच्या सामाजिक तत्वविचारांचा त्यानी अभ्यास करून ती तत्वे लोकांपुढे मांडली. न्यायमूर्ती रानडे यांचा सामाजिक सुधारणावाद त्यांनी समाजाभिमुख आणला. पण तरीही प्रा. सरदारांच्या भाषणात गोंधळ किंवा विसंगती नसे. सर्वातून अभ्यासलेल्या त्यांच्या वेगळ्या विचार प्रणालीच्या चाकोरीतूनच ते बोलत, वागत.

त्यांनी समाजसेवेचे हे व्रत एकदा अंगीकारल्याबर ते धकाधकीच्या स्वार्थी राजकारणापासून नेहमीच अलिप्त राहिले. स्वतःचे असे कार्यक्षेत्र त्यांनी निर्माण केले होते. त्यांचा मुळचा पिंड हा शुध्द ज्ञानोपासक होता. आपल्या सभोवालच्या घटनांचा चिकित्सक दृष्टीकोनातून अभ्यास करून जेथे जेथे अन्याय दिसेल तेथे तेथे ते नेहमीच धाऊन गेले. ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात त्यांना आकर्षण होते पण तरीही त्यांचे जे लेखन झाले ते मुख्यतः महाराष्ट्रीयन जनतेविषयी, मध्ययुगीन संतांच्या तत्वज्ञानाविषयी आणि इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून महाराष्ट्रात सुरू झालेल्या प्रबोधनाची चळवळ यावरच झाले. त्यांचा जो तर्कशुध्द साहित्यांचा साठा आहे त्याची दखल घेतल्याशिवाय आजच्या अभ्यासकांना पुढे पाऊलही टाकता येणार नाही इतका त्यांचा अधिकार आहे. त्यामुळेच समृध्द आणि व्यवहार्य अशा वीस ग्रंथांची निर्मिती त्यांच्या हातून झाली. १९८० साली बार्शी येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या ५४ व्या अधिवेशनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले. असे असले तरी प्रस्थापित साहिस्थिक या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे कधीच पाहिले गेले नाही. मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या २१ व्या अधिवेशनाचे, प्रवरानगर येथील ग्रामिण साहित्य संमेलनाचे अशी बरीच साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे त्यांच्याकडे चालून आली. प्रा. सरदार हे पुरोगामी डाव्या विचारसरणीचे म्हणून ओळखले जात, पण सर्व विचारांच्या साहित्यिकांशी व तज्ञांशी त्यांचे संबंध चांगलेच होते. वैचारिक संघर्ष त्यांनी कधीच व्यवहारात आणला नाही.

उदारमतवाद आणि हव्यासाचा अभाव असे आदर्श व्यक्तिमत्व म्हणून सरदारजींकडे बोट दाखवावे लागेल. मानमर्यादा, प्रसिध्दी, अधिकार यांचे लालच दाखवून निष्प्रभ करण्यात येते आणि त्यापासून सावध रहा असा त्यांनी दिलेला इशारा सर्वांनी विचार करण्याजोगा आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आपापल्या न्यायाची आणि विचाराची व्यक्ती शोधावी पण केवळ जन्म, जात या दृष्टीने कोणाकडे पाहू नये, असाही उपदेश त्यांनी केला होता. यश अपयश यांचा हिशेब त्यांनी कधी केलाच नाही. आपले कार्य निष्ठेने पार पाडणे एवढेच त्यांना ठाऊक होते. ते केवळ बोललेच नाहीत तर जे बोलले ते सत्याप्रत आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ते ध्येयनिष्ठ असे कर्ते समाजसुधारक होते. पतितांचा तो एक सक्रिय यात्रिक होता. अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य करणारे, सामाजिक समतेच्या चळवळीत क्रियाशील असणारे, आदीवासी क्षेत्रात काम करणारे, विमुक्त भटक्या, जाती जमातीचे कार्यकर्ते यांना प्रा. सरदार मोठा आधारस्तंभ होते. प्रबोधनाच्या, समाजकर्याच्या चळवळीतील ती प्रेरक शक्तीच होती.

साधी रहाणी उच्च विचारसरणी हे त्यांच्या जीवनाचे तत्वज्ञान होते. आजच्या काळात वरवरची साधी रहाणी म्हणजेच उच्च विचारसरणी असे बऱ्याच भोंदू टोप्या घालून फिरणाऱ्यांचं तत्वज्ञान बनलंय. या गोंगाटात अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या दुर्मिळ व्यक्तितील एक व्यक्ति म्हणजे - प्रा. गं. बा. सरदार! सरदारांचा मृत्यू जरी अगदीच अकल्पित, अकाली नसला, पान जरी पिकले होते तरी सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांना त्यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवेल. प्रेरणाच निघून गेल्याने थोडे दिवस त्यांना जड जाईल यात शंका नाही. पण तरीही सरदारजीनी ज्याप्रमाणे भ्रष्टाचारी राजकारणाला फाटा देऊन आयुष्यभर कसलीही अपेक्षा न बाळगता समाजकार्य केले, प्रबोधन केले याच तत्वावर ध्येयनिष्ठां युवकांनी पुढे येऊन कार्य करणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल. केवळ दोन मिनिटे स्तब्ध राहून नव्हे!

# अनुपमा इलेक्ट्रिकल्स

मेन रोड, गडहिंग्लज.

*इलेक्ट्रिक साहित्याचे व्यापारी.*

प्रो. बी.एस.खोराटे.

# शिवराज टी स्टॉल

आणि

# शिवराज साउंड सिस्टीम

रुचकर व स्वादिष्ट पदार्थासाठी
व
उत्कृष्ट साउंड सिस्टीमसाठी आवश्य भेट द्या.

शिवराज कॉलनी जवळ, गडहिंग्लज.

*प्रो. दिलीप कोरवी.*

फोन २५३

# मनोहर क्लॉथ स्टोअर्स

बाजार पेठ, गडहिंग्लज.

*विमल, मफतलाल, ओ.सी.एम., रेमंड, बॉम्बे डाईंग इत्यादी नामवंत मिल्सचे अधिकृत विक्रेते.*

फॅन्सी सुटिंग, शर्टींग, साडी व ड्रेस मटेरियलसाठी अवश्य भेट द्या.

प्रो. टी.जी.पावले.

# न्यू बेन्झर सिलेक्शन

प्रत्येक प्रसंगी शोभणारे
न्यू बेन्झर मधील रेडीमेड कपडे

आधुनिक फॅशन युगातील उत्तम प्रतीच कापड,
अभिजात विवीध रंग, अत्युत्तम पोत,
नेमक्या मापाच्या आणी सर्वात माफक भाव
याचे उत्तम प्रमाण म्हणजे न्यू बेन्झर
मधील जैंन्टस् व लेडीज रेडीमेडस्.

शर्टस्, पँटस्
बलुन बॅगी पँटस्
जीन्स्
टि शर्टस्, टॉप्स्
स्कर्टस्
चुडीदार, लुजर्स
सलवार, मिडिज्

## न्यू बेन्झर सिलेक्शन

गडहिंग्लज–४१६५०२

*उत्तम प्रतीसाठी आता अधिक किंमत द्यायची गरज नाही.*



# पाकिस्तानी रझिया : बेनझीर

-राजा भुईंबर, बी. ए. भाग २

बेनझीर भुट्टो यांनी पाकिस्तानी राजकारणात प्रवेश केल्यापासून पंतप्रधान बनेपर्यंत त्यांचे जीवन पाहिले तर तो एक सूडाचा प्रवास आहे असेच दिसुन येते. मरणाच्या उंभरठ्यावर उभ्या असलेल्या आपल्या पित्याला भेंटण्यासाठी बेनझीर आपल्या आई समावेत गेल्या असत्या या मायलेकींना पाकिस्तान सोडून जाण्याचा सल्ला त्यांच्या पित्यांनी दिला. तेव्हा बेनझीर आपल्या वडिलांना म्हणल्या- "आम्ही हा देश सोडून न जाता तुम्हाला फाशी देणांऱ्याशी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू!" आणि आपल्या वडिलांना दिलेले हे वचन बेनझीर व त्यांच्या आई बेगम नसरत भुट्टो यांनी अक्षरशः पाळले.

बेनझीर भूत्तो या आज एक शूर तरूणी म्हणून विश्वविख्यात झाल्या असल्या तरी भारताशी त्यांची वागणूक कशी राहील हे आजच सांगता येणार नाही. कारण भारतीयांना 'भुंकणारी कुत्री' म्हणणाऱ्या झुल्फिकार भुट्टो यांच्या त्या कन्या आहेत. भारताविरूध्द एक हजार वर्षे युध्द करण्याचे भुट्टो यांनी सांगितले होते. 'गवत खाऊ परंतु इस्लामी अॅटम बाँम्ब बनवू' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. जनरल झियानी त्यांची ही इच्छा थोड्याबहुत प्रमाणात पूर्ण केली, मग त्यांची ही कन्या वडिलांच्या विचाराविरूध्द कशी जाईल?

आपल्या उत्तर प्रदेशापेक्षाही कमी लोकसंख्या असलेल्या पाकिस्तान राष्ट्राची १६ नोव्हेंबर १९८८ रोजी संसदेची सार्वत्रीक निवडणूक झाली. जगातील सर्व वृत्तपत्रांनी, वृत्तसंस्थानी त्याला ठळक प्रसिध्दी दिली. कारण माजी पंतप्रधान झुल्फिकार अल्ली भुट्टो यांची १९७७ साली झालेली फाशी व त्यानंतरचा ११ वर्षाच्या हुकूमशाहीचा शेवट म्हणून ही निवडणूनक ओळखली जाते.

एप्रिल १९७९ मध्ये घारी खुदाबक्ष येथील आपल्या पित्याच्या म्हणजे झेड. ए. भुट्टो यांच्या कबरीला भेट दिल्यानंतर 'पाकिस्तानात लोकशाही प्रस्थापित होईपर्यंत शांत बसणार नाही' अशी शपथ पाकिस्तानात 'पिंकी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेनझीर भुट्टो यांनी घेतली होती.

बेनझीर भीट्टो यांना आपल्या पित्याचे स्वप्न साकार करायचे होते. त्याचा बदला त्यांनी या निवडणूकीत रथी - महारथीना जमीनदोस्त करून व स्वतः तीन ठिकाणी प्रचंड मतांनी विजयी होवून घेतला. यावरून झियांच्या जाचक बंधनात अडकलेला पाकिस्तानी समाज आज ३५ वर्षे वयाच्या तरुण स्त्रिच्या मागे उभा ठाकला आहे हे दिसून येते. भुट्टोंच्या राजवटीत ज्या कासुरी यांची हत्या झाली होती व त्यातुनच भुट्टोंना फाशी झाली होती त्या कासुरींचा मुलगा 'अहमद रझा कासुरी' हा लाहोरमध्ये बेनझीरचा प्रतिस्पर्धी होता. त्याचा दारूण पराभव झाला. पाकिस्तान राष्ट्रीय असेंब्लीच्या निवडणुकीत २०४ जागापैकी ९२ जागा पाकिस्तान पीपल्स पार्टीने जिंकल्या व पै. (पैगंबरवासी) झिया यांनी नियुक्त केलेल्या काळजीवाहू मंत्रीमंडळातील जवळ जवळ एक तृतीयांश मंत्र्यांना पाकिस्तानी जनतेने मतपेट्यद्वारे घरीच बसविले. या निवडणुकीनंतर पाकिस्तानचे नवे पंतप्रधान कोण? याविषयी लोकांत उत्सुकता निर्माण झाली होती व त्याबाबत विविध अंदाज व्यक्त केले जात होते. परंतु त्या सर्वांवर बेनझीर यांनी मात केली व त्या पंतप्रधान बनल्या.

बेनझीर भुट्टो यांनी पाकिस्तानी राजकारणात प्रवेश केल्यापासून पंतप्रधान बनेपर्यंत त्यांचे जीवन पाहिले तर तो एक सूडाचा प्रवास आहे असेच दिसून येते. मरणाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या आपल्या पित्याला भेटण्यासाठी बेनझीर आपल्या आईसमवेत गेल्या असता या मायलेकींना पाकिस्तान सोडून जाण्याचा सल्ला त्यांच्या पित्यानी दिला. तेव्हा बेनझीर आपल्या वडिलांना म्हणाल्या- "आम्ही हा देश सोडून न जाता तुम्हाला फाशी देणाऱ्याशी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू!" आणि आपल्या वडिलांना दिलेले हे वचन बेनझीर व त्यांच्या आई बेगम नसरत भुट्टो यांनी अक्षरशः पाळले. पित्याच्या फाशीनंतर स्वतःच्या जिवाची पर्वा न करता त्यांनी पाकिस्तानात व परदेशात राहून चळवळी केल्या. आणि मरहूम झियासारख्या लष्करी हुकुमशहालादेखील नमवून निवडणुका घोषीत करण्यास भाग पाडले.

निवडणुकीच्या ऐन मुहुर्तावर बेनझीर यांनी 'डॉक्टर ऑफ द ईस्ट' हे आत्मचरित्र लिहून मतदारांची सहानुभूती मिळवली. आंपल्या विवाहानंतर आपल्या बाळंतपणाची तारीख गुप्त ठेवण्यातही बेनझीर यांनी विलक्षण 'गुप्तता' राखली, कारण झियांना ही तारीख माहित असती तर ऐन बाळंतपणाच्या दिवशीच त्यांनी निवडणुका जाहीर केल्या असत्या, परंतु झियाना त्यांचा काही थांगपत्ता लागला नाही आणि झियांवर काळाने असा कांही सूड उगवला की निवडणुकीपूर्वीच झियांचे विमान कोसळले आणि त्यातच त्यांचे निधन झाले. आणि आडचणीशिवाय बेनझीर निवडून येवू शकल्या. एक इस्लामी महिला हातात सरकार सुत्रे घेते ही इस्लामी जगतातील महत्त्वाची क्रांती घडून आली.

जनरल झिया हे पाकिस्तानातील कोणत्याही राजकीय व्यक्तीपेक्षा बलिष्ठ होते. सतत आकरा वर्षे त्यांनी अनेकांना झुंजत ठेवले. भुट्टो हे त्यांचे खरे प्रतिस्पर्धी. त्यांचा त्यांनी काटा काढला पण भुट्टो कन्या बेनझीर त्यांचा 'राजकीय मृत्युकाल' म्हणून वाढत होत्या. त्यांनाही चकवण्याचा त्यांनी बराच प्रयत्न केला व अखेर आपघाती निधनाने ते इहलोकातून निघून गेले आणि बेनझीर यांना प्रधानमंत्री बनण्याचा चान्स मिळाला. आता बेनझीर यांनी आपले मंत्रीमंडळ ही जाहीर केले आहे, परंतु-

"क्या हुआ तेरे को?" झरीनाचा प्रश्न

आता मात्र अब्दुल तडकलाच.

"मेरे उपर सवाल करती क्या?" अस म्हणून त्यानं तिचे केस पकडले.

"अयोऽऽ अमां!" झरीना किंचाळली. तशी रोशन घरातून पळत बाहेर आली, अन् झरीनाला आपल्याकडं ओढू लागली. तसा अब्दुल जास्तच तापला. अन् पायातला बूट काढून त्यानं रोशनला मारण्यास सुरूवात केली. मात्र तिन हूँ का चूं केलं नाही. इकडे झरीना भितीने कापायला लागली. त्यातच मुन्नू, छोटा सिकंदर अन् हसीना रडायला लागले. ती चार भावंडं बापाचं शर्ट ओढत होती. झरीना बापाचा हात पकडण्यास गेली पण त्याच्या ताकती पुढं ती तिरमीरी येऊन पडली. शेजाऱ्यांना हे कायमचच होतं. दया येवूनही कांही कामाचं नव्हतं. जो तो बघ्याची भूमिका करत होता. मदतीच्या अपेक्षेने झरीना फक्त बघतच होती. बघून लोक फक्त जातच होते. शेवटी शेजारच्या पैलवानाच्या शिवीनं अब्दुल शांत झाला. रोशनला भरपूर लागलं होतं. ती कशीबशी झरीनाचा आधार घेवून आत गेली. पोरं मुसमुसून रडत होती. त्यांच्या अंगाचा थरकाप अजून थांबला नव्हता. झरीनाही हुंदके देत होती. रोशननं एका फाटक्या पोत्यावर आपली पाठ टेकवली अन् म्हणाली, "बेटा रो मत! तू रोयी तो हमरे बेटे का क्या होगा?"

झरीनालाही माहीत होतं 'रोनेवालों की दुनिया नही होती' अब्दुलनं घरात काय असेल नसेल ते खाल्लं अन् बाहेर निघून गेला. तशी चारी कोपऱ्या पडलेली निष्पाप, निरागस चेहऱ्याची मुलं एकत्र आली. अन् आईजवळ येवून फक्त तिचा निर्विकार चेहरा पाहू लागली. त्यांना कोंडं होतं हे सर्व आपली आई सहन करते कसं?

रात्र झाली, सगळं कसं सामसूम होतं. झरीना अंथरूणात तळमळत होती. तिला झोप कसली ती लागत नव्हती. त्या भयाण शांततेत मध्येच दार करकरलं. आपल्याकडं कोणीतरी येत असल्याच झरीनाला जाणवलं. तोंडावरल्या ती चादरीच्या भसक्यातून बाहेरचा कानोसा घेत होती. अब्दुल काहीतरी शोधत येत होता. त्याच्या हातात छोटा चाकू होता. त्यानं मुन्नूचा गळा चाचपला. गळयातील काळ्या दोऱ्यात चाकू घालून त्याने तो अलगद कापला. दोऱ्यात सोन्याचा चंद्र होता. झरीनाच्या अंगाला भीतीनं घाम फुटला. ती काहीच बोलली नाही. अब्दुल जाण्यास निघाला. तशी झरीना उठली अन् त्याच्या मागून गेली. अन् सोन्याचा चंद्र देण्यास विनवण्या करू लागली. पण तिला तो झिडकारून तसाच निघाला. झरीना आपल्या जाग्यावर आली. अन् मुन्नूच्या निष्पाप चेहऱ्यावरून नजर फिरवली. तिला क्षणभर वाटलं स्वतःच्या सुखासाठी इतर निष्पाप जिवांना त्रास का? नियतीचा खेळच काही कळत नव्हता. ती तशीच पडून राहीली. विचारांची चक्रे फिरत होती....... एक वेळ आपल्यावर जीवापाड प्रेम करणारा बाप असा क्रूर झालाच कसा? कल्पनाच करवत नव्हती. एकदा तर मुन्नू उरसात हरवला होता तर त्यानं आकाश पाताळ एक केलं होतं. अन् आता आपल्याच पोटच्या पोरांना अन्नान्न दशा करण्यास मागपुढं पाहत नव्हता.

कावळे करकरलं. झरीना उठली. सर्व झाडलोट करून ती अभ्यासाला बसली. तशी सर्वजण उठले. ती कोणाशी काही बोलली नाही. अब्दुल घरात नव्हता अन् कधी न्हसायचाच मुळी. समोर राधाबाईच्या घरात कसली तरी धांदल चालली होती. बांधाबांध चालली होती. बहुतेक कुठेतरी गावी जाण्याचा बेत असावा. राधाबाईनं दाराला कुलूप घातलं अन् पुंटपूटली, "आता रामाचं राज कर म्हणावं."

अचानक जाण्याचे कारण काय? मात्र रात्री तिच्या घरी कोणीतरी येवून गेलं होतं. पुढं राधाबाई खांद्याला पर्स अन् हातात 'लेडी छत्री' घेवून चालली होती. दोन पोरं पिशव्या सांभाळत पळत होती. अन् मागून अब्दुल एका पोत्यात ओझं भरून घेवून जात होता.

मुन्नूनं आंघोळ केली अन् मशीदीकडे निघून गेला. दोन्ही हाताचे तळवे पसरून अन् गुडगे टेकवून अल्लाकडे आपली किस्मत मागत होता. नंतर उठून त्यांने गळ्यातील सोन्याच्या चांदला हात लावला अन् तो भितीनं गर्भगळीत झाला. त्याच्या अंगास कंप सुटला. हातपाय कापू लागले. तो कसाबसा घरी गेला. तीन चार दिवसाची उपासमार. एकही दिवस धड जेवण पोटात गेलं नव्हतं. तो घरी पोहचला अन् त्याला चक्कर आली. तो धाडकन् खाली कोसळला.

मुनीर पूर्णपणे शुध्दीवर आला तेव्हा तो एका आपल्या फाटक्या नशीबासारख्याच फाटक्या गोधडीवर पडलेला होता. त्याच्या अंगात ताप होता. डॉक्टरनां कोणीतरी बोलवलं. डॉक्टरनी इंजेक्शन् दिली अन् सवयीप्रमाणे औषधेही लिहून दिली. जी आपणं शक्यं नव्हती. सर्व वातावरण भकास बनलं होतं. झरीनाची नजर जिथं जाईल तिथं विलक्षण भितीचा भास होत होता. छप्पर पाहिलं, भिंती पाहिल्या सर्वच आपल्याला गिळण्यास 'आ' वासून बसलेली दिसत होती.

रोशननं न राहवून जवळच्या पैलवानला विनंती करून अब्दुलचा पत्ता काढण्यास सांगितला. त्यानं तिला धीर दिला. त्याला कोणीतरी सांगितलं अब्दुल व राधाबाई हलकर्णीला आहेत. म्हणून तसा त्यानं त्याला एक सांगावा पाठवला. दोन दिवस गेले. अब्दुल आलाच नाही. आठवडा झाला, अब्दुल येणार असल्याचं फॅक्टरीतल्या एका ट्रक ड्रायव्हारनं सांगितलं. पण आता त्याच काय उपयोग होणा होता?..... मुन्नू हे जग सोडून केव्हाच गेला होता. सर्व वातावरण शोकव्कूल झालं होतं.

अब्दुल गावात आला असं कोणीतरी बोललं. अन् रोशनच्या काळजात चर्रर झालं. पण झरीना मनातून पेटून उठली होती. जन्मदाता बापच आपल्या मुन्नीरच्या खुनी आहे, असं तिला सतत वाटत होतं. अब्दुल काहीच बोलला नाही. अंत्यविधी आटोपला. अन् दुसऱ्याच दिवशी सगळ्यांना वाऱ्यावर सोडून निघून गेला. झरीना त्याच्या जाण्याकडं निराशेनं बघतच होती. किती दिवस रोशन गुढग्यात तोंड लपवून शोकावस्थेत बसणार होती? शेवटी पोटाचा प्रश्न होताच. गाव फक्त तमाशाच बघत होतं. नको त्या गोष्टीवर चर्चा करत होतं. पण खरी स्थिती काय हे कोण शोधत नव्हतं. ज्या संसारात पुरूषाची जोड नाही तो बुंधा नसलेला वृक्षच. पाणी नसलेली विहीर, जिच्यात कोणी जीव डोकावणार ही नाही, असे नाना विचार रोशनचं डोक फिरवून सोडत होते.

०*०*०*०* 'दिवेलागण' झाली. कामेवाडी बस गाव सोडून केंव्हाच आपल्या ठिकाणी निघुन गेली होती. अनेक दिवसांच्या वास्तव्यानंतर अब्दुल घरी येत होता. त्याच्या कृत्यांना इथंच कुठंतरी 'वळण' मिळालं होतं, हेच रोशनला खरं गूढ होतं. वाट पाहून थकलेल्या झरीनाला बाप येण्याची उत्सुकता होतीच. ती अन् रोशन त्याचे सारे आपराध पोटात घेवून त्याला आपला म्हणणार होती. घराकडची उंच वळणावळणाची वाट चढत असलेलं कोणीतरी दिसत होतं. झरीना फक्त पहातच होती.

"बेटा! क्या देखती हो?" या प्रश्नानं ती भानावर आली. "अं!" अब्दुल मनातून चाचपडला. आपण एक कोणीतरी काळ असावा असं त्याला वाटू लागलं होतं. भीतीच्या गैर समजूतीनं कोणीच त्याच्याशी बोललं नाही.

तांबडं फुटलं मशीदीमधून येणारा आवाज सर्वांच्या कानावर पडला. तशी सर्व उठली. अब्दुलनं झरीनाला पाणी तापवण्यास सांगितलं. तिने ते मुकाटपणे केलं. अब्दुल आपल्या दैवाला हसला. त्यानं आंघोळ केली व मशीदला जावून आला. सूर्यदेव वर आला.

सोनेरी किरणांत गाव न्हावून गेलं. माणसाच्या धावपळीला सुरूवात झाली. बाजारपेठ गजबजू लागली. आज अब्दुलनं गॅरेज उघडलं. सकाळचे दहा वाजून गेले. उन्हं तापली. रस्ते वाळले. अब्दुल गॅरेजमधल्या तुटपुंज्या साहित्याची जमवाजमव करून व्यवस्थित मांडणी करत होता. इतक्यात कोणीतरी आपल्याला हाक मारतय असं वाटून अब्दुलन तिकडं नजर फिरवली. झरीना एका हातात न्याहरीचा डब्बा अन् दुसऱ्या हातानं छोट्या सिकंदरला सांभाळून उभी होती. क्षणभर अब्दुल बघतच राहीला. त्याला सिकंदरच्या जागी मुनीर असल्याचा भास झाला. त्याचे डोळे पाणावले. फार दिवस गायवासराची ताटातूट होवून एकाएकी भेटीने पान्हा फुटावा तसं त्यानं हात पसरलं. झरीनाच बोट सोडून सिकंदर त्याच्याकडं धावला. मुन्नीरला घेतल्यासारखं त्यानं त्याला कवटाळलं. झरीनाचं मन गहिवरून आल. ती म्हणाली, ''आब्बा, ओ आब्बाजान खाना ठंडा होग.'' तसा तो विचाराच्या तंद्रीतून जागा झाला.

इतक्यात मोठ्या आवाजात कोणीतरी ओरडलं, ''च्यायला! माझ्या सायकलीचं वाटोळं होवून वरीस झालं. दोन्ही चाकं औट हाईत. आजपासून हिला नवीन सामान बसवून सुखात प्रवास करतो.'' पैलवानच्या ह्या बोलण्यावर अब्दुल क्षणभर हासला. अन् सायकल हातात घेवून ती दुरूस्त करण्यात मग्न झाला.

आचानक आभाळ भरून आलेलं, झरीनाचे डोळे आनंदाश्रुंनी भरले होते. थंड वारा अंगाला गुदगुल्या करून जात होता. वाऱ्याबरोबर झाडांची पान. आनंदानं सळसळत होती. वाऱ्यावरची धूळ डोळ्यात जावू नये म्हणून पैलवानानं आपले डोळे गच्च मिटून घेतले. अब्दुलनं सिकंदरला जवळं ओढलं. झरीना हे सर्व भरल्या डोळ्यांनी पहातच होती. टपकन दोन थेंब खाली गळले. अन् पावसाची एक सर सरसरत येवून उडणाऱ्या धुळीला थोपवून मातीला सुगंध देवून गेली.

## मी सलाम ठोकणार आहे!

आज सगळेच झालेत मोकळे
माझ्यातल्या 'मी' ला जाळून
सगळेच झाले आहेत परागंदा
घोंगड्यात गुंडाळलेल्या
लक्तराला जामीन ठेवून
झालेच पेटलेत सरणावर
मलाच बाकी ठेवून

दारोदारी मी हिंडतोय
लक्तर होवून
माझ्यातल्या इंधनाला
मीच उकलोय सर्वस्वी पेटवून

घाणेरड्या हातांनी मजा
केलीय आज
शरमेने मान खाली घालून
माझ्यातला 'मी' च टाहो फोडतोय
वृत्शृंखल हातांना
स्फूर्ती देवून
माझ्यातला 'मी' परागंदा झालाय
लहळलहळणाऱ्या क्षणांना
शापहीन करून

आंधारच दाटलाय सर्वत्र
केकावल्याच्या स्वरांनी
आकाश फाटावा तसा
मीच संपूर्ण करपलोय
आजच्या स्मशानातल्या होळीत
माझ्यातल्या 'मी' ला जाळून

आजूनही गोवर जळते
साठलेले श्वास घेवून
माझे पंख जागे झालेत
छाटले तरी
निरभ्र आकाशात भरारी मारण्यास
मलाच घेवून चाललेत ते
दिगंतराच्या आंधारातून
मुक्ततेच्या श्वासांचा
निरोप घेवून.

सारेच उठलेत मला गिळायला
लाल ओठातून शब्द फुटत
आता मीच ठोकणार आहे सलाम
माझ्यातल्या 'मि' ला.

सुंदरसिंह हजेरी
११ वी सायन्स

## आठवणी

तुला विसरण्याचा प्रयत्न करतोय
पण मन काही साथ देत नाही
म्हणून तुझ्या आठवणीच्या प्रमसागरात
मी हेलकावत चाललोय......
तुझ्याकडे धाव घेण्याचा प्रयत्नही केला
पण पावलांनी साथ दिली नाही
वाटल होत, तू येशील माझ्याजवळ
अन् भिडवशील डोळे-डोळ्यांना
पण ते केवळ स्वप्नच होईल
केवळ स्वप्नच होईल.

किरण हुंदळेकर
११ वी सायन्स

## अंधाऱ्या रात्रीत

अंधाऱ्या रात्रीत प्रितीची नशा आहे
संकोचल्या मनांत लाजेचा भाव आहे
अंधाऱ्या रात्रीत भावनेचा झरा आहे
मिलनोत्सुक मनांला काजव्यांचा प्रकाश आहे
अंधाऱ्या रात्रीत देहांची साथ आहे
भयाण कोठडीत जशी फडफडती वात आहे
अंधाऱ्या रात्रीत मिलनाची आस आहे
धडधडत्या छातीत भ्रितीचा भास आहे

अनंत पाटील
अकरावी (सायन्स)

## तुझ्या मुळे

गीत हे स्फुरले, मनात रमले,
चित्त हे हरले, तुझ्यामुळे!
देह हा फुलारला, गंध वेडा झाला
सुगंधात न्हालां, तुझ्यामुळे!
कशी जादू केली, बंधने तुटली,
अनिर्बंध झाली, तुझ्यामुळे!
होई जिवा हर्ष, होता तुझा स्पर्श
मन हे बदलले, तुझ्यामुळे!

विजयकुमार सुरंगे
बी कॉम, भाग -१

# वळण

अरूणकुमार सुर्वे
वाणिज्य भाग-२

नुकताच पावसाचा नाच संपला होता. थोडं सांजावलं होतं. 'चंदगड-कामेवाडी' बसचे दिवे आपलं प्रतिबिंब निट्ठुरच्या रस्त्यात न्याहाळत पुढे पुढे धावत होते. केव्हापासून लक्ष्मीपुरीच्या टेकडीवरच्या एका छपराखाली दोन चिल्लीपिल्ली अन् पंधरा वर्षाची झरीना आपल्या बापाची वाट पहात उभी होती. दररोज संध्याकाळी हेच घडायचं. आर्त नजरेनं ज्याची वाट पाहीली जायची, तिथं निराशेचा अंधार सर्वच आशा गिळून बसायचा.

गाडी वेशीत शिरली तशी झरीनाची नजर आपल्या भावंडावरनं फिरली. ती अगदी बापाच्या येण्यानं खूष होती. मात्र झरीनाला वेगळीच चिंता लागून राहीली होती. आपला बाप येणार अन् घरात काय काय घडणार याची तिला भिती वाटत होती.

अशा कित्येक घटना तिच्या डोळ्यादेखत घडल्या होत्या त्यांच्या नुसत्या आठवणीने त्या कुमारीकेचं काळीज चिरत होतं.....०*०*०* बाहेरच्या कसल्यातरी आवाजाने झरीना जागी झाली. कडक उन्हात कोणीतरी दोन बाया कोकलत होत्या. झरीना कशीबशी उठली. जवळ झोपलेल्या मुन्नूच्या निरागस चेहऱ्यावरील माशा हुसकल्या अन् तोंडावर पांघरूण ओढून ती आजारी अवस्थेत तशीच बाहेरचा गोंधळ पाहण्यास निघाली. झरीना बाहेर आली अन् तिला कससूच झालं. तिची आई एका खाष्ट बाईशी भांडत होती. ती राधाबाई होती. तिनेच झरीनाच्या घरची विल्हेवाट लावली होती. तिचं घर झारीनाच्या घराच्या समोरच होतं. राधाबाईनं आपल्या घराच्या छपरावर एका काठीला डावं पायतान अडकवलं होतं. त्याच दिशेने बोट करून ती कोकलत होती, ''माझ्या सवते, ते बघ सकाळच्या पारी माझ्या खेटराचं दर्शन तू घ्यावं म्हणून बांधलय!''

तशी झरीनाची आई रोशन बोलली, ''अगं! ते तुझ्या गळ्यात बांधून घे. पण तू माझ्या संसारात बिब्बा घालू नको.''

गळ्यात बांधायच्या भाषेवर राधाबाई तडकली. अन् पायातला एक दगड उचलून तिने रोशनच्या दिशेनं भिरकावला. तो राशनच्या कपाळावर बसला अन् खोच पडून रक्त येऊ लागलं तशी ती मटकन खाली बसली. ह्या प्रकाराने झरीना कावरी बावरी झाली. पण रागानं ती बेभान होवून राधाबाईच्या अंगावर धावून गेली. पण इतक्यात तिला कोणीतरी धरून दूर ढकलून दिलं. तशी तिला चक्कर आली अन् ती घरच्या कट्ट्यावर जावून आदळली. काही क्षण तिला काहीच कळलं नाही. तिला दूर ढकलणारं दुसरं तिसरं कोणी नसून तो तिचा बाप होता, 'अब्दुल'. तो येताच राधाबाईला भलताच फोर्स चढला. कारण तो तिचा मिंध्येदार होता.

माणूस आपल्या वासनांसाठी नाती विसरतो, कर्तव्यं विसरतो, अन् अखेर सर्वच विसरतो. अन् स्वतःचा संसार स्वतःच्या हातानेत मातीखाली गाढतो. तो दिवस निघून गेला.

दुसरा दिवस अनेक संकटं सोबत घेवून उजाडला. अब्दुल काहीतरी शोधत होता. ते न सापडल्यामुळं आदळ आपट नि शिवीगाळ करत होता. सारं वातावरण स्तब्ध होतं. अखेर त्याला गॅरेज मधली अखेरची सायकलची घंटी सापडली. तसा तो पळत मटण मार्केटमध्ये गेला. कारण मार्केट मालकाला तिची गरज होती. त्याच्या हातात घंटी ठेवत अब्दुल म्हणाला,

''बाकी उधारी पुढच्या आठवड्यात देतो.'

''बरं!'' एवढेच बोलून त्याने मटणाचा डब्बा अब्दुलच्या हाती दिला. हातात आलेला डब्बा घेवून अब्दुल घराकडीची वाट मोठ्या खुषीत चालू लागला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघून विठू खाटकी बोलला,

''मालक, एक विचारू? ह्यो अब्दुल्या लास कशान आला?''

''मायला! आमच्या सारखं पिनं बी न्हाय''

त्यावर मालक डुरकावला,

''नसत्या चांभार चौकशा कशा पाहिजेत तुला?''

''तरी पण, जलमाचं वाटोळं करणारं त्येचं कोण हाय?'' सवय जात नाही, मन राहत नाही म्हणून ओशाळून विठोबानं प्रश्न केलाच. त्यावर मालक त्याच्या कानाजवळ येवून पुटपूटला, ''बाई!''

अन् त्यावर दोघेही मार्केटच्या पत्र्यावर गारांचा पाऊस पडावा तसे हसले.

अब्दुल आपल्या घराकडे न वळता सरळ राधाबाईच्या घरात शिरला. साहजिकच होतं. कारण तो तिचा होता अन् ती त्याची होती,.... नक्की माहीत नाही, ती कुणाची होती.

खरोखरच राधाबाई वीशीच्या घरातील एक सुंदर तरूणी होती. बहिरंगावरून ती एक सोज्वळ साधवी वाटावी. कोणत्याही नवख्यानं पहावं अन् तिच्यावर बेमालूम फिदा व्हावं. तिचा पती एक प्राथमिक शिक्षक. खरोखरच सन्मानानं जगणाऱ्या अनेकांचे संसार सरळ मार्गाला लावून देणाऱ्या देवमाणसाला व्यभिचार एक आचार बनलेला पहावत नाही. तो जगणंसुध्दा नाकारतो. त्याचं तसच घडलं होत. कारण ती कल्पना ही सहन होणारी नव्हती.

आजपर्यंत सुखासमाधानानं चाललेल्या संसाराला अचानक कोणत 'वळण' लागावं अन् संसाराचा रथ भरकटत जावून त्याची चाकं इतस्ततः जावून पडावीत अन् त्याची पुढची वाटचाल तिथच संपावी. आजपर्यंत अनेकांचे विश्वास त्या थोर पुरषानं संपादन केले होते. त्याच्या प्रतिष्ठेबद्दल, समाजातील विशिष्ट स्थानाबद्दल पुऱ्या भागात वाहवा होती.... पण का? कुणास माहित!..... अचानक एक दिवस त्यानं आपल्या पत्नीला माहेरी पाठवलं नि आपल्या जीवनाचं दार कायमचं बंद केलं अन् दुसऱ्याच्या सुखातला अडसर दूर केला. लोक हे कोडं उकलूच शकले नाहीत.

राधाबाई आता एक मोकाट पाखरू बनली होती. मन मानेल तसा ती विहार करत होती. अन् अनेकांच्या संसाराची धूळदाण करीत होती.

दिवस मावळला. घराघरांच्या कौलातून धूराचे लोट बाहेर निघू लागले. रोशनच्या घरावरील सोन्याचा धूर कधीच शांत झाला होता. अन् तिथं साध्या धुरालाही जागा नव्हती. आजपर्यंत माहेरीही नाही अन् इथं सुध्दा नाहीत इतकं कष्ट तिला करावं लागत होतं. कुणाच्या शेताची भांगलणा, कुणाच्या घरची झाडलोट, सारवण अखेर भांड्यापर्यंत तिला करावं लागत होतं. ती एक श्रीमंत बापाची मुलगी होती. पण एक मात्र खरं. तिनं इकडच्या गोष्टीबद्दल कधीच काही काडीमात्र तिकडं कळवलं नव्हतं. जरी तिच्या बापाचं पत्र आलच तर ती आपण इकडे बिलकूल आरामात आहे एवढेच लिहायची. मात्र पत्रावरची अक्षरं अनेक आसवांनी वेडीवाकडी व्हायची.

अब्दुल बाहेरून कोकलतच आला. संध्याकाळच्या शांत वातावरणात झरीना घराच्या कठड्यावर अभ्यास करत बसली होती. बापाची चाहूल लागताच झरीना सरळ बसली अन् डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे पाहू लागली. तरी तो बोंबललाच, ''किधर गयी?''

पण तिचा उलटा प्रश्न आला, ''कौन?''

''तेरी माँ,'' अब्दुल गरजला.

या निवडणुक प्रचाराच्यावेळी बेनझीर यांच्या विषयी ज्या असभ्य गोष्टींचा प्रचार केला तेवढा असभ्य प्रचार अन्य कोणत्याही देशातील निवडणुकांमध्ये केला गेला नसेल निवडणुक प्रचाराच्या काळात या भुट्टो माय-लेकींविरूध्दच्या गैरप्रचाराला ऊत आला होता. निवडणुक प्रचारावेळी नसरत भुट्टो यांना पाकिस्तानी वृत्तपत्रामधून अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष 'फोर्ड' याच्याबरोबर नृत्य करताना दाखविले, तर बेनझीर यांना लंडनच्या 'बॉयफ्रेंड' सोबत ऐश करताना दाखविले गेले तर गर्भपाताच्या वस्तुंच्या मॉडेलसाठीही त्यांचा प्रचार करण्यात आला. तसेच त्यांना भारताची एजंट असेही म्हटले गेले. त्यांना समाजद्रोही व देशद्रोही अशी संज्ञा देण्यात आली, पण काळाचा महिमा अगाध आहे. कारण ज्या समाजद्रोही व देशद्रोही ठरविल्या गेलेल्या बेनझीरलाच त्या देशाने प्रतप्रधान केले आहे.

पाकिस्तानच्या या निवडणुकीने सुधारणावाद्यांना प्रोत्साहन दिले आहे, कारण पाकिस्तानच्या निकालाचा परिणाम केवळ भारतातील मुस्लीमावर पडला आहे एवढेच नव्हे तर या निकालामुळे साऱ्या जगातील इस्लामी धर्मांधांना धक्का पोहचला आहे. इराण-इराक युध्दविरामामुळे ज्याप्रकारे इराणचे दात घशात बसले व खोमेनीसारख्या धर्मांध नेत्यांचा भ्रमनिरास झाला. त्याचप्रमाणे या निकालामुळे भारतीय उपखंडातील अनेक मौलवींचा भ्रमनिरास झाल्याशिवाय राहणार नाही. खोमेनीच्या पराभवानंतर पाकिस्तानी निवडणुकींच्या निकालांनी धर्मांधांना दुसरा जबरदस्त धक्का बसला आहे. पाकिस्तानच्या साऱ्या मशिदीतून ज्यांचे धार्मिक ग्रंथ वाचले जातात त्या 'शाहनुरानी' पासून 'पीर पगारांपर्यंत' सर्व धर्मांध नेते या निवडणुकीत पराभूत झाले आहेत. राजकारणात स्त्रीला स्थान नाही असे कालपर्यंत म्हणणारे मुल्ला आज बेनझीरकडे सत्ता सुपूर्द करण्यातसाठी शिफारस करीत आहेत. संपूर्ण भारतीय उपखंडाला इस्लामच्या हिरव्या रंगात रंगवून काढण्याची स्वप्ने पाहणारी व दिल्ली आणि मास्कोवर इस्लामचा झेंडा फडकविण्याची भाषा करणारी मौलांना मौदूदींची 'जमाते इस्लामी' चीतपट झाली . याचा सरळ अर्थ असा होतो की, पाकिस्तानची सर्वसाधारण जनता मुल्लांच्या मुठीत नाही. या जनतेला आस आहे ती सहाव्या शतकातला पाकिस्तान बघण्याची नव्हे तर २१ व्या शतकातील पाकिस्तान बघण्याची!

पाकिस्तानच्या निवडणुकीने हेही सिध्द केले आहे की पाकिस्तानी महिला राजकारणात भाग घेवू शकते एवढेच नव्हेंतर आपल्या नेतृत्वाखाली एका स्वतंत्र राजकीय पक्षाची निर्मीती करून त्या पक्षाला विजयीही करू शकते. सध्या बांगला देशातही 'हसीना जावेद' व 'बेगम झिया' या दोघी महिला हुकुमशहाविरूध्द कडवी झुंज देत आहेत. पाकिस्तानच्या निकालामुळे त्यानांही जोम येईल व बांगला देशातही लोकशाहीचे वारे वाहू लागतील अशी शक्यता आहे. कदाचीत त्याही देशात महिला पंतप्रधान लाभू शकेल. आपल्या पित्याच्या खुन्याकडून बेनझीर यांनी सत्ता हिरावून घेतली. खोमेनींच्या राजवटीतही इराणी महिलांनी आपल्या अधिकारासाठी किरकोळ अंदोलने केली व भरचौकात बुरख्यांची होळीही केली. यातून एकच गोष्ट स्पष्ट होते की इस्लामी देशात क्रांतीची सूत्रे महिलांच्या हातात राहतील व भारतीय मुस्लीम महिलांवरही त्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही आणि 'दहेज' व 'तलाक' याविरूध्दचा त्यांचा आवाज अधिक बुलंद होईल व आजची शहाबानो ही उद्याची बेनझीर झाल्याशिवाय राहणार नाही.

बेनझीर या शब्दाचा अर्थ उर्दूमध्ये 'अद्वितीय', 'विलक्षण' असा होतो, व आपल्या नावाप्रमाणेच बेनझीर यानी पाकिस्तानच्या राजकरणात अद्वितीय, विलक्षण असा इतिहास निर्माण केला आहे. बेनझीर यांचा जन्म २१ जून १९५३ मध्ये कराचीत झाला. त्यांच्या तांबड्याबुंद रंगामुळे त्यांना 'पिंकी' हे टोपणनाव मिळाले त्यांचे प्राथमिक शिक्षण पाकिस्तानात झाले. १६ व्या वर्षी त्यांना अमेरिकेच्या हॉवर्ड (हरवर्ड) विद्यापिठात पदवी शिक्षणासाठी पाठविण्यात आले. तेथून त्या ऑक्सफोर्डला गेल्या आणि तिथे त्यांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि फिलॉसॉपिचा आभ्यास केला. त्याचवेळी त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात विद्यार्थी चळवळीत भाग घेतला व ऑक्सफर्ड-युनियन डिबेटींग सोसायटीच्या त्या अध्यक्षपदी निवडून येवून राजकारणात आपली गती असल्याचे त्यांनी दाखवून दिले. १९७७ मध्ये त्या पाकिस्तानात परत आल्या. त्यांना पाकिस्तानच्या परराष्ट्र खात्यात नोकरी करायची होती, पण झिया-उल-हक्कने त्यांच्या वडिलांना अटक केल्यापासून थोड्याच दिवसात त्यांच्या सुटकेसाठी त्यांनी चळवळ सुरू केली. आणि देशात लोकशाही यावी यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यासाठी त्यांना अनेकवेळा कारावासात जावे लागले. १९८५ मध्ये झियांनी देशातील लष्करी कायदा मागे घेतला, आणि लोकनियुक्त सरकारला वाट करून दिली. झियांच्या जुल्मी कारभाराविरूध्द रान उठवायला हीच संधी आहे असे जाणून त्यांनी १९८६ च्या एप्रिल महिन्यात पाकिस्तानात प्रवेश केला. त्यांचे हजारो लोकांनी ठिक-ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत केले. त्यांना विमानतळापासून आठ मैलावर असलेल्या लाहोर शहरात पोहचायला १० तास लागले. यावरून त्यांच्या स्वागतास किती लोक जमले असावेत याचा अंदाज येईल. झियांनी जुलै महिन्यात नव्याने निवडणुका घेण्याची घोषणा केली पण त्या पक्षातीत निवडणुका असतील अशी घोषणा करून झियाने बेनझीर यांना निवडणुकीपासून वंचीत करण्याचा प्रयत्न केला. पण राजकारणात यावेळेपर्यंत निपुण झालेल्या बेनझीरने झियांना चांगलेच चकविले.

१८ डिसेंबर १९८७ योजी बेनझीर यांची 'असिफ झरदारी' यांच्याबरोबर शादी झाली. राजकारणातील अविवाहीत स्त्री विवाहबध्द झाली की तिचे 'राजकारण' संपते किंवा संसारी स्त्री राजकारणात उतरली की तीचे खाजगी आयुष्य संपते असे म्हणतात, परंतु बेनझीर यांनी आपले खाजगी आयुष्य व राजकारण स्वतंत्र ठेवले. शादी होवुन नऊ महिने संपण्यापुर्वीच त्यांना पुत्ररत्नही झाले व एक वर्ष होण्यापुर्वीच त्या पंतप्रधानसुध्दा बनल्या व पाकिस्तानमध्ये जी गोष्ट होईल याची शक्यता नव्हती ती त्यांनी शक्य करून दाखवली. त्यामुळेच झियांच्या ११ वर्षाच्या जुलुमाचे फळ म्हणून पाकिस्तानी जनतेने बेनझीरच्या रूपाने एक 'रझिया'च जन्मास घातली असे वाटल्यास आश्चर्य वाटणार नाही.

बेनझीर भूत्तो या आज एक शूर तरूणी म्हणून विश्वविख्यात झाल्या असल्या तरी भारताशी त्यांची वागणूक कशी राहील हे आजच सांगता येणार नाही. कारण भारतीयांना 'भुंकणारी कुत्री' म्हणणाऱ्या झुल्फिकार भुट्टो यांच्या त्या कन्या आहेत. भारताविरूध्द एक हजार वर्षे युध्द करण्याचे भुट्टो यांनी सांगितले होते. 'गवत खाऊ परंतु इस्लामी ॲटम बॉम्ब बनवू ' अशी त्यांची प्रतिज्ञा होती, जनरल झियांनी त्यांची ही

इच्छा थोड्याबहुत प्रमाणात पूर्ण केली, मग त्यांची ही कन्या वडिलांच्या विचाराविरूध्द कशी जाईल? असाही एक प्रश्न उभा राहतो.

असे असले तरी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी प्रथमच काही धोरणात्मक निर्णय जाहीर केले आहेत. त्यातील महत्त्वाची घोषणा म्हणजे पाकिस्तानचा यापूढे अण्वस्त्रे न बनविण्याचा निर्णय. व बेनझीर भुट्टो यांची आजवरची वक्तवे पाहिली तर भारत-पाक दरम्यान सलोख्याचे संबंध प्रस्थापित होणे अशक्य नाही असे वाटते व इतिहासात ज्याप्रमाणे हिरण्यकश्यपूच्या पोटी जसा 'प्रल्हाद' जन्मला तसेच भुट्टोच्या पोटी 'बेनझीर' का जन्मू नये असेही वाटते.

वरील सर्व अडचणींवर मात करून आज मुस्लीम राष्ट्रातील पहिलाच लोकनियुक्त पंतप्रधान बनून बेनझीर यांनी आपल्या नावाचा उर्दु अर्थ 'अद्वितीय', 'विलक्षण' असा आर्थ केला आहे व आज जगातील पाच महिला पंतप्रधानामध्ये त्यांची गणना होत आहे.

## अजून असा

अजून असा श्वासावर झुलतो
रात्रजुईचा सुगंधीत काटा
गर्द कृष्ण तव डोळ्यांमधला
अबोल हट्टी निळसर ताठा
सात गजांचे सात पहारे
चुकवित पक्षी गाणे गातो
ओठावरचा एक शहारा
चुंबनवेडा वितळत जातो

जाधव संभाजी एस.
बी एस्सी २

## सर

कधी अवचित येते
अशी श्रावणाची सर
इंद्रधनुष्याच्या रिंगणी
हेलावतो परिसर!
सखी लेवूनिया येते
मदमस्त गंधराग
आणि मोहरती मनी
स्वप्न फुलांचे पराग!
अशी अवचित यावी
खुळ्या श्रावणाची सर!
आणि बहरावा मनी
तुझ्या स्मृतींचा मंदार

जाधव संभाजी एस,
बी एस्सी २

## कविता

जेंव्हा......
मनाच्या गगनात
होते विचार मेघांची गर्दी
पण, एक हि थेंब नाही बरसत
जातो गुदमरून जीव सारा
आणि अचानक....
वाहतो सोसाट्याचा अनाम वारा
काढतो विचार मेघांना पिंजून
घेऊन लख्ख तेज क्षणभर
जातो मनाला कल्पना बिलगून
तेंव्हा....
विचारांच्या मेघातून बरसतात
सप्तरंगी, शृंगारलेले शब्दांचे थेंब
आणि अस्वस्थतेचा फोडून बांधा
वाहतो कवितेचा पूर

मुकुंद चौगुले
बी. एस्सी प्रथम वर्ष

## 'पाऊस'

झरझर येती पाऊसधारा
नसे मनाला त्यांच्या थारा
झाले गेले विसरूनी जाती
परि थबकती, मागे बघती
हिरवा शालू नेसती धरती
माती मोहक सुवास दरवळती
काय म्हणावे या धारांना
या सुंदर कोमलधारा ना!

कु. लता गवळी
बी एस्सी १

## साक्षात्कार

भूख तरी केवढी?
इतक्या भूकेची त्याला
कुठे कल्पना होती?
जसं जसं खात गेला
तसं तसं कळत गेलं
आपण किती
भुकेलो आहोत!
अगतिक झाला
तो आपल्याच भुकेपुढे
पोटच नव्हे, तर
त्याची पाठ, त्याचं डोकं
प्रत्येक अवयव भुकेलाय
अन्न अन्न म्हणून
ओरडतोय,
अन्न हीच आपली उणीव
याचा आज झाला त्याला
साक्षात्कार......

एम, बी. कोले
बी. ए. भाग ३

## जेव्हा तू

जेव्हा तू हसतेस तेव्हा
गालावरील खळी तुझ्या
        काही सांगते
मनातील सुख-दुःखावर
पांघरूण घालते
        तुझ्या ओठांच्या जेव्हा
        पाकळ्या उघडतात तेव्हा
जे मला सांगायचं असतं
ते राहूनच जातं
        कारण प्रश्नांच उत्तर मला
        मिळालेलं असतं
तेव्हा डोळ्यात पहातो तुझ्या
तेव्हा प्रेमाची अनोखी ती
        भाषा समजते
पण एकांताच्या सहवासात
सारे काही विसरूनच जातो.

बबन मोरे
द्वितीय वर्ष, कला

## लिलाव

जेव्हा........
स्वातंत्र्याच्या घोषणा दिल्या
म्हणून मनगटांत बेड्या पडल्या
तेव्हा........
पिचलेल्या मनगटांतून रक्ताच्या
धारा वाहिल्या.
वाहत्या रक्तधारांनी
तिरंगी झेंड्याची आकृती रेखिली.
जेव्हा........
तिरंगी झेंड्यासाठी; झेंड्याखाली
मुडद्यांच्या राशी पडल्या
तेव्हा.......
स्वातंत्र्य उदयास आलं!
पण; जेव्हा........
स्वातंत्र्यातही झेंड्याचा लिलाव,
झेंड्याखालील मुडद्यांच्या राशींचा लिलाव,
मनगटातील रक्ताचा लिलाव केला जातो
तेव्हा..........
'लिलाव'...........'लिलाव'
म्हणून उठणाऱ्या आरोळ्या ऐकून
युगा-युगाचा सूर्य देखील
शरमेनं काळवंडतो

मधुकर जांभळे
बी. अे. भाग-२

## पुनवेचं चांदण

आज पुनवेचं चांदणं फुललं,
मन प्रितीच्या ओढीनं भुललं ।।
        कोण हळूचं कानात बोलालं
        दोन जीवाचं नातं जुळलं ।।
अंग अंग खुशीत अझरलं.
नका सांगू गुपित हे मनातलां.
        अजून नाही कुणी ते ओळखलं.
        गोड बोलून कसं मला जिंकलं
तुझ्या डोळयांच्या ऎन्यात पाहिलं
मीच मजला कितीदा न्याहाळलं
नव्या नवतीचं रूप दिसू लागलं ।।

विनायक कोचरी
अकरावी (सायन्स)

## फुला......

जीवनात आलीस तू
चांदण्यांच्या पावलांनी
सडा शिंपलास तूच
अत्तराच्या अक्षरांनी
काही सांगण्याआधीच
तुला कळले सारे
तुला पाहण्यास डोळे
झाले लक्ष लक्ष तारे
तुझ्या संगतीचे क्षण
झाले बकुळीचे फूल
कशी रात्रंदिन माझी
मला पडली ग भूल........

**सागर हिरेमठ**
**एफ. वाय. बी. एस्सी**

## ठरविले तरी

हसायचे ठरविले तरी
ओठावरती लक्ष बंधने
चालायचे ठरविले तरी
रस्त्याला तर अनंत वळणे
बोलायचे किती तरी पण
शब्द घालीती मला उखाणे
कसे जगावे तोल सावरित
मनात माझ्या स्वप्न चांदणे

**पोवार एस. एम.**
**एम. ए.-२,**

## बंधन

झालो तुला नकोसा मी थांबणार नाही.
बंधनात माझ्या तुला मी बांधणार नाही.
शोधून वाट माझी तू जोडीलेस नाते.
हे सत्य या जगाला मी सांगणार नाही.
तुझीया मनातला हा कळला कधी न कावा,
भेटीतल्या स्मृतींना मी डांबणार नाही.
तोडून बंध सारे गेलीस तू निघोनी.
तुटले दुवे कधीचे मी सांधणार नाही.
स्वप्नास पंख होते पंखात स्वप्न होते.
त्या भंगल्याच स्वप्नी मी रंगणार नाही.
साऱ्याच या व्यथांनी मी पोळलो कितीही.
काटा बनून पायी मी राहणार नाही.

**शशिकान्त हेब्बाळे**
**टी. वाय. बी. ए**

## ''अस्तित्व''

पहाटेचे चार;
मावळता चंद्रप्रकाश,
आत खोलीत
तो अन् मी दोघचं;
मला माहीत आहे;
तो उठणार आहे.
अर्ध्याएक तासानं, अनं
जाणार आहे, कायमचा
कधीही न परतण्यासाठी.
मी.....मी प्रेयसी आहे, त्याची.....
होते एके काळी
पण; आता सारं,
संपवलय,
माझ्याच हातानं

**दयानंद लाडे**
**बी. ए. भाग ३**

# स्त्री चे सामाजिक जीवनातील स्थान

सुप्रिया पोतदार
बी. एस्सी १

'। यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः। ' असे स्मृतिकार मनू यांनी म्हटले आहे. जिथे स्त्रियांचा सन्माम होतो तिथेच लक्ष्मी व सरस्वती या देवता रमतात. जिथे त्यांचा अवमान होतो तिथे सारीच कर्मे व प्रयत्न निष्फळ होतात. स्त्रियांचे जीवन जर विषादमय असेल तर देशाची उन्नती होणार नाही.

स्त्रियांना योग्य तो मान दिल्यानेच कोणतेही राष्ट्र उन्नत होते. नारीची योग्य बूज न ठेवणारा देश कधीच उन्नत होत नाही. ईश्वर सर्वव्यापी शक्ती असून स्त्री ही त्या शक्तीचा आविष्कार आहे. आपला देश अवनत होण्याचे कारण हेच की आपल्या देशात नरीरूपी सजीव प्रतीमांना सन्मान दिला जात नाही. अद्याप स्त्रिया अबला व असहाय आहेत. गुलामीत व पारतंत्र्यात आहेत. त्यामुळे संकटकाळी डोळ्यातून टिपे गाळण्याखेरीज त्या काहीही करू शकत नाहीत. स्वतःचे प्रश्न सोडविण्याची परिस्थिती स्त्रियांभोवती निर्माण व्हावयास हवी. जगातील इतर कोण्त्याही महिलेप्रमाणे हे सामर्थ्य आमच्या आर्य महिलेत पुरेपूर आहे.

प्राचीन काळापासून स्त्रीजात भावनाशील, सोशीक, झुकते घेणारी, समाजाच्या प्रतिक्रियांचा अधिक विचार करणारी, समर्पणवादी असते असे म्हटले जाते.

शारिरीक भिन्नत्व सोडल्यास स्त्री पुरूषपिक्षा कोणत्याच बाबतीत भिन्न नाही हे पंतप्रधान इंदीरा गांधी, गोल्टामायर, मार्गारेट थॅचर, बेनाझीर भूत्तो यांनी पुरूषांना दाखवून दिलेच आहे.

"He for God, She for God in him."

नराचा जन्म नारायणासाठी व नारीचा जन्म नरासाठी अशी विभागणी करून स्त्रियांची सर्व कर्तव्ये, त्यांचे जीवनसर्वस्व, जीवनाचे सार्थक पुरूषाच्या व्यक्तित्त्वात केंद्रित करण्यात आले.

'कशी या त्यजु पदाला' हा स्त्रीत्त्वाचा आदर्श लहानपणापासून मुलींपुढे ठेवला जातो. तडजोडीची शिकवण स्त्रीच्या रोमारोमात मुरवली जाते. त्यामुळे त्यांचा व्यवसाय त्यांची 'करियर' बनू शकत नाही. त्यामुळे स्वतःची मतं, विचार निष्कर्ष ठासून सांगण्याकडे सर्वसामान्य स्त्रीचा कल रहात नाही.

Sex and Temperament

एका पुस्तकामध्ये 'मार्गारेट मीड' या स्त्रीशास्त्रज्ञाने असं सिध्द करून दाखविलं आहे की काटकसर, विनयशीलता, कोमलता इ. तथाकथित गुण स्त्रीला तिच्या लिंगामुळे लाभले नसून वातावरणामुळे समाजाने तिला चिकटविले आहेत. 'चारित्र्य व शीलाचा' मक्ता फक्त स्त्रियांनाच त्यांच्या माथ्यावर चिकटवणारी समाजनीती स्वार्थी म्हणावयास हवी.

आधुनिक स्वातंत्र्येच्छू स्त्रीची देशापाशी, पुरूषवर्गापाशी काय मागणी आहे हे कविश्रेष्ठ रवींद्रनाथांच्या शब्दात सांगता येईल- "एखाद्या देवीप्रमाणे माझी पुजाही व्हायला नको आणि एखद्या कृमीकीटकाप्रमाणे मला पायदळी पडायला नको. मला पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून जीवनकलहात झगडायची व अग्निकाष्ठे खायची परवानगी द्या म्हणजे माझी खरी परीक्षा तुम्हाला होईल."

आधुनिक स्वातंत्र्येच्छू स्त्रीची देशापाशी, पुरूषवर्गापाशी काय मागणी आहे हे कविश्रेष्ठ रवींद्रनाथांच्या शब्दात सांगता येईल- "एखाद्या देवीप्रमाणे माझी पुजाही व्हायला नको आणि एखद्या कृमीकीटकाप्रमाणे मला पायदळी पडायला नको. मला पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून जीवनकलहात झगडायची व अग्निकाष्ठे खायची परवानगी द्या म्हणजे माझी खरी परीक्षा तुम्हाला होईल."

# खरे प्रेम

**सागर हिरेमठ**
एफ. वाय. बी. एस. सी.

जानेवारी महिना चालू होता. कॉलेजच्या दुसऱ्या टर्मचे अजूनही दोन महिने बाकी होते. शेटवचा पिरीयड संपला. अविनाश निःश्वास टाकीतच बाहेर पडला. तो आज आनंदी होता कारण काही कारणामुळे कॉलेजला दोन दिवसांची सुट्टी होती. त्याने मनात ठरविले देखील की, ही सुट्टी स्वातीबरोबर घालवायची! स्वाती त्याच्याच वर्गातली.

स्वाती! नाव आठवताच त्याच्या मनांत गुदगुल्या होवू लागल्या, कारण स्वाती होतीच तशी.

स्वीट १८, गोरापान रंग, निळसर डोळे, लांबलचक नाक, तिच्या गालावर उठणारी नाजूक खळी बघितली तर कोणीही तरूण तिच्या प्रेमात पडेल. आणि या सगळ्यावर कळस म्हणजे कपाळावर येणारी झुलपे मागे सारण्याची तिची लकब!

'अवि, अे अविनाश', ऐवढ्यात त्याच्या कानावर हाक आली आणि तो तिच्या विचारातून जागा झाला व बघतोतर समोर तीच सौंदर्यसम्राज्ञी! पण भानावर येवून त्याने विचारले, ''काय गं, स्वाती?'

'अरे, तुला उद्या वेळ आहे कां?' अविनाश खूषच झाला. सुट्टी घालवण्यासाठी त्याला साथीदार पाहिजे होता आणि तिची कंपनी मागण्यासाठी तिच्या घरीच जाण्याचे त्याने मघाशी ठरविले होते.

'हो, आहे नां. पण कां? कुठे पिकनिकला जाण्याचा विचार आखलास काय?'

'तसं काही नाही रे, मी आधी काय सांगते ते नीट ऐकून घे. तू उद्या दुपारी आमच्या घरी ये. पण त्या आधी मी तुला एक गोड बातमी सांगणार आहे.'

'गोड बातमी? आणि ती कोणती गं? सांग, सांग लवकर.'. अविनाश उताविळपणे म्हणाला, त्याच्या इतक्या उताविळपणाला एक कारण होते, इतक्या दिवसांची त्या दोघांची ओळख होती पण अविने स्वातीला असे लाजताना कधी पाहिले नव्हते. तिच्या गालावर लाल रक्तिमा चढला होता. तिचे गाल आरक्त बनले होते.

स्वाती म्हणाली, ''उद्या आमच्या घरी साखरपुड्याचा कार्यक्रम आहे.''

''साखरपुडा? आणि तो कुणाचा?'' हे विचारताना अवीचा श्वास अडकला होता.

''माझाच! म्हणून तू उद्या दुपारी लवकर घरी ये. मला अजून खूप कामे आहेत मी जाते हं!'' असे म्हणून स्वाती तिथून गेली देखील.

''साखरपुडा? आणि तो देखील स्वातीचा!'' अवी चक्रावूनच गेला. हा तर शुध्द विश्वासघात होता. जिच्यावर अवीने एकनिष्ठेने प्रेम केले, जिला आपली जीवनसाथी मानली तिच्याकडून धोका! नाही, तिची तरी काय चूक? आपण तिला याबाबतीत विचारले नाहीच? त्याला काहीच सुचेनासे झाले. तो सरळ एका जवळच्या तलावापाशी येवून बसला. जवळपास कोणीच नव्हते. तो एक-एक खडा पाण्यात मारत होता व त्यामुळे पाण्यावर उठणाऱ्या तरंगाबरोबर त्याच्या मनातील तरंग उलगडू लागले होते. त्याच्या डोळ्यासमोर गच्च माणसांनी भरलेले स्टेडियम उभे राहिले. त्याच्यातच हसरी, प्रोत्साहन देणारी स्वाती उभी राहिली. आणि तो भूतकाळात शिरला.

अविनाशच्या कॉलेजमध्ये क्रिकेटचे सामने ऑक्टोबर महिन्यात घेतले जात. त्या क्रिकेट सामन्यांचे फायनल. अविचा संघ फायनलपर्यंत पोहचत होता. अवी संघाचा कप्तान. अविनाशने पहिल्यांदा फलंदाजी घेतली. स्टेडियम गच्च भरलेले होते. ओपनर म्हणून अवीच आला. त्याने सभोवार नजर फिरवली. तर पहिल्याच रांगेत, बसलेली स्वाती त्याला दिसली. स्वाती त्याच्याच वर्गातली. दोघांची नजरानजर झाली. स्वातीने हात उंचावून शुभेच्छा दिल्या. अवीने देखील तिला प्रतिसाद दिला.

अविनाशने त्या दिवशी तडफदार खेळ केला. सारे स्टेडियम त्याच्यावर खूष झाले होते. प्रत्येक वेळी स्वाती त्याला प्रोत्साहन देत होती. शेवटी अविनाशच्या संघाने सामना जिंकला. चांगल्या खेळाडूचे बक्षीस अविनाशला मिळाले.

सर्व कार्यक्रम झाल्यावर स्वातीने अविला अडविले. ती गोड हसली व म्हणाली, ''अभिनंदन मि. अविनाश.''

''थँक्यु व्हेरी मच.'' या शिवाय अविला काय बोलताच येईना. तो गोंधळून गेला. स्वातीमध्ये नकळत ताश स्वतःला हरवून बसला. एरवी, ''लव्ह ॲट फर्स्ट साईट.'' ची अविने टिंगल केली असती, पण त्यावेळी अविचे देखील तसेच झाले. त्यादिवशी स्वाती अविवर एवढी खूष होती की तिने त्या दिवशी स्वतःच्या घरी अविला आणले व घरातील सर्वांबरोबर त्याची ओळख करून दिली व स्वतः स्वयंपाक करून वाढला व मगच त्याला जाऊ दिले.

दररोजच त्यांच्या गाठीभेटी होवू लागल्या. अविचे व स्वातीचे विचार जुळत होते. पुढे-पुढे त्यांचे दोघांचे भेटणे बोलणे हाहि एक कॉलेजच्या चर्चेचा विषय बनला होता. पाठीमागून मारलेले टोमणे कानावर येत होते, पण त्या दोघांनी याबाबतीत लक्ष घातले नाही. एवढे होवून देखील अविने आपल्या प्रेमाबाबत कधी तिला विचारले नाही कारण स्वाती फार हळवी होती, असे विचारून त्याला तिचे मन दुखवायचे नव्हते. स्वाती वागायला फार 'फ्री' होती 'फ्री' पणाच्या व्याख्या प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळ्या असतात, स्वाती अविला एक चांगला मित्र मानत होती.

कॉलेजमधल्या भानगडीचा विषय निघाला की स्वाती म्हणे, ''आताच्या मुली हे असं दहाजणावर कसले प्रेम करतात? हा नाहीतर तो हे कसलं प्रेम. यांनी तर प्रेमाला वासनेत बदलून टाकले आहे. पण अवि, मी बघ निवडीन तो एकच पण पूर्ण विचार करून,'' असे म्हणतांना स्वाती लाजत होती. अविने फार वेळा प्रयत्न केला की तिने अजून तो एक निवडला की नाही. पण त्याला असे विचारून तिला दुखवायचे नव्हते. आपण असे विचारले तर ती आपल्यावर रागवेल व आपण तिचा दुरावा सहन करू शकणार नाही म्हणून तो गप्पच होता.

अशा अनेक आठवणी अविने आपल्या हृदयांच्या कप्प्यात जपून ठेवल्या होत्या आणि आज हीच स्वाती आपल्याला सांगते अहे की उद्या माझा साखरपुडा आहे. अविच्या डोळ्यातून पाणी आले. त्याचे मन अजिबात थाऱ्यावर नव्हते. मन हलके करण्यासाठी अवि आपल्या जवळच्या एका मित्राकडे- अनिलकडे आला. अविने आजपर्यंतचे सर्व काही अनिलला सांगितले. अनिलने सर्व काही समजून घेतले व अविनाशलाच शिव्या दिल्या.

अनिल म्हणाला, ''अरे, अव्या! तिचा उद्या साखरपुडा आहे म्हणून रडतोस. तिला एवढे दिवस भेटतोस, एकदा तरी तुमचे या बाबतीत बोलणे झाले आहे कां? मग कशाच्या आधारावर स्वप्ने रचलीत हो महाशय? मग ती काय तुझ्या विचारण्याची वाट पहात बसेल जन्मभर?''

अनिलने अविला खूप समजाविले. अविने देखील ठरविले स्वातीचे स्वप्न बाळगणे म्हणजे मृगजळच होय. शेवटी सर्व काही विसरून जाण्याचे ठरविले. आपण जे पाहिले ते एक स्वप्न होते व आपल्याला अचानक जाग आल्याने ते भंग पावले.

दोन दिवसांची सुट्टी संपल्यावर पुन्हा कॉलेज सुरू झाले. नेहमीप्रमाणे अवि कॉलेजात आला. कॉलेज सुटल्यावर स्वातीने अविनाशची भेट घेतली. काल तिच्या घरी न गेल्याने तिने कारण विचारले. अवि म्हणाला, ''सॉरी स्वाती, काल मलाच ताप आला होता म्हणून मी येवू शकलो नाही. पण ते जावू दे, कालचा प्रोग्रॅम कसा काय झाला? आणि त्या भाग्यवानाचा फोटो तरी पाहू दे ज्याला तुझ्यासारखी पत्नी मिळाली.'' अवि जळफळून म्हणाला.

स्वातीने आपल्या पर्समधून एक पाकिट काढले ते बंद होते आणि ते अविच्या हातात दिले. ते पाकिट फोडताच अविचा हात थरथरत होता, त्याला वाटले आता आपले हृदय बंद पडते की काय? जिच्यावर आपण जीवापाड प्रेम केले त्या प्रेमाने आपल्याशी प्रतारणा करावी? विचारातच त्याने पाकिट फोडले तर त्यातून त्याच्या हाती काय लागावे? एक ताजे गुलाबाचे फूल जे त्याच्याकडे पाहून हसत होते व एक कागदाचा तुकडा, ज्यावर लिहिले होते

'I love you Avinash'

स्वाती म्हणाली, **''अवि तुला वाटलं तरी कसं की मी तुझ्याशिवाय दुसऱ्याचा विचार करू शकेन? तुझा माझ्यावर विश्वास नाही का? मी आजयर्पंत फक्त एकाच तरूणाशी प्रेम केलंय अविनाश आणि तो तू आहेत.... फक्त तू!''**

आतापर्यंत साठलेल्या, कोंडलेल्या श्वासाला अविनाशने वाट करून दिली. त्याला झालेला आनंद त्याच्या चेहऱ्यावरुन ओसंडत होता, तो काही बोलण्याच्या स्थितीतच नव्हता. त्याला तो एक या प्रश्नाचे उत्तर आपोआपच मिळाले होते.

तिचा हात त्याने हातात घेतला. तसाच ठेवला. किती काळ गेला तसा ....... निःशब्द. स्तब्ध.

# प्रेम : एक अगम्य रसायन

काकासाहेब भुईंबर
बी. ए. भाग २

प्रेम म्हणजे काय?

''आपल्या जोडीदाराला न दुखवता, त्याच्या आनंदात आपल्याला आनंद वाटणं आणि मग हा आनंद वाढावा म्हणून सतत झटत राहणं म्हणजे प्रेम होय''

अशा अनेक प्रकारच्या व्याख्या प्रेमाविषयी केल्या जातात, परंतु मानसशास्त्रीय- प्रेम म्हणजे दुसरं काही नसून, ''मेंदूमधल्या पेशीत विशिष्ट रासायनिक स्त्राव तयार होणं म्हणजे प्रेम!''

या स्त्रावामुळे मज्जातंतू उद्दीपीत होवून त्यात् काही विद्युत चेतना निर्माण होतात इतकंच........

ज्या व्यक्तिला पाहून असे Biochemical Electric Impulses निर्माण होतात, त्या व्यक्तीबद्दल आपण प्रेम वाटतं असं म्हणतो. म्हणजे ती व्यक्ती या रासायनिक क्रियेचे उद्दीपन (कारण) म्हणून कार्य करते. ही क्रिया व्यक्तीशीच नव्हे तर कोणत्याही गोष्टीशी निगडीत असते येते. उदा.-

पाळलेल्या कुत्र्याला खाण्याची थाळी दाखविली की त्याच्या थोडी लाळ सुटू लागते. थाळी दाखविण्यापूर्वी दररोज घंटी (बेल) वाजविण्याची त्याला सवय लागली तर पुढे-पुढे केवळ घंटीचा आवाज ऐकल्या-ऐकल्याच लाळ निर्मीती होते. अशा प्रकारे सहसंबध निर्माण करून Biochemical Electric Impulses . प्रेमाचे ने कुणाही व्यक्तीच्या मनात कोणत्याही व्यक्तीबद्दल पेमनिर्मीती करता येइल असे मानसशास्त्रज्ञांचे मत असले तरी ते अद्याप प्रयोगावस्थेत आहे.

## अथांग-प्रेरीत

चक्रावर्ती ह्या स्वार्थलंपटी जगण्यापेक्षा
घ्यावी वाटते सदानकदा मज
त्यागमय शौर्याची दिक्षा ।।१।।
गिरवत कित्ता जाणाऱ्यांचा सामोरे मरणा
भरावी वाटते प्रत्येकात मज
देशाभिमान सुराज्य प्रेरणा ।।२।।
शून्यातून लढवू कण-कण माती
कौतेयासम कमनि भारून
विजयोच्यांक मग येईल हाती ।।३।।
पुनर्जन्माला युगानयुगे मी तिष्ठत राहून
करीन चिरंजीव संपन्न तिरंगा
परीणामी तनाची छकलं वाहून ।।४।।

प्रदीप पाटील
१२ वी सायन्स

## पाखरांच्या कविता

(१)
फोटोच्या पाठीमागे पाखराचे घरटे
गवताच्या काड्या थोड्या आत
थोड्या बाहेर
मी उभी फोटो पुढे हात जोडून
(२)
चिप्प भिजलेल्या पाखराने
पंख फडफडवून जेव्हा
मावळत्या सूर्याकडे पाहिले
तेंव्हा आसमंतात मोती उधळले
त्यातले दोन माझ्या डोळ्यांत
अलगद येऊन उतरले

अलका किणी
(बी. एस्सी २)

# जरा हे ही वाचा

## सार्थ सुभाषित

१) काव्य शास्त्र विनोदेन काले गच्छंति धीमताम् ।
व्यसनेनच् मूर्खाणां निद्रया कलहेनवा । ।

अर्थः- बुध्दिमान लोकांचा काळकाव्य विचार आणि शास्त्र विचार करण्यात निघून जातो. मूर्खांचा काळ मात्र झोप अथवा भांडणात जातो.

२) हस्तस्य भूषणं दानं सत्यं कण्ठस्य भूषणं।
श्रोतस्य भूषणं शास्त्रं भूषणैः किं प्रयोजनम् । ।

अर्थः- हाताचे भूषण दान करणे, गळ्याचे भूषण, सत्य बोलणे कानाचे भूषण शास्त्र ऐकणे मग इतर अलंकारांची गरज काय?

३) आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिकाः।
बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थ साधनम् । ।

अर्थः- स्वतःच्या मुखदोषामुळे पोपट आणि मैना याका पिंजऱ्यात बांधून ठेवतात. बगळ्यांना कोणी बांधून ठेवत नाहीत. मौन हे असे फायदेशीर आहे!

४) माता शत्रुः पिता वैरी येन बालो न पाठितः।
न शोभते सभामध्ये हंसमध्ये बको यथा।।

अर्थः-ज्यांनी मुलाला शिक्षण दिले नाही ते माता पिता मुलाचे शत्रू होत. ज्याप्रमाणे हंसामध्ये बगळा शोभून दिसन नाही त्याप्रमाणे अशिक्षित मुलगा सभेत शोभून दिसत नाााही.

संकलकः- **जी. एस. देशपांडे**
बी. कॉम. भाग १

## ''विचारमाला''

* अपेक्षित क्षणी सुखाचा पेला हातात आला तर त्या सुखाची किंमत कमी होते.

* सामान्य माणसं आशेवरच जगत असतात. ती ''आज'' जगतच नसतात. ती ''उद्या'' जगत असतात.

* कर्तृत्वान व्यक्तीचा पराक्रम बघितला जात नाही, त्याचं चाक जमिनीत कधी रूततं तिकडच सगळ्यांचं लक्ष असतं.

* आपल्यासाठी दुसऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आलेलं पाहण्यात अपूर्व आनंद असतोः मोठा धीर असतो.

*जर आपण एखाद्या असत्य गोष्टीची सतत पुनरावृत्ती करीत राहिलो तर कालांतरानं ती असत्य गोष्ट सत्य वाटू लागते.

* आशा वेडी असते. ध्येय शहाणे असते. 'आशा' हातावरल्या रेषा बघत असते. ध्येय आपल्या पायातलं सामर्थ्य आजमावते.

* माणसाला विचारानं परिस्थितीवर मात करायला पुष्कळ वाव आहे.

* नदी वाहून गेल्यानंतर पाय न भिजवता पलिकडे जाऊ या मूर्ख पणाच्या आशेवर थांबून न बसता पाण्यात उतरुन प्रवाह तोडून पलिकडे चला.

* गंगाजलासारखं पवित्र मन, शुद्ध हेतू, अफाट कष्ट आणि लाखो लोकांचे आशीर्वाद हीच खरी शक्ती आहे.

* हृदयाचे काम पैसा करू शकत नाही.

संकलकः- **उत्तम मोरे**
बी. ए. भाग - ३

## मैत्री

* मैत्रीत वयाचं, शिक्षणाचं, कसलंच बंधन नसतं दोघानीही एकाच पातळीवरून बरोबरीच्या नात्यानं केलेली मैत्रीच अधिक दृढ असते.

* तरूण स्त्रीला नुसती नवऱ्याची बायको होऊन चालत नाही. त्याची मैत्रीण, त्याची बहिण, त्याची मुलगी फार काय प्रसंगी

त्याची आई सुध्दा व्हावं लागतं.

* आपल्याला जर मैत्रीचा पाया मजबूत करावयाचा असेल तर मित्राला आपण तो आहे तसा (आपल्याला हवा तसा नाही) स्वीकारायला पाहिजे.

* ज्याप्रमाणे गरम पाण्याचे झरे हिवाळ्यात गोठून जात नाहीत. तद्‌वतच ह्दयापासून वाहणारा मैत्रीचा झ्रा अगदी कुठल्याही काळी आटणार नाही.

संकलकः- **उत्तम मोरे**
बी. ए. भाग - ३

## तुम्हाला हे माहित आहे कां?

१) मानवाचा ''प्राण'' असलेल्या ह्दयाचे वजन सर्व शरीराच्या ०.०४ टक्केच असते.

२) मानवाच्या केसाची जाडी ०.००५ मिलीमीटर पासून ०.६ मि. मि. पर्यंत असते.

३) मानवाच्या तोंडून प्रत्येक शब्द बाहेर पडत असता निरनिराळ्या ७२ स्नायूंना नाम करावे लागते!

४) हसताना १३ स्नायू मानवाच्या उपयोगी पडतात. तर रागाच्या वेळी ५० स्नायूना काम करावे लागते.

५) मानवाच्या डोक्यावर असणाऱ्या केसांची संख्या एका चौरस इंचात १६० इतकी असते!

६) चेहऱ्यावरील कातडीची जाडी ४.५ मि. मि. इतकी असते.

संकलनः- **विलास गावडे**
बी. ए. भाग तीन

# आमच्या बबीचं लग्न आहे...

**मिसाळ टी. ए.**
बारावी कॉमर्स

''आमचे हे कुठे गेले आहेत कोण जाणे? एक तासभर शोधतेय पण स्वारी सांपडेल तर शपथ! आमच्या बबीच्या लग्नाचा मुहूर्त पर पाच मिनिटावर आलाय. देवक बसवायचं कुणी? यांना कश्शाचं म्हणजे कांही.....नाही. गेले असतील तपकीर आणायला.....'' ''आता तुम्हीच सांगा तपकीर महत्त्वाची का लग्न? हो........आमच्या बबीचं लग्न! आमच्या बबीचं भाग्य मोठं म्हणून असा नक्षत्रासारखा नवरा मिळाला. साधेसुधे नाहीत हो आमचे जावई-बापू! चांगले ''भोपळावेट विंजिनेर'' आहेत. आमची बबी पण चांगली आहे हां! उगीच माझ्या मुलीला नांव ठेवलेले मला नाही खपायचं हं...... सांगून ठेवते सर्वांना!''

''बाई बाई मी एकदा बोलत सुटले की बोलतच रहाते अन् मला बोलायला खूप लागते बाई? पण आमचे हे अजून आले नाहीत. भटजी मगासपासून मुलीच्या वडीलास बोलवा असे सांगत आहेत, पण करू तरी काय? येथील सारी व्यवस्था पाहून माझी कंबर अगदी मोडून गेली आहे. या पुरूषांचे कधी म्हणजे कध्धी समाधान होत नाही. बायकोने कोणतीही गोष्ट कितीही चांगली केली तरी तोंडातून एखादा कौतुकाचा शब्द बाहेर पडेल तर शपथ.'' यांना? कुठे गेले आहेत? आता कर्म माझं! ते भटजी शेजारी जाऊन बसले देखील. अन् मी मेली इथेच बडबडत उभी राहिलेय. अहो मंडळी, चलायचं ना अक्षताला? आमच्या बबीचं लग्न आहे.''

''हे पहा......आलेच हे. काय हो, कुठे गेला होता? तुम्हाला कांही नाही बघा. इकडे पोरीचं लग्न आहे अन् तिकडे तुम्हाला तपकीर सुचते आहे. पोरगी आज घरातून जाणार. माझं ह्दय कसं वरखाली होतय. डोळ्यांची धार कांही थांबत नाही. त्या मेल्या परमेश्वराने तुम्हाला बायकांचं ह्दय दिलं असतं म्हणजे साऱ्या गोष्टी समजल्या असत्या. चला आत मांडवाकडे.''

''हेमाबाई, पार्वतीबाई, रमाबाई चला, अक्षतांची ताटे भरली आहेत. कुणीतरी गुच्छ आणि गुलाबदाणी घेऊन पाठवा. पेढ्याऐवजी साखरेच्या पुड्या वाटा. अहो, जरा थांबा. अशा वरमाईसारख्या तरातरा कुठं निघालात? मी जरा सांगते ते नीट ऐका. त्या आचाऱ्याला बुंदीच्या लाडवांसाठी कोठीतून मोठं पातेलं द्या. पहिल्या पासूनच पंचात गुंडाळून ठेवू नका हो! आणि त्याला आमटीत मिठ जरा बेताचेच घालायला सांगा. त्याचा हात थोडा सैलच आहे. अहो, तुम्ही नवीन कोट.......? आता काय म्हणावं

# कर्मयोगाचे जीवनातील महत्त्व

**जी. एम. देशपांडे**

बी. कॉम. प्रथम वर्ष

कर्मयोग हा गृहस्थाश्रमी लोकांनी आचरायचा योग आहे. गृहस्थाश्रमी लोकांनी संसारात राहूनही केवळ संसारामध्ये रममाण होऊ नये म्हणून कर्मयोग आचरला जातो. कर्म या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. परंतु कर्मयोगामध्ये कर्म हा शब्द कार्य करणे या अर्थाने वापरतात. आपली प्रत्येक कृती, हलचाल हे एक प्रकारचे कर्मच असते. परंतु आपण परहितासाठी नि-स्वार्थीपणे केलेले काम म्हणजे कर्म होय. मोक्ष मिळवण्यासाठी ज्ञान हे मिळवावेच लागते. जीवनामधील सुख व दुःख हे मानवाचे महान गुरू आहेत. सुख आणि दुःख यांच्या सहाय्यानेच मनुष्य ज्ञान मिळवू शकतो. सुखदुःखाच्या अनुभवांचे मनावरील संस्कारांचे फल म्हणजेच मानवाचे चारित्र्य होय. बाह्य जगताने केलेल्या मानसिक आघात-प्रतिघातामधूनच मनुष्याचे कर्म उद्भवते व त्या कार्याचे फलस्वरूप म्हणजेच मनुष्याचे चारित्र्य होय. मानवी चारित्र्यावर सुखा पेक्षा दुःखाचाच अधिक परिणाम होतो. ज्ञान हे मानवात मूलतःच अव्यक्त स्वरूपात असते. मानवाला कर्माच्या सहाय्याने ही आवरणे दूर करता येतात. जसजशी ही आवरणे दूर होतात तसतसा माणूस ज्ञानी होत जातो.

मानवाच्या चारित्र्यावर त्याच्या प्रत्येक कर्माचा ठसा असतो. प्रत्येक मोठे कर्म हे लहान लहान कर्मांचे फलस्वरूप असते. एखाद्या आणिबाणीच्या प्रसंगी नेभळट मनुष्यही मोठे कर्म करून जातो. पण म्हणून तो मोठा आहे असे म्हणता येत नाही. कारण मोठ्या माणसांचे मोठेपण हे त्यांच्या लहान लहान कामातच दडलेले असते. माणसांचे चारित्र्य घडवणारी कर्महीं सर्वात प्रबल शक्ती आहे. कारण माणसांचे प्रत्येक कर्म त्याच्या मनावर एक संस्कार करून जाते. प्रत्येक कर्म हे विचारांचा बाह्य आविष्कार असते. विचार हे चारित्र्यातून निर्माण होतात व चारित्र्य हे कर्मामुळे घडते. म्हणून जशी कर्मे तसे विचार असतात. मनुष्याचा प्रत्येक गोष्टीवरील अधिकार त्याच्या कर्मामुळे ठरत असतो. मनुष्याच्या वर्तमान काळातील अवस्थेत त्याचे भूतकाळातील कर्म जबाबदार असते. मनुष्याला प्रत्येक कर्माचे फल निश्चित रूपाने मिळते. कर्मयोगासंबधी गीतेमध्ये लिहिले आहे. ''योगः कर्मसु कौसालयूम'' कर्मयोग म्हणजे कर्माचरणातील कौशल्य, शास्त्रीय पध्दतीने कर्मानुष्ठान होय.

**कर्माचे फल हे कर्माच्या प्रकारावर व कर्माच्या पध्दतीवर अवलंबून आहे. निःस्वार्थपणे आणि समाजाच्या हितासाठी कर्म करा असे गीतेमध्ये सांगितले आहे. समाजासाठी केलेल्या कर्माची फळे जास्तीत जास्त दिवस मिळाली पाहिजेत. त्यासाठी कर्माची व्याप्ती मोठी असणे आवश्यक आहे. आत्म्यावरील अज्ञानाची आवरणे दूर करून आत्म्याला पूर्णपणे जागृत अवस्थेत आणणे हे तर प्रत्येक कर्माचे उद्दिष्ट असले पाहिजे. भिन्न भिन्न कर्मे ही आत्मशक्ती जागृत करणारे आघात असले पाहिजेत. प्रत्येक कर्म हे मुक्तीची वाट सुलभ करण्यास उपयुक्त असले पाहिजे.**

सामान्य मुनष्याच्या जीवनात स्वार्थाशिवाय इतर कोणत्याही हेतूंना थारा नसतो. तो पूर्णपणे अज्ञानाच्या अंधारात बुडालेला असतो. त्याचे प्रत्येक कर्म हे स्वार्थप्रेरित असते. परंतु कर्मासाठी कर्म करणारी माणसे थोर असतात. निःस्वार्थ हेतूने सतत कार्यरत असणारी माणसेच मोक्ष मिळवू शकतात. ज्या माणसांची समाजाच्या कल्याणासाठी हजार जन्म घेण्याची तयारी असते अशीच माणसे पूर्ण ज्ञानी म्हणावयास लायक असतात. आत्मशुद्धीसाठी मन, शरीर व आचार शुद्ध असणे आवश्यक असते. मन, शरीर व आचार शुद्धीसाठी निःस्वार्थ कर्माची आवश्यकता असते. गीतेमध्ये सांगितले आहे, ''कर्मण्ये वाधिकारस्ये मा फलेषूकदाचन'' कर्म करण्याचा मला अधिकार आहे त्याचे फल पहाण्याचा नाही.

आत्मशक्तीचा विकास होणे ही कर्मयोगातील महत्त्वाची गोष्ट आहे. आत्मशक्तीच्या विकासासाठी विश्वप्रेम, सत्यनिष्ठा, निःस्वार्थपरता असणे आवश्यक आहे. बहिर्मुख कमपिक्षा सयंमीत शक्तीचा बाह्य आविष्कार कितीतरी अधिक असतो. प्रत्येक व्यक्तीचे स्वधर्मासाठी, समाजासाठी, स्वराष्ट्रासाठी कर्तव्य ठरलेले असते. शास्त्रांच्या सहाय्याने कर्मानुष्ठान करून जास्तीत जास्त समाजाचे कल्याण करणे आवश्यक आहे. यासाठी प्रखर कर्मशिलतेची आवश्यकता भासते. प्रत्येक कर्म हे त्या कर्मामध्ये कोणत्याही प्रकारे न अडकता केले पाहिजे. जेंव्हा कर्मामध्ये

भावना न गुंतवता कर्म केले जाते तेंव्हाच मनुष्य त्याच्या फलाच्या अपेक्षेपासून दूर राहू शकतो. असे केल्याने कर्मयोग्याला कर्मामध्येही ध्यानाची व समाधिची अवस्था प्राप्त होवू शकते. प्रखर कर्मशीलतेमध्ये ज्याला निःशब्द शांतता लाभते तोच संयमाचे रहस्य जाणू शकतो हाच कर्मयोगाचा आदर्श आहे.

प्रत्येक कर्मयोगी हा ब्रम्हनिष्ठ असतो. ब्रम्हलाभच त्याच्या जीवनाचे अंतिम लक्ष्य असते. तथापि, तो नित्य कर्म करत असतो. आपली कर्तव्ये पार पाडत असतो. तो जे काही करतो ते समस्त त्याने ब्रम्हाला अर्पण केलेले असते. मानव जीवनाचे अंतिम लक्ष्य जी मुक्ती निःस्वार्थ कर्माच्या द्वारे लाभ करून घेणे हाच कर्मयोग होय. कर्मयोगामुळे मनुष्य संसारात राहून संसारापासून मुक्त राहतो. समाजातील सर्वसामान्यपणे सर्वच लोक संसारी असतात. त्यामुळे जीवनातील सुख व दुःख यांचा नाश करून कर्तव्ये पार पाडण्यासाठी सज्ज होणे लोकांना कर्मयोगाच्या आधारेच शक्ये होऊ शकते.

## जगायचं म्हणून

चांगल करूनही चांगल होईना,
वाईट करूनही जमतच नाय,
जगायचं म्हणून जगतोय दोस्तानों,
नाहीतर जगण्यात या अर्थच काय?

करावं कष्ट, मिळवावी भाकरी,
पण कसायला जवळ जमीनच नाय,
पोटासाठी शिजत चाललो,
पोटा बिगर काय, भरतच नाय?

बघावे तिकडे काळाबाजार अन्
भ्रष्टाचारा शिवाय हायच काय?
खऱ्यांच होतय खोंट जगात या,
अन् गरिबाचं इथं हायच काय?

मजल्यावर मजला चढतोय तिकडे
आम्हाला रडायला झोपडीबी नाय
फाटक्या सुटक्यावर कसंतरी काढतोय,
दोन घासाची तर पंचायत हाय?

कुत्र्या सारखं जीवन जगतोय
पण कुत्रं सुध्दा विचारत नाय्
मग सांगा दोस्तानों, सांगा बहिणीनों,
जगुन तरी आमचा उपयोगच काय?

**एकनाथ भिऊंगडे**
**बारावी, आर्टस**

## "मला वाटले"

तुला पाहताना मला वाटले,
जीवनातील लाभ मिळाली.
तू हसताना मला वाटले,
जीवनातील वाट मिळाली.
तू फुलताना मला वाटले,
जीवनातील हास्य मिळाले.
तू बघताना मला वाटले,
जीवनातील प्रीय मिळाली.
तू खुलताना मला वाटले,
जीवनातील दुःख जळाले.
तू जाताना मला वाटले,
जीवनातील ज्योत जळाली.

**प्रदिप जाधव**
**१२ बी, कला.**

## स्पर्श

प्रेमाचा एक संदेश पुरे
वासनेची ज्योत नकोय मला
श्वासाची एक उब पुरे
सहवास कायमचा नको मला ।।

आश्रुचा एक थेंब पुरे
आश्रुंची माला नकोय मला
प्रेमाचा संदेश पुरे
तुझे सर्वस्व नकोय मला ।।

**कोंडुसकर टी. एल.**
**बारावी, कला.**

# अतूट नातं

**किरण बागी**
तृतीय वर्ष विज्ञान

कांचन आज उत्साहानेच कॉलेजात येत होती. आज तिचे मन आनंदाने भरून आले होते. किती दिवसांनी नव्हे किती वर्षांनी आज ती आपल्या आत्यांच्या गावी जाणार होती. नाहीतरी काय तिचे आईवडील तिला हायस्कूलला गेल्यापासून कुठेच पाठवून देत नसत. अगदी कॉलेजची दोन वर्षे झाली तरी. पण आज तिला मोकळं मोकळं वाटत होतं. सारा दिवस अन् रात्रही आठवणीत चूर झाली.

तिला आठवलं अगदी लहानपणापासून तिचे सुट्टीत जाण्याचे एकच ठिकाण, ते म्हणजे आत्यांचे गाव. तिथलं वातावरण तिला फार पार आवडायचं, शहरात फुले विकत घेऊन ती वेणीत माळायची, पण इथे फुलांना काय तोटा शिवाय तेवढ्या कैऱ्या, चिंचा, ऊस, पेरू, चिक्कू एक ना अनेक फळांच्या चवी, अन् ती नुसत्या चवीलाच नव्हे तर पोट भरून खायलाही. नुसतं आठवणींनी तिच्या तोंडाला पाणी सुटले होते. शिवाय खेळायला तर किती मज्जा. खेड्यातील मुलांचे खेळ आपण शिकायचे, आपले त्यांना शिकवायचे. दिवसभर उन्हातान्हातून भटकायचंच मटकायंच, दम लागेपर्यंत खेळायचं शहरात असं कुठं असतं?

तिथल्या मुलांचा थवा तिच्याप्रमाणेच निरागस प्रेमळ, पण त्यातील तिला एका मुलाचं आकर्षण वाटलं. त्याचं नाव होतं राजन पण प्रेमाने सारे त्याला राज म्हणायचे. आत्यांचा हा सर्वात मोठा मुलगा. हा सवपिक्षा काहीतरी निराळचं करायचा. त्याचं वागणं, बोलणं, राहणं सर्वांहून भिन्न, भिन्न वाटायचं. तसा तो त्या चमुमध्ये जरा मोठाच. पण त्यानं कधी दादागरी केली नव्हती. सर्वांशी तो हसत खेळत असायचा. रानावनात हिंडतांना तो मधाचं पोळ आणून द्यायचा. चळण चढायला मदत करायचा विहीरीच्या काठी उंचावर असलेली फुले, अडचणीत शिरून आणून द्यायचा.

उन्हाळा असल्यामुळे सर्वजण पोहण्यासाठी विहीरीवर जात असत. त्यावेळी ती हायस्कूलला होती. सर्वजण धडाधड पाण्यात उड्या घेत, त्यांच्या बहीणीसुध्दा डबा बांधून उतरत असंत. सर्वजण मनसोक्त डुंबायचे. तिला सुध्दा फार फार इच्छा व्हायची पण तिला पोहताच येत नव्हते. ती नुसते पायरीवर बसूनच पाणी उडवीत असे. पण मुलांची गंमत महणजे पाठशिवणीचं खेळ, बुडायचे, श्वास रोखायचा, सूर मारायचा पण तिला मात्र काहीच येत नव्हते. शेवटी इवलासा चेहरा करून एक तिने त्याला विनंती केली. त्याचा स्वभाव अगदी साधा सरळ त्याने लगेच होकार दिला. हात धरून त्याने तिला कमरे इतक्या पाण्यात नेले व हातपाय मारण्यास सांगितले. पण ती त्याऐवजी गटांगळ्या खाऊ लागली व भिऊन त्याला गच्च मिठीच मारली. तो ध्रुव ताऱ्यासारखा स्तब्ध होता पण तिला मात्र चमत्कारीक वाटले. तेव्हा पासून त्याचा सहवास तिला हवा हवासा वाटू लागला होता. म्हणून पाण्याची भिती असूनही ती पोहायला शिकू लागली. तेव्हापासून तिच्यात बदल झाला. त्याच्या आवडीनिवडी पाहू लागली. त्याला मदत करू लागत असे. बुध्दिबळ, पत्ते खेळतेवेळी त्याला बिलगून बसत असे. ती लहान असल्यामुळे सर्वजण काहीच मनावर घेत नसंत. उलट दोघानांही 'छान जमली जोडी' म्हणून चिडवीत असंत.

अशा कित्येक आठवणी तिला रात्रभर येत होत्या आपल्या बालीशपणाचे व अल्लडपणाचे आता तिचे तिलाच हसू येत होते. कोठे गेले ते निरागस बालपण ना त्यात स्वार्थ ना मोह, सगळा आनंदी-आनंद. आता जरा वेळ झाला तरी 'इतका उशीर का?' अशी तिखट चटणी खायला मिळायची. स्टँड वरसुध्दा समृतींचा हाच ओघ कायम होता.

**त्याचा स्वभाव साधा भोळा, थोडा रागीटच पण क्षणापुरता राग. अधुन मधून केव्हातरी तो यायचा पण सर्वांसमक्ष त्याच्या चेहऱ्याकडे पहायचे धाडसच होत नसे.**

त्याच्या हौसेला तर मोलच नव्हते. फोटो काढायचे काय वेड होते त्याला. कितीतरी फोटो होते त्याचे. अगदी शेतकऱ्यापासून एखाद्या हिरोपर्यंत. किती वेशातले अन् पोशाखातले. शिवाय संगीताचे वड, गाण्याचे वेड, चित्रे तर इतकी हुबेहुब काढायचा खास तिच्यासाठी सुंदर निसर्गचित्रे काढून पाठवायचा. उत्स्फूर्तपणे सर्व स्पर्धात भाग घ्यायचा. एखादं बक्षीस मिळालं तर तिला आनंदाने दाखवायचा. शिवाय शेतीची कामे, वडिलांना

मदत करायचा. माझे वडिल त्याची किती तारीफ करायचे, पण आपल्या विषयी त्याला काय वाटतं असेल, आपल्या बालपणाच्या त्याला आठवणी येत असतील का? मी त्याला आवडत असेन का? कालपासून जो गोंधळ आपल्या मनात चालला आहे, त्यालाही तसे वाटत असेल का? त्यालाही आपल्या भेटीची ओढ आहे का?

अगदी लहानपणापासून आपल्या मनात जशी त्याची सालस, लोभस, निस्वार्थ मूर्ती कोरली होती. इतकी वर्षे आपण जशी त्याची पूजा करीत होतो तशी तोही करीत असेल का? की एखाद्या मुलीत त्याचं मन? छे! असे विचार मनात आलेच कसे? एखाद्या मुलीने जरी त्याला मोहिनी घातली तरी तो असं करणार नाही. तो एकदा म्हणाला होता, ''कांचन, प्रेम हे निस्वार्थ असतं. प्रेम म्हणजे निस्वार्थ भक्ती असते. मग ते आईवडिलांशी बहीण-भावंडाशी देवाशी अगर इत्तर कुणाशीहीं असो. तिथं शंका घ्यायची नसते. मनुष्यात सौंदर्यावर, कलेवर, जरूर प्रेम करावं पण ते आपल्या जवळच असावं असा हव्यास धरू नये!'' एवढे बोलून तो निघून गेला होता. त्यानंतर मनमोकळेपणाने असं तो बोलत नव्हता.

विचारांच्या ओघात आपण एस. टी.त बसलो केव्हा व उतरलो केव्हा? तिला तिचे भानच नव्हते. ती डोळे विस्फारून चोहींकडे पहात होती. आपण आत्यांच्या गावीच आलो की चुकून दुसऱ्या स्टॉपवर उतरलो पण क्षणात तिची शंका दूर झाली. समोरच 'जनसेवा तरूण मंडळ; यरनाक आपले सहर्ष स्वागत करीत आहे' असा फलक होता. पण हे सारे झाले कसे असा प्रश्न पडला. कारण पूर्वी या ठिकाणी ओसाड माळ होता. वृक्ष नावाच्या जणू इथे शब्द परिचीत नव्हता. पण आता सारे बदलले होते. सारे कसे हिरवेगार शांत दिसत होते. कारण पलिकडेच तलाव बांधला होता, पाण्याचे पाट वहात होत. शेते हिरवीगार दिसत होती. दूर गुरे चरीत होती बासरीचे मंजूळ स्वर कानी येत होते. तिचं मन उल्हासित झालं. खरंच या ५-६ वर्षात खूप बदल झाला होता. आत्यांचं घरही याला अपवाद नव्हता. प्रथम ते तिला ओळखलेच नाही. कारण एका बाजूला एक मोठा फलक दिसत होता 'गणेश ग्रायंडींग मिल', 'रेशीम उद्योग केंद्र', 'कुक्कुट पालन व मधुमक्षीका केंद्र' त्याला लागूनच 'जनसेवा तरूण मंडळ' अशी पाटीही होती. साऱ्यांच्यामध्ये आत्यांचे घर होते. सारे बदलले होते पण माणसांची मने मात्र तशीच होती. तिचे अगत्यपूर्वक स्वागत झाले. अगदी पाहुणचार सुध्दा. सारे वातावरण प्रेमळ होते.

दोन दिवस झाले, तेही सारे कौतुकातच गेले, राजनमध्ये बदल जाणवत होता. पूर्वीसारखा खेळकर स्वभाव नव्हता. पण जरा गंभीर सभ्य वाटत होता. आत्या मात्र कौतुकातच रंगून गेली होती. त्या म्हणाल्या, ''पाहिलस का राजाचा पराक्रम, काय करेल अन् काय नाही. हे दोन्हीबाजूला बोर्ड दिसतात ती त्याचीच करामत. लहान पणी जो तुमच्या मेळा असायचा आता 'मंडळ' झालंय. ''बघ जनसेवा करतात'' आत यावर दोघीही खूप हसल्या. दोन-तीन दिवस झाले, ज्या समारंभासाठी ती आली होती तो समारंभही पार पडला होता. सारा पाहूणचार, भेटीगाठी झाल्या. त्याचे वागणेही तिला पूर्वीप्रमाणे जाणवले पण त्याच्याशी एकांत साधता येईना. तिच्या मानत सुध्दा पुत्हां विचाराचे वादळ उठले होते.

एके दिवशी तिने विचारले.

'अहो, मला तुमच्या शेताकडे घेऊन चला ना? फार सुधारीत पध्दतीने शेती करीत आहात म्हणे.'

'चला तर चला. उद्या सकाळी जाऊ? त्याने सांगितले

'उद्या का? आता संध्याकाळी का नाही?' तिने अधिकारपणे विचारले.

'अ'? तयारी करायला नको?' असे म्हणत तो निघून गेला. आता हे कसली तयारी करणार? उद्या काय बोलायच? या विवंचनेत रात्र गेली.

''हं आवरलं का?' त्याचे मधूर शब्द कानावर आले. शेताकडे जायचं म्हणून ती पहाटे लौकरच उठली होती.

''आलेच हं'' हे काय बैलगाडीतून? दारातील बैलगाडी पाहून तिने विचारले.

आता तिच्या लक्षात आले त्यांनी तयारी करायची का म्हटले ते, टायरच्या बैलगाडीत त्याने मुद्दाम पाहुण्यासाठी बसायला सीट तयार केले होते. शिवाय बॅटरी, टेपरेकॉर्डर, हॉर्न हे सारे बैलगाडीलाही केले होते. शेताकडे जात नसून आपण एखाद्या सहलिला जात आहोत असं तिला वाटत होतं. गोड गप्पा चालू असतानाच शेत आले.

''कांचन उतर खाली'' अन् हे पहा मी बैल बांधून वैरण

घेऊन येतो तोपर्यंत ती समोरची खोली दिसते ना? ही चावी घे आत चहा कर व फराळ सोडून तयार ठेव. करशील ना?''

त्यात काय, तुम्ही जाऊन यायच्या आतच'' ती खोलीच्या दिशेने चालू लागली. ''विश्रामगृह'' अशी मोठ्या अक्षरात पाटी पुढेच लावली होती. समोर छोटीशी बाग. आत सारे व्यवस्थित होते. शेतीविषयी माहितीची अनेक पुस्तके होती. खरंच नांव अगदी सार्थक होतं. इथे आल्यानंतर खरोखरच विश्राम मिळे. तिने चहा केला, आत, त्याची वाट पाहू लागली. पण तो अजून आला नव्हता. तिला राहावले नाही ती त्याच्या दिशेने बांधावरून चालू लागली. ती त्याच्या जवळ आली अन् तिने ''अग ऽऽ ई ऽऽ ग ऽऽ'' अशी आर्त किंकाळी फोडली काय समजायच्या आतच तिने त्याला गच्च मिठी मारली.

त्याला काहीच समजले नाही. त्याने लगबगीने इकडे तिकडे पाहिले. ''एक भला मोठा नाग बांधावरून तिच्या दिशेने येत होता. अन् ती इतकी घाबरली होती की, तिची दातखिळीच बसली. त्याने तिला उचलून विश्रामगृहात आणले. थोड्या वेळाने ती भानावर आली. पुन्हा एकदा घाबरून तिने मिठी मारली.

त्याला मात्र हसू येत होते. ''हे काय कांचन? इथंही भीती वाटते?'' तो म्हणाला.

''राजन चहा घ्या.''

''द्या ना. मी कुठे नको म्हणतो, पण तुला इतकाही धीर नव्हता का?''

''होता ना, पण मला तुमची कारागिरी पहायची होती.''

''ती तर मी तुला दाखवणारच होतो. चल आपण फिरून येऊ.'' दोघे चालू लागले. ''तुम्हाला लहानपणीचे दिवस आठवतात का?''

''कांचन'' त्याचा आवाज घोगरा झाला ''अगदी योग्य प्रश्न विचारलास'' त्याने तिच्या डोळ्यात पाहिले.तिने मान खाली घातली. त्याने तिचा हात हातात घेतला. दोघे बांधावरून चालत होते. ''कांचन लहानपणापासून तू मला आवडतेस. तुझ्या आवडीनिवडी मी जाणतो. तुला आठवतं मी तुला मधाचं तुला आणत असे पण आता हेच पहा. इथे खास तुझ्यासाठी मध तयार आहे.'' त्याने मधुमक्षिकापेटी उघडत म्हटले. ही फुलांची, फळांची झाडे. सारे तुझ्यासाठी केलं आहे. तुला आठवतं चिंचा, कैऱ्या, आवळे, काकडी, हरभरा आपण चोरून आणीत असू पण आता ते सर्व इथे आपल्याला उपलब्ध आहे. ती पहा तुतीची झाडे पण...

तिचे त्याच्याकडे आता लक्ष नव्हते. ती भारावूनच गेली होती. खरंच त्याने किती करामती केल्या होत्या. ज्या माळावर 'सावली' म्हणून माहित नव्हती तिथे आता झाडेच होती. तिथ तहान लागली तर पाण्याचा थेंब मिळायचा नाही तिथे आता पाण्याचे पाटच वाहत होते. ज्या माळरानावर पडीक जमिनी होत्या, तिथे त्याने दगड, गोटे काढून काळी माती ओतली होती व अस्सल काळी जमीन स्वतः तयार केली होती. जिथे रांळे, बाजरी पिकत नव्हती तिथे ऊस, गहू, मिरची तो पिकवीत होता, अन् तेही कॉलेज करीत.

''कांचन'' त्याने तिला हलवले.

''काय स्वप्नात आहेस.

''होय धाडस करते आहे. तुमच्या मनात काय आहे कोणास ठाऊक पण.....

कांचन मी सुध्दा इतकी वर्षे, आठवणीत घालविली, तू लहान होतीस, तुला काही समजत नसेल म्हणून आजवर विचारलं नाही. अनेक स्वप्ने उराशी होती. काही साकारली काही आहेत पणती स्वप्नेच राहणार असे वाटते.

'कां? तुमच्या सारख्या धडपडणाऱ्या व्यक्तींनी, ज्यांनी धरतीचं नंदनवन केलं...

''त्या नंदनवनात आता राक्षस येणार आहेत, भस्मासूर येणार आहेत.'' तिचे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच तो उद्गारला.

'' मी नाही समजले.''

जिच्यासाठी आम्ही आई-वडील, बहिण-भांवडे, रात्रंदिवस राबलो, कष्ट केले . जीवाचं रान केलं, हाडाची काडं, आणि रक्ताचं पाणी करून या मातीचं सोनं केलं. तीच ही माझी आई 'धरणीमाता' आता दगडाच्या दरात विकली जाणार. हा राक्षस म्हणजे दुसरा तिसरा नसून त्याचे नांव आहे 'लघु औद्योगिक

वसाहत'. इथे आता धूर ओकणारी धुराडी उभारणार. हे लता वृक्ष, ससे, कोल्हे, मोर, लांडोर, पक्षांचा किलबिलाट सारे नष्ट होणार.

आता इथे पक्षांचे कूजन ऐकू येणार नाही. तर इथे यंत्राचे आवाज, आत भोंगे ऐकायला मिळणार. फोनच्या आत इलेक्ट्रिक लाईन्सही दिसणार. हे वैभव, ही नवसंपत्ती सारे सारे नष्ट होणार. इथं राहणार फक्त धूर.

ही जमीनसुध्दा सोडावी लागणार, तशी त्यांनी नोटीसही दलि आहे. त्या बदली नोकरी देतील, पुनर्वसन करतील, पण का? इतके दिवस म्हणूनच हे वैभव तुला दाखवले नव्हते. कारण ते केव्हा नामशेष होईल सांगता येणार नाही. म्हणून मी नाराज होतो. म्हणून तुला इकडे आणले नाही. कांचन मला यातून काहीच सुचंत नाही, मातीचं सोनं केलं हेच चुकलं. सांग किती स्वप्न उराशी बाळगली होती. हे यंत्रधारक, केव्हाही यायचे जुलुम करून जमिनी बळकावण्याच्या, किती दिवस चालायचं, नाही मी असं होऊ देणार नाही. ही माती माझं सर्वस्व आहे. या मातीत माझ्या कितीतरी पिढ्या खपल्या आहेत, नाही मी असं होऊ देणार नाही. माझं मातीशी नातं अतूट आहे. माझं सारं वैभव या मातीमुळे आहे. ही भरभराट, हे वैभव हे सारं तिथंच. मी तिला लोखंडाच्या दरात देणार नाही. कांचन मी असं होऊ देणार नाही. आता त्याच्या डोळ्यातून दोन अश्रू टपकत तिच्या हातावर पडले. तिने चमकून वर पाहिले. त्याचे डोळे पाण्याने डबडबले होते. तिने त्याला झाडाखाली बसवले व धीर दिला. त्याचं नातंच असे घनिष्ट होतं, अतूट होतं की त्याचं पोलादी हृदयही वितळले होते.....विदीर्ण झाले होते.

## खंत

खंत आहे मनात, माणूस नाही माणसात
देवा काय चालले आहे रे, या दुनियेत
न्याय फासावर गेला
सत्यावर भाला आला
आचार नाही उरला
विचार नाही आचारात, माणूस नाही माणसात
देवा काय चालले आहे रे, या दुनियेत
महागाईने कहर केला
भ्रष्टाचार सगळा भरला
पवित्र्याचा अंश ना उरला
विखार आले अंतरात, माणूस नाही माणसात
देवा काय चालले आहे रे, या दुनियेत
माणुसकीचा लिलाव चालला
सत्येचा पोरखेळ केला
नैतिकतेला तर तडा गेला
कसे जगावे जगात माणूस नाही माणसात
देवा काय चालले आहे रे, या दुनियेत

**शाम मुतकेकर**
**तृतीय वर्ष, कला**

## पाऊल वाट

सुरेख तुझा लाल बांधा
सुरेख तुझी वळणे नागमोडी
चालून-चालून थकलीस खरी
परी चाल तुझी थांबणार कधी?
ऋणानुबंध तुझा माझा
जीवनात अखंड जोडलेला
मावळेल माझी जीवन ज्योत
परी होणार तुझा अंत कधी?
डोंगर दऱ्याच्या कपाऱ्यातूनी
बेहोश लवते कंबर तुझी
काट्या-कुट्यातून मार्ग शोधतांना
होत नाही का वेदना कधी?
उतरणीवरून धावतेस सर्पापरी
मध्येच गाठतेस दरी
पुन्हा धावतेस चढणीवरी
मग सांग, विश्रांती कधी?
''विचारलेस प्रश्न किती तरी
आहेच मी पाऊल वाट खरी
ध्येय अजून ही गाठायचे आहे
थांबून ते पूर्ण होणार कधी?''

**जयवंत पाटील**
**बाराबी, कला**

## प्रतिमा

तुला जेव्हा मी पाहिलं
मन माझं तुझं झालं
दर्यात जणू तुफान उठलं
केव्हा हे शांत होईल?
भिडता नजरेला नजर
जाणवला प्रितीचा सागर
पाहून स्वतःचं रूप साजरं
का व्हावं मन तुझं लाजरं?
तुझं मंद मंद स्मित
जसं धुंद मधूर संगीत
बोलण्याची तुझी मोहक रीत
सापडेल का दुसऱ्यात?
मनात माझ्या तुझी प्रतिमा
जणू कोजागिरी कोजगिरीचा चंद्रमा
तू जशी माधवाची रमा
का मग दुसऱ्यांची तमा?
तुझं सारं मनमोहक वागणं
मनी माझ्या गोड स्वप्नं
करीन मी भरपूर प्रयत्न
आणीन मग ध्येयाला ओढून

**मुकुंद चौगुले**
**बी. एस्सी भाग १**

# भिकारी

**घोरपडे व्ही. वाय.**
बी. कॉम. भाग २

त्यावेळी आई किमान पस्तीस वर्षाची होती, ज्यावेळी माझ्या वडीलांचे निधन झाले. वडीलांच्या निधनानंतर आईला दरमहा कमीत कमी शंभर रुपये द्यायचे असा मी माझ्या मनात निश्चय करून टाकला. आतापर्यंत तिला अशी मदत करण्याचा काही प्रश्नच नव्हता. वडिलांना पेन्शन मिळत होती. कमी भाड्याचं घर होतं. धाकट्या भावाला शेती खात्यामध्ये क्लार्कची नोकरी होती. वडिल सेवा निवृत्त झालेले पण तेव्हा कुटूंब पेन्शन योजना अस्तित्वात नव्हती. त्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर आईला पेन्शन काही मिळणार नव्हती. भावाचं लग्न होवून त्याला तीन मुले झालेली. पगार जेमतेम. त्यातच महागाईचा भष्मासूर. त्रामुळे त्याची ओढाताण होणं स्वाभाविकच होतं.

आई तर भावाला सोडून अन्य कुठेही राहायला तयार नव्हती. त्यात माझं लव्ह मॅरेज झालेलं. मार्टीना खिश्चन होती. नाही म्हटलं तरी आमच्या लग्नाला सर्वानीच तीव्र विरोध केला होता. जवळ जवळ दोन तीन वर्ष आमच्या घराकडे कोणी फिरूनही पहात नसे.

मार्टीना ही माझ्याच ऑफीसात नोकरी करणारी तिथंच आमचा परिचय झालेला. परिचयाचं रूपांतर प्रेमात होवून आम्ही लग्नही ठरवून टाकलेलं. सरकारी नोकरीत असल्यानं मला ब्लॉक मिळालेला. सर्वाचा तीव्र विरोध लक्षात घेवूनच आम्ही रजीस्टर पध्दतीनं लग्न केले होते.

तसे आम्ही चारही भाऊ वेगवेगळे रहात होतो. दोन्ही बहिणी लग्नानंतरही पुण्यातच राहिलेल्या. आमचे एकूलते मेव्हणे बऱ्यापैकी नोकरीत होते. धाकटा सोडून आम्ही सर्वजण स्थीरस्थावर होतो. माझी आणि इतर दोघांच्या बायकांही नोकरी करणाऱ्या होत्या. धाकट्याची बायको अशिक्षीत होती.

वडिलांच्या आजारपणात सर्व भाऊ एकत्र आलो. त्यांच्या शुश्रुषेत हयगय केली नाही. हॉस्पिटलमध्ये आम्ही आळीपाळीनं रहात होतो. सर्वाची शिल्लक संपली, सर्वजण कर्जबाजारी झाले मात्र वडिल कायमचेच आम्हाला सोडून गेले. बाईला वैधव्य मिळणं म्हणजे काय हे मी त्या दिवशी प्रत्यक्ष पाहिलं. आईच्या आक्रोशानं आम्हीसुध्दा ढसढसा रडलो.

आणि आमच्या मावशीने आईचा चुडा फोडला, तिच्या कपाळाचं कुंकू पुसलं तेव्हा तिनं जो आकांत मांडला ते दृश्य अजूनही आठवलं कि माझ्या डोळ्यातून आपोआपच पाणी ठिपकू लागतं. त्या दिवसापासून आई खचू लागली. आजारातून उठल्यासारखी, चेहरा निस्तेज सुरकुतल्या सारखा दिसू लागला. ती कमी बोलू लागली. हसणं तर तिनं टाकूनच दिलं. जेवण कमी केलं, तिच्या जीवनातलं चैतन्यच संपलं.

माझी आई, वडीलांची दुसरी बायको. वयात बरंच अंतर होतं. वडिल रागीट, तिरसट, हेकट त्यांनी आईला छळलं असं नाही पण फारसं सुख दिलं असंही नाही. तरीपण तीस वर्ष निष्ठेनं संसार केला आणि त्यातच पतीचा आधार तुटल्यानंतर तिची अशी परिस्थिती होणं साहजीकच होतं.

माझ्या मनाला वाटायचं मार्टीनाचा-माझा प्रेमविवाह झालायं. केणाचीही दृष्ट लागावी असंच अतूट प्रेम. रक्ताच्या माणसांनी विरोध करताच त्यांचा विरोध सहन करून मी मार्टीनाशी लग्न केलं. तिनंही मागचा पुढचा विचार न करता माझ्याशी लग्न केलं. उद्या जर माझं बरं-वाईट झालं तर तिची दयनीय अवस्था होईल! असे विचित्र विचार मनात आले कि आई आठवायची.

आईला एकटीला बघताचं माझ्या मनात अनंत आठवणी गर्दी करतात आईची दया येते. सौभाग्यवतीने नवऱ्याच्या आंधी का मरायचं हे आईच्या पांढऱ्या कपाळाकडे बघताच पटलं. आईच्या मोकळ्या गळ्याकडं तर मला पहावतंच नाही.

सर्वच भावांनी आता आईला आर्थिक मदत करायला हवी असं मला वाटत होतं. आणि मी महिन्याला पंचवीस रुपये द्यायचे असा निर्णय घेवून टाकला. तसं शंभर रुपये ही फार मोठी रक्कम नव्हती. पण तेवढीच आईला मदत केल्याचं मला समाधान

लाभणार होते. शंभर रुपयात तिला दैनंदिन गरजा भागवता येणार होत्या. तिला अमृतांजन नेहमी लागायचं कधी डॉक्टरकडे तर कधी औषधे आणावी लागत होती. असं बरंच काही.

पहिल्याच आठवड्यात मी जेव्हा आईच्या हातावर शंभर रुपये ठेवले तेव्हा तीनं विस्मयानं माझ्याकडं पाहिलं. पैसे घेताना तिचा चेहरा जास्तच केवीलवाणा झाला. आता आपण विधवा झालोय, आता आपल्याला नवरा नाही, या कल्पनेनं तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. नाही म्हटलं तरी तिचा मुलगाच तिला भीक घालत होता.

'आई, असू दे तुझ्याजवळ. तुला उपयोग होईल या पैशाचा'.
मी म्हटले.

आई जास्तच रडू लागली. मी शरमिदा झालो. मुलाकडून पैसा घेण्यात तिला कमीपणा वाटतोय याची मला जाणीव झाली. मी तिला फक्त शंभर रुपये देत होतो. एवढीशी रक्कम घेताना सुध्दा तिला अवघडल्यासारखं वाटत होते. खरंतर वडिलांच्या मृत्यूनंतर तिचा सांभाळ करणे हे आमचं कर्तव्यच होतं. ती धाकट्या भावाजवळ राहू इच्छित असल्यानं तिला वरखर्चासाठी म्हणून मी थोडीशी मदत करत होतो एवढंच!

आईनं पैसे घेतले. मला माझं कर्तव्य पार पाडल्याचं समाधान झालं. त्यानंतर दर महिन्याला मी आईला नियमानं शंभर रुपये देवून मी जणू कृतार्थ होत होतो. आई मुकाट्यानं पैसे घेत होती. त्याचं ती काय करत होती याची चौकशी करण्याचा प्रश्नच नव्हता.

अचानक मार्टीना आजारी पडली. तिला हॉस्पिटलमध्ये ठेवावा लागलं. साहजिकच आई माझ्या घरी आली. ती स्वैयपाकाचं तसंच मुलाबाळाचं बघू लागली. या सर्व ओढाताणीत मी तिला पैसे देवू शकलो नाही. तिनं मागणं अशक्य होतं. नंतर मार्टीना आली. थोडे दिवस थांबून आई परत भावाकडं गेली. मार्टीनाच्या आजारपणात मला खूपच खर्च आला. मित्राकडून कर्ज काढावं लागलं. मी अगदी खचून गेलो. आणि आईला नियमानं शंभर रुपये देण्याच्या कर्तव्यात खंड पडला. जवळ जवळ चार महिने मी आईला पैसे देवू शकलो नाही. आईनंही मला त्याबद्दल कधी विचारलं नाही. माझं मन मात्र मला खात होतं. आईला पैसे द्यायला हवे होते. पण जमत नव्हतं. मध्यंतरी आई लागोपाठ पाच-सहा दिवस माझ्याकडे आली. ती केवळ पैश्यासाठीच येत असावी असं मार्टीनाला वाटलं. भावाची बरीच ओढाताण होते असल्याचं मला समजलं होतं. तेव्हा ती पैशाच्या आशेनंच येत असावी असा माझा पक्का समज झाला. मला ही जाणीव बोचू लागली. त्या दिवशी मी मुद्दामच धाकट्या भावाकडे गेलो.

'आई, सध्या तुला पैसे देणं मला जमत नाही.' मी म्हणालो, 'तुला माझी ओढाताण माहिती नाही असं नाही. मला क्षमा कर.'

आई काहीच बोलली नाही. तिचा निस्तेज चेहरा जास्तच केवीलवाणा दिसू लागला. मी अत्यंत सहानुभूतीपूर्वक म्हटल, 'आई आता तू माझ्याकडे येवून रहा.'

आताशा आईने अंथरूण धरले. मी तिच्याच जवळ बसून होतो आता तिच्या अंगात उठण्या-बसण्याची ताकतच उरली नाही. आणि एके दिवशी ती उठली, आम्ही आश्चर्य चकीतच झालो. ती कपाटाकडे गेली, कपाटातून तिने एक लाकडी पेटी काढली. ती पेटी माझ्यासमोर ठेवली आणि पुन्हा ती अंथरूणाला खिळली. रडवेल्या नजरेनं तिनं माझ्याकडं पाहिलं. ती पेटी तिने माझ्याकडे सरकावली. तिच्या तोंडून शब्दच फुटेना. तिने त्या पेटीचे झाकण उघडले.

मी अवाक झालो. बघतच राहिलो. आईकडे पाहिलं आई माझ्याकडे पहात डोळ्यातून पाणी गाळीत होती. त्या पेटीत पूर्ण नोटा भरल्या होत्या. त्या नोटा मी दिलेल्या होत्या. मी आईला दर महिन्याला देत असलेल्या त्या नोटा बघून माझ्या ह्रदयात चर्र झालं. मी शरमींदा झालो. मी त्या नोटाकडे पाहिलं तोपर्यंत आईची आसवं गळून त्या चिंब झाल्या होत्या. त्या अश्रुमुळे देखील आज त्या नोटांना मुल्य नव्हते. मी आईकडे पाहिलं, आईने डोळे मिटलेले, त्याचवेळी मी मोठ्यानं हंबरडा फोडला. माझ्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहू लागल्या. आज माझ्यासमोर मला त्या नोटा नको होत्या. मला पाहिजे होती माझी आई. पैसा असून आज मात्र मीच भिकारी झालो होतो.

# ज्ञानदिप

**कुशाल कुमार**
बी. ए. भाग१

त्यागातच खरं प्रेम असतं. मग आपल्या माणसासाठी वाईट गोष्टींचा त्याग करण्यात काय वाईट आहे.

कुणासाठी मरण्यासाठी आपण जन्माला नाही आलो. जीवनात प्रेम असफल झालं म्हणून सर्वच बाबतीत कांही असफल होवू शकत नाही, उलट एकदा असफल झालेली व्यक्ती पुन्हा जीवनात कधीही असफलते सारखी विफलता भोगावी लागणार नाही असा प्रयत्न करते. आणि त्यात जिद्द असली तर यशस्वीही होते.

प्रत्येकाच्या जीवनात असा एखादा तरी क्षण असतोच की, जेंव्हा त्याची अवस्था सुख-दुःखाच्या पलिकडे जावून पोचते. पण सगळ्यावर काळ हा एकमेव उपाय आहे. आणि एखाद्याला लोकांनी वाईट म्हटलं म्हणून व्यक्तीनं कांही वाईटच रहायचं नसतं. वाईट म्हणून घेणं खूप सोपं आहे पण चांगला म्हणून घेणं तितकच अवघड आहे आणि त्यातून वाईट व्यक्ती चांगली बनली तर त्याला एक वेगळंच महत्त्व प्राप्त होते.

जीवनात जर-तर हे दोन शब्द नसते तर माणूस जीवनात खूपसा सुखी झाला असता. खरं मानवी जीवना-बरोबरच या शब्दांचा आणि दुःखाचाही उगम झालाय. त्यांना घेऊनच आपल्याला चालायच, किती सोसलातरी ते खाली न ठेवता ठेचाळरला, रक्ताळला तरी त्यांना घेऊनच पुढं जावं लागतं. तेंव्हा कुठे शेवट दिसतो.

सुंदर जीवनाची आपण केवळ कल्पना करायची असते. पण सत्य फार वेगळं असतं. कल्पना या केवळ कल्पनाच ठरतात. पण सामोरे जायचे ते सत्याला जरी ते विष असलं तरी ते देखील कांही वेळेला पिवून आणि त्याचे ते विषारी दाह पचवून हा जीवनाचा प्रवास पुन्हा करावा लागतो, कसातरी रडत खुरडत! मानवी जीवन सहजा-सहजी मिळत नाही म्हणतात मग ते सहजा-सहजी संपवायचं तरी का आणि कुणासाठी?

या जगात जिथं-तिथं भरलाय तो दुष्टपणा आणि तो दिवसें-दिवस अधिकच बोकाळतोय. मनुष्याच्या हातात इतकंच आहे की या दृष्ट प्रवृत्ती निदान आपल्या मनात रूजू नयेत म्हणून प्रयत्न करायचे. त्या समाजाचं काम फक्त दगड मारून आपल्याच दगडांनी रक्ताळल्या जखमा पाहून एक आसूरी हास्य करायचं. त्या जगात सख्या बहिण-भावाच्या नात्यावर माणसं विश्वास ठेवत नाहीत तरीपण मानलेल्या बहिण-भावाच्या नात्यावर काय विश्वास ठेवणार! मनातल्या भावना जरी शुद्ध असल्या तरी त्या नात्याचं प्रदर्शन जगापुढं करणं म्हणजे आपल्याच माणसाला आपण गमावण्यासारखं असतं.

हे कलियुग आहे. कलियुगामध्ये चांगल्याचा कधी विजय होत नसतो. इथं सामाज्य असतं असल्याचं आसुरी भावनाचं, जिथं चांगल्या नात्यानं व्यक्ती एकत्र येतात तिथंच त्या समाजाची दुष्ट प्रवृत्ती जागृत होते.

माणूस एकदाच घडवला जातो जेव्हा त्याची जडण-घडण होते तेव्हांच त्याला योग्य आकार द्यायचा असतो. एकदा बनलेल्या मूर्तीचा आकार बदलता येत नाही. जो पर्यंत ती मूर्ती अस्तित्वात आहे तो पर्यंत ती जशी घडवली तशीच राहणार. ऊन, वारा, पावसाने त्याच्यात कांही बदल होतील पण मूळ आकार कधीच नष्ट होणार नाही. माणसाचंही असंच. सुख-दुःखाच्या भोवऱ्यातून निसटता-निसटता खूपसे अनुभव मिळतात. पण मूळ स्वभाव आहे तसाच राहतो. एकवेळ मेणाचा पुतळा बदलत येईल पण दगडी मूर्ती कलाकाराला एकदाच व्यवस्थित घडवावी लागते.

आपल्यासारखं जग आहे असं मानून चालण्यासारखा मूर्खपणा या जगात दुसरा कोणताही नाही! प्रत्येकाची स्वतःची अशी एक विचार करण्याची कुवत असते. जीवना संबंधीचे प्रत्येक व्यक्तिच्या वागण्यासंबंधीचे स्त्री-पुरूष संबंधी मत असतात. ती आपण बदलू शकत नाही. पण त्यांना त्यांच्या मताप्रमाणे दूषीत काही दिसणार नाही याची खबरदारी आपण घ्यायच्याी असते. कोणत्याही व्यक्तिला अगदी पहिल्या दृष्टिक्षेपात ओळखणं शक्य नसतं कधी-कधी अंदाज चुकतात. पण एकच चूक पुन्हाः पुन्हा

केली तर जीवनात ती कधी तरी भावल्याशिवाय हारणाार नाही. कितीही वर्तमानकाळच फक्त विचारात घ्यायचं म्हटलं तरी भविष्यकाळाचं भूत मानगूटावर बसून वाकुल्या दाखवत असतं. त्यासाठी जगावं लागतं आणि केंव्हाही वर्मानकाळापेक्षा भविष्यकाळच असतो. आताचा क्षण आपला असतो पण येणारा प्रत्येक क्षण आपलाच आहे हे निश्चित कसं सांगू शकणार आपण?

शत्रू तर कधी आपले नसतातच पण मित्रत्वाच्या नावाखाली जपल्या जाणाऱ्या भावनादेखिल कधी दगा देतील हे सांगता येत नाही. नशीबाचा प्रश्न असतो, नियतीची मर्जी अवलंबून असते. चुका या होणारच हे निश्चित पण या चुकामधूनच शिकायचं असतं. जीवनाला सामोरे जायचं सामर्थ्य मिळवायचं असतं. आपल्या चुकीनं दुसऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी जेवढी शक्य आहे तेवढी घ्यायची असते.

या सर्वांपासून जय व्यवस्थित वागला तरच तो मनुष्य समाजात उघड मनाने वावरू शकतो, अथवा त्याला समाजातील दृष्टितून निसटून जाणे अशक्य आहे.

जीवन हे अतिमोलाचे रे माणसा
खऱ्या अर्थाने जगण्याचे शीक
करशील धडपड दुसऱ्यांकरिता
झटशील तू दुसऱ्याकरिता
तरीच राहील नाव तुझे अजरामर
प्रत्येक क्षण मोलाचे आहे रे
क्षण वे दवडू नकोस
नाही तर होशील मातीमोल
जीवन हे अतिमोलाचे ये माणसा
खऱ्या आर्थाने जगण्याचे शीक ।।

## खंत

सारे बोलून गेले
'दगडाला पाझर फुटत असतो'
पण मी सांगून गेले
दगडापेक्षा कठोर माणूस असतो
म्हणतात ते
त्यांनाही पाझर फुटत होतें
पाहिजे तिथे फुटावा ही
आशा बाळगून होते
ओलावा त्यांच्यात कधी
दिसलाच नाही.
खंत करून उपयोग काय?
त्या दगडालाच कुठे ओलावा नाही
वाटून तेव्हा गेले,
दगडातसुध्दा प्राण संचारले आहेत
पण इथं मात्र प्राण फुंकलेले
जिवंत माणसेच दगड झाले आहेत.

आर. ए. पाटील
बी. ए. भाग १

## तारूण्य

तारूण्य
सुसाट वाऱ्यासारखं
पिसाट आगीसाराखं
बेफाम लाटेसारखं!
तारूण्य
सप्तरंगात रंगणांर
सप्तसुरात गाणारं
सप्तसागरात डुंबणारं!
तारूण्य
धडपडणारं, कडमडणारं
बंड करू पाहणारं
बंधनाचे पाश तोडून
चौखूर, चौखूर उधळणारं!

संजय बी नांदवडे
बी. ए. भाग २

## ।। काळवंडलेल मन ।।

अशाच एका दुपारी तू मला भेटलीस,
स्वर्गातून अप्सरा उतरावी तशी भासलीस,
त्याच क्षणी मला आठवण झाली
त्या सुंदर एकमेकात मिसळलेल्य
इंद्रधनुष्याची
पण........
तू आलीस तशीच निघून गेलीस,
चंचल वाटणाऱ्या वावटळी सारखी,
भिरभिरत
माझ्या सुंदर स्वप्नाचा पालापाचोळा,
गोळा करत.
आता तर माझ्या ''मी'' च उभा होतो,
आणि मी उभा जळत होतो,
निर्जीव प्रेतासारखा,
काळवंडलेल्या मनान.

पाटील एस. डी.
आकरावी (सायन्स)

# हसा . . . . हसा . . . . हसा . . . .

१) मुलीने चित्रपट गृहाच्या व्यवस्थापकाला फोनवरून विचारले - 'कोणती फिल्म आहे.'

व्यवस्थापक - ''आवों प्यार करे.''

मुलगी - ''बेशरम.''

व्यवस्थापक - 'ती पुढील आठवड्यात.'

पाटील. व्ही. जे.
एफ. वाय. बी. ए.

## विनोदी चुटका

एक खेडूत आपल्या मुलाकडे रहाण्यासाठी प्रथमच शहरात जाण्यास निघाला तेंव्हा त्याच्या शेजाऱ्याने त्याला मोलाचा सल्ला दिला होता. तो असा-

''शहरातील लोक विशेषतः दुकानदार वस्तुंचे भाव दुप्पट सांगतात तेंव्हा जरा जपून खरेदी करा.''

खेडूत शहरात आला तेंव्हा पावसाचे दिवस होते तो छत्री खरेदी करण्यासाठी एक दुकानात आला. त्यावेळी त्या दोघांच्यामध्ये खालील संभाषण झाले.

दुकानदारः- 'काय पाहिजेत गाववाले?'

खेडूतः- 'छत्री' पाहिजे.

दुकानदारः- 'सोळा रुपयास एक छत्री.'

खेडूतः- 'आठ रुपयास द्या.'

दुकानदारः- (संतापून) 'चार रुपयास देवू कां?'

खेडूतः- 'दोन रुपयास देणार का?'

दुकानदारः- (भडकून) 'फूक्कट' देवू कां?

खेडूतः- 'दोन देणार का?'

विलास आर. गावडे
बि. ए. भाग तीन

## (१) सुटे पैसे

दररोजच्या प्रमाणे आजही एस. टी. अर्धा तास लेट होती. गच्च भरलेली गाडी एका स्टॉपवर थांबली. कंडक्टर बराच वैतागलेला दिसत होता. तेव्हा आठ दहा प्रवाशांनी एस. टी.त प्रयत्नांची पराकाष्टा करून प्रवेश मिळवला. त्यातीत एकाने ७० पैशाच्या तिकीटासाठी २० रुपयांची नोट कंडक्टरकडे दिली. नोट पाहून कंडक्टर ओरडला ''ज्यांच्याजवळ सुटे पैसे नाहीत त्यानी उतरून घ्या. चला लवकर.'' त्यावर एकजण म्हणाला, ''अहो त्याना उतरायला का सांगता.'' तेव्हा कंडक्टर म्हणाला, ''माझ्याजवळही सुटे पैसे नाहीत मी तरी काय करू.'' त्यावर एक महाविद्यावान कॉलेजकुमार संधी साधून म्हणाला, ''मग कंडक्टर तुम्हीही उतरायला हरकत नाही.''

## २)बिझनेस

नुकतेच पदवीधर झालेले दोन मित्र कोणता धंदा करावा यावर चर्चा करत होते. तासभर चर्चा करूनही त्यांना एकही धंदा योग्य वाटेना. अखेर पहिला मित्र म्हणाला, ''करण्यासारखा सद्या एकच धंदा शिल्लक आहे.'' दुसऱ्याने विचारले, ''तो कोणता?'' पहिला म्हणाला, ''कुलपे बनवण्याचा'' दुसऱ्याने प्रश्न केला 'तो कसा काय?' पहिला हसून म्हणाला. '' कारण जिकडे तिकडे संप बंद होत आहेत. आता हे बघ ना. कॉलेज बंद, कारखाने बंद, दुकाने बंद असे चित्र दिसते आहे म्हणून हा न बंद पडणारा व अखंड चालणारा असा हा धंदा आहे.

धीरज देसाई
एफ. वाय. बी. ए.

### (१) सोय

शामरावांनी एक नवा पलंग विकत घ्यायचं ठरवलं. खरेदीसाठी पत्नीसमवेत ते दुकानात गेले. अनेक प्रकारचे पलंग पाहिल्यानंतर एक कमी उंचीचा पलंग शामरावांना खूपच आवडला. पत्नीला त्यांनी तसं सांगितलं, पणा त्यांच्या पत्नीने त्याला विरोध करितच सांगितलं, ''कमी उंचीचा पलंग काम कमाचा? चांगला उंचच पलंग पाहिजे.''

''अग पण उंच पलंगामुळं असा कोणता फायदा होणार आहे?'' शामरावांनी काहीशा रागानेच विचारले.

''पलंग उंचच हवा कारण पिंकी रात्री पडली तरी स्पष्ट ऐकू येईल.'' पत्नीनं स्पष्टीकरण केलं.

### (२) फिफ्टी फिफ्टी

निलीमा परीक्षेचा शेवटचा पेपर देवून घरी आली. वडीलांनी तिला थोड्या कौतुकानेच विचारले, ''बेटा निलीमा! पेपर कसा गेला?''

''फिप्टी फीप्टी!'' निलीमा

''म्हणजे ग काय?'' वडील म्हणाले.

म्हणजे असं परीक्षेत जे विचारलं ते मला समजलं नाही आणि मी जे परीक्षेत लिहलंय ते परीक्षकाला काहीच समजणार नाही.

### (३)

कवी संमेलनानंतर कवीराज घरी आले, त्यावेळी त्यांच्या तोंडावर रूमाल होता. बायकोने विचारलं, ''काय झालं?'' कवीराजानी उत्तर दिले, ''नाही तरी मला चार दात काढायचेच होते!''

### (४)

डोळे मिटून शांत वातावरणात अगदी मनोभावे प्रकाश देवाची प्रार्थना करत होता. प्रार्थना करताना तो पुटपुटत होता 'देवा, न्यूयॉर्कला अमेरिकेची राजधानी लवकरच करून टाक.'

''हे काय मागतोयस रे देवापुढे,'' आई.

''अग, मी परीक्षेत अमेरिकेची राजधानी न्यूयॉर्क असं विहलंय म्हणून,'' प्रकाश.

### (१) शर्टाचे बटन

ऑफिसला जाताना राहूलचा आरडाओरड चालला होता. कारण त्याच्या शर्टाचे बटण धोब्याने तोडले होते. सुरेखाने चटकन बटण टोचण्यास घेतले व म्हणाली, ''आम्ही बायका नसतो तर तुमच्या शर्टाची बटणे कोणी लावली असती?'' राहूल म्हणाला, ''सुरेखा, तुम्ही बायका नसता तर आम्हा पुरूषांना बटणांची गरजच नव्हती.''

**जयवंत आर. पाटील**
बारावी कला

★ मित्रप्रेम ★

वस्त्रालय रेडीमेड सेंटर

गादी कारखाना

*सुटिंग, शर्टींग, साडया, तयार कपडे,*

*गादी विक्री*

*दुरुस्ती, कॉट, पाळणे इत्यादी.*

गडहिंग्लज. फो.नं.२३१, ३३१.

"श्री काळभैरव प्रसन्न"

भोसले इंडस्ट्रीज

संकेश्वर रोड, मार्केट यार्ड नजीक,

गडहिंग्लज. जि. कोल्हापूर.

*आमचेकडे इलेक्ट्रिक व गॅस, वेल्डिंग कॉट, पाळणे, गोबर गॅस टाकी व फॅब्रीकेशन योग्य दरात करुन मिळेल.*

*शिवराज कॉलेजला आमच्या हार्दिक शुभेच्छा*

व्ही.एस.बागी. बागी पॅकेजिस प्रा.ली.

गडहिंग्लज
फो.नं. ०८, २०२

लिंगनुर.
फॅक्टरी फो.नं.२९२

सर्व रासायनिक खताचे व जैन

पी.व्ही.सी.पाइपचे

तसेच ठिबक सिंचनचे अधिकृत विक्रेते.

श्री आनंद हॉटेल

*खमंग, रुचकर, चटकदार पदार्थांसाठी*

*अल्पावधीत लोकप्रिय झालेले उपहार गृह.*

टिळकपथ, गडहिंग्लज.

# अनुपमा इलेक्ट्रिकल्स

मेन रोड, गडहिंग्लज.

*इलेक्ट्रिक साहित्याचे व्यापारी.*

प्रो. बी.एस.खोराटे.

# शिवराज टी स्टॉल

आणि

# शिवराज साउंड सिस्टीम

रुचकर व स्वादिष्ट पदार्थासाठी

व

उत्कृष्ट साउंड सिस्टीमसाठी आवश्य भेट द्या.

शिवराज कॉलनी जवळ, गडहिंग्लज.

*प्रो. दिलीप कोरवी.*

फोन २५३

# मनोहर क्लॉथ स्टोअर्स

बाजार पेठ, गडहिंग्लज.

*विमल, मफतलाल, ओ.सी.एम., रेमंड, बॉम्बे डाईंग इत्यादी नामवंत मिल्सचे अधिकृत विक्रेते.*

फॅन्सी सुटिंग, शर्टींग, साडी व ड्रेस मटेरियलसाठी अवश्य भेट द्या.

प्रो. टी.जी.पावले.

# न्यू बेन्झर सिलेक्शन

प्रत्येक प्रसंगी शोभणारे

न्यू बेन्झर मधील रेडीमेड कपडे

आधुनिक फॅशन युगातील उत्तम प्रतीच कापड,
अभिजात विवीध रंग, अत्युत्तम पोत,
नेमक्या मापाच्या आणी सर्वात माफक भाव
याचे उत्तम प्रमाण म्हणजे न्यू बेन्झर
मधील जैंन्टस् व लेडीज रेडीमेडस्.

शर्टस्, पॅंटस्
बलुन बॅगी पॅंटस्
जीन्स्
टि शर्टस्, टॉप्स्
स्कर्टस्
चुडीदार, लुजर्स
सलवार, मिडिज्

## न्यू बेन्झर सिलेक्शन

गडहिंग्लज–४१६५०२

*उत्तम प्रतीसाठी आतां अधिक किंमत द्यायची गरज नाही.*

# प्रथम वर्गाचे मानकरी


हसीना मालदार


एस्.एम्. कुलकर्णी


बाबासाहेब पाटील


एस्.डी. पाटील


जोडगुही एन्.एस्.


मुकुंद चौगुले


मातले एस्.एन्.


मोर्ती ए.एम्.


गावडे एस्.एम्.


पाटील टी.के.


पाटील नामदेव


जाधव प्रदीप


दरेकर सी.एम्.


येसरे आनंद


माने रामचंद्र


खुले ए.एस्.


मोरे पी.एस्.


आर.डी. सालम


खरुड व्ही.ए.


केसरकर एस्.बी.


होलम एस्.पी.


काळे एस्.आर.


माळी एस्.वाय्.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे

**शिवराज महाविद्यालय,**

गडहिंग्लज

शिवराज महाविद्यालयात
कला,वाणिज्य आणि विज्ञान शाखेत
शिक्षण घेत असलेले हे गुणवंत विद्यार्थी
विद्यापीठीय परीक्षेत
प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले आहेत
या सुयशाबद्दल महाविद्यालयातर्फे
त्या सर्व विद्यार्थ्यांचे
मनःपूर्वक अभिनंदन!

डॉ. डी. व्ही. लोगले
प्राचार्य

# शिवराज वैभव

## प्रथम वर्गाचे मानकरी


ढेकळकर पी.टी.


नाईक बी.एस्.


जॉन्सन डिसोझा


आजगेकर पी.एम्.


पाटील जी.के.


सावंत उमेश


शिंदे तानाजी


साळोखे पी.बी.


हजारे एस्.एच.


देसाई.एम्.एम्.


कोचरी एस्.एम्.


किणी ए.व्ही.


कदम एम्.जी.


कांबळे डी.के


जाधव पी.एस्.


चौगुले जी.बी.


मुसळे जे.ए


चौगुले एस्.एस्.


पाटील आर.डी.


गोविलकर आर.जी.


किरण नलवडे


रोटे आर.बी


चव्हाण एस्.एम्.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे

**शिवराज महाविद्यालय,**

गडहिंग्लज

शिवराज महाविद्यालयात
कला,वाणिज्य आणि विज्ञान शाखेत
शिक्षण घेत असलेले हे गुणवंत विद्यार्थी
विद्यापीठीय परीक्षेत
प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले आहेत
या सुयशाबद्दल महाविद्यालयातर्फे
या सर्व विद्यार्थ्यांचे
मन:पूर्वक अभिनंदन!

डॉ. डी. व्ही. तोगले
प्राचार्य

# हिन्दी विभाग



## अंतरंग


| | |
|---|---|
| अंमली पदार्थोंका सेवन:.... | १ |
| इच्छाएँ हो तो रास्ता.... | २ |
| जिंदगी की खोज | ३ |
| परिवर्तन | ४ |
| नतीजा | ५ |
| **संदन** | |
| क्यों | ७ |
| तनहाई | ७ |
| कहीं दूर चले | ७ |
| सूनी महफिल | ७ |
| **संदन** | |
| खिलौना | ८ |
| राज–ए–मोहब्बत | ८ |
| एक डाल के पंच्छी | ८ |
| चिडियाँ | ८ |
| **संदन** | |
| याद | ९ |
| मातृभूमी | ९ |
| टूटा हुआ धागा | ९ |
| याद | ९ |
| जब याद किसीकि आति है | ९ |


**विभागीय संपादक**

प्रा. डॉ. के. आर. पाटील.

प्रा. राजा महाजन.

*शिवराज कॉलेजला*
*आमच्या हार्दिक शुभेच्छा*

## कागे कलर
## फोटो स्टुडिओ

मेन रोड,
गडहिंग्लज.

## सरिता

इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड इलेक्ट्रीकल्स

मेन रोड, गडहिंग्लज.

१) टि.व्ही., रेडिओ, ऑडिओ अँन्ड व्हीडियो विक्री व दुरुस्ती
२) इलेक्ट्रानिक्स स्पेअरपार्ट व इलेक्ट्रीकल मटेरिअल होलसेल व रिटेल विक्रेते.
३) ओरिजिनल कंपनी कॅसेट रेकॉर्डिग करुन मिळेल.

*प्रो. विजय नांदवडे.*

## ★ कोलेज ★

अॅटोमॅटीक (जपान कॅनन) झेराक्स सेंटर

*फक्त एकच सेकंदात सुबक,*
*ठळक, सुस्पष्ट, स्वच्छ*
*झेरॉक्स कॉपीजसाठी भेटा.*

डॉ. गुणे गल्ली (राणी लक्ष्मीबाई रोड)
गडहिंग्लज.

## प्रिन्स सिलेक्शन

*"प्रिन्स" मधील एक्सक्लूझिव्ह जेन्टस् आणि लेडीज रेडिमेडस् म्हणजे तुमच्या भारदस्त व्यक्तिमत्वाला मिळालेली नवी साथच......!*

## प्रिन्स टेलर्स

शर्टस्
पँटस्
बलुन बॅगीज्
जीन्स्
टिशर्टस्
स्कर्टस् टॉप्स्
चुडीदार
मिडिज्
लुजर्स
सलवार



**PRINCE**

MAIN ROAD,
GADHINGLAJ-416 502.

# ★ अंमली पदार्थोंका सेवनः एक चिंता ★

संजीवकुमार झवरी
प्रथम वर्ष कला

आजका युवकवर्ग सुशिल, सुशिक्षित, बेकार और परिस्तितीसे पीडित है। तारुण्य का जोश ओर गरम खून होते हुए भी 'बेकारी' की वजहसे वे दिशाहीन अवस्थामें भडकते नजर आते है। अच्छी पात्रता होकर भी नोकरी नहीं मिल पाती। इसलिए आजके युवक निराश और उदासीन होकर तंबाखू, सिगरेट, चरस ओर मद्यके साथ आजके आधुनिक शुगर (गर्द), एल.एस.डी जैसे घातक पदार्थोका सेवन करने लगे है। अर्थात अमंली पदार्थोंका सेवन केवल युवकवर्ग ही नहीं करता। समाज में के अन्य लोगोंका प्रमाण कही कम नही है। ग्रामीण इलाकोमें यह अमंली पदार्थोंका लोग कभी नहीं दिखाई देता। लेकिन शहरी समाजमें इसका प्रमाण ज्यादा है। हमारे राष्ट्र के भवितव्य के द्रष्टीसे यह बहुत चिंतात्मक विषय है।

अंमली पदार्थोमें का पहला गट 'ओपिएटस्' अफू वा तत्सम पदार्थ इस गट में होते है। इस अफू के बोंडसे 'मार्फिन' यह रसायन खोज निकाला। यह रसायन वेदनाशामक होता है। मार्फिन का ही भाईबंद 'कोडेन'। यह खोकलेपर प्रभावी और वेदनाशामक है। हेरोयिन को व्यवहारोमें 'जक' वा 'एस' कहा जाता है। इसके बाद 'ब्राउन शुगर'। यह हेरोईन का ही एक 'भसिळी स्वरूप' है। हेरोयिन के पावडर में चाँक (खडू), जस्त, चूहोंका जहर, धोतरे की पूड, डायझिपॅ की (काम्पोस) पूड ऐसी घातक पदार्थ उसमें मिक्स कीए जाते है। और ब्राउन शुगर तयार होता है। ब्राउन शुगर को 'स्मॅक' ऐसे सी कहते है। भारतीय भाषा में इसको 'गर्द' कहते है।

यह अंमली पदार्थ सेवन करने से शरीर और मन को नजेला (झूटा) आता है। भ्रम निर्माण होते है। परिणामी नयी कल्पनाएँ सुझ गयी है, ऐसा लगता है। चिंता का प्रमाण कम होता है। किंबलूना 'ब्रेन' बधिर होने के कारण कुछ टाइम के लिए चिंता खत्म होती है। शारीरिक व्याधी की वेदना भी कुछ देर के लिए खत्म होती है। लेकिन यह सब कही टाइम के लिए होता है। नशा उतरने के बाद व्यसनासक्त व्यक्ती फिर अंमली पदार्थ सेवन करनेके तरफ बढती है। लेकिन यह पदार्थ बहुत मेहंगे होते हैं। इसलिए यह व्यक्ती अपने पास के रुपये खत्म होने के बाद घरमें से या बाहरसे रुपये चुराकर अंमली पदार्थ सेवन करती है। इसके सिवा उनको चैन नहीं मिल पाता। अगर ऐसी व्यक्तीने अंमल पदार्थ सेवन न किया तो वह पानी के बाहर निकालीहुई मछली के तरह तडपती है। इस पदार्थोके सेवन से शरीर का साथ मन और बुध्दी भी खत्म हो जाती है।

आज अंमली पदार्थ विरोधी संघटना निकालना चाहिए। रेडिओ, टि.व्ही, भित्ती पत्रके, नाट्यलेखन, साहित्य, चित्रपट आदी माध्यमाद्वारा अंमली पदार्थ सेवन के दुष्परिणाम समाज को दिखलाना चाहिए। समझाना चाहिए। कोई व्यक्ती अंमली पदार्थ का सेवन करने तरफ झुक रही है। ऐसे व्यक्ती को इससे परावृत्त करने का प्रयत्न उस व्यक्ती को करना चाहिए। अंमली पदार्थ विरोधी बहुत से कायदे कानून है। पिछले कही दिनों में ही अंमली पदार्थ विरोधी कानून में अंमली पदार्थ की विक्री करनेवाले साठा या निर्मिती करनेवाले व्यक्ती को 'गुन्हेगार' समझकर दूसरी बार पकडलिया तो 'मृत्यूदंड' का शासन दिया जाएगा ऐसी तरतूद की है। अंमली पदार्थ विरोधी मोहिम यशस्वी करनेके लिए—राष्ट्रीय निधी भी खडा करने की तरतूद भी उस विधेयक में है। शासन व्यवस्था नें अंमली पदार्थ विरोधी लिए हुीं यह भूमिका स्वागतार्ह है।

अंमली पदार्थोंका व्यसन यह भयानक और घातक व्यसन है। यह व्यसन एक बार लगा तो छूटना दूरापास्त है। इस व्यसन से व्यक्ती अपना सारा आयुष्य बरबाद करती है। हमारे राष्ट्र की युवापिढी और सारा समाज बरबाद करने के लिए हमारी शत्रू राष्ट्रे अंमली पदार्थ के माद्यम द्वारा प्रयास कर रही है। ये जानकर, समझकर हमें उन व्यसनोंसे दूर रहकर स्वयं को, समाज को और पर्यायसे राष्ट्रको बचाना चाहिए। "जिस राष्ट्रके युवक निर्व्यसनी और शक्तीशाली होते है—वही राष्ट्र प्रबल होता है।" यह युवक वर्ग के ध्यानमें वहेगा क्या? फिर तो कसम। ऐसी कि मैं किसी भी हेलत पर अंमली पदार्थोका सेवन नही करूंगा। कोई व्यक्ती कर रही तो उसे—उससे परावृत्त करने का प्रामाणिक प्रयास करूँगा।

* * * * *

# ★ इच्छाएँ हो तो रास्ता भी मिलता है ★

पटेल. ए.एम.
त्रतीय वर्ष कला.

स्कूल की घंटी बजी। भरभर सभी विद्यार्थी बच्चे अपने क्लासमें जाने लगे। गुरूजी भी क्लासमें आये। सभी बच्चे अपनी अपनी जगह पर बैठ गये। गुरूजी हजेरी देखना शुरु किया। एकाएक की हजेरी देखते–देखते वे इकतिसवे नामपर आये, 'राजू पवार' यह नाम उन्होने पुकारा। ' नमस्ते' की आवाज नहीं आयी। इसलिए उन्होने अपना मुँह उठाकर देखा। हररोज कि तरह राजू अपनी जगहपर नहीं था। इतनेमें उसके मोहल्ले में रहनेवाला लडका कहनेलगा 'गुरूजी, वह तो कल लोकलसे नीचे गिरपडा'।

यह शब्द सुनतेही गुरूजी के साथ पूरा क्लास उस लडके की तरफ देखने लगा। क्लास में किंचित धीरे–धीरे आवाज के साथ बच्चौ में बातचीत होने लगी। क्या कहे यह थोडी देर किसे कुछ समझमें न आया।

राजू गुणी लडका था। एखाद दिन उसे स्कूल आने में देर हुई तो वह दरवाजे के पास ठहरकर 'गुरूजी, में अंदर आ सकता हूँ?' इसतरह पूछकर ही वह क्लासमें आता। ऐसे 'राजू' का अपघात हुवा था। यह समझते ही गुरूजी उस लडके को कहने लगे। उसे कितनी चोट आयी है, उसे कहाँ–कहाँ मार लगा है, यह तुमने देखा है?

यह कहने लगे, 'नही, वह लोकलसे नीचे गिरा ऐसा लोग कह रहे थे'। गुरूजी कहने लगे, 'कल आतेवक्त उसे पूछकर उसके बारेमें जानकारी हासिल करके ही आना।'

दूसरे दिन हररोज कि तरह गुरूजी हजेरी लिखना शुरु करनेहीवाले थे कि ऐसेमें, 'गुरूजी मैं अंदर आ सकता हूँ?' यह शब्द उन्हे सुनायी दिये। अपना मुँह उपर उठाकर देखा तो राजू पवार दरवाजेपर ठहरा हुवा था। सभी आश्चर्यचकित होकर उसके तरफ देखने लगे। राजू को देखतेही सभी बच्चे खुश हुए। करीब बुलाकर उसके पीठपर स्नेहसे हाथ फेरकर गुरूजी राजू कि विचारपूस करने लगे।

राजू कि दाहिने कान कि एक बाजू काली और नीली पड़ी थी। एक आँख कि भुवईपर सूज चढी थी। गालोंपर कुछ लेपसा लगाया हुवा था। गुरूजी कहने लगे, 'अरे तेरा अपघात कैसे हुआ, ऐसे किसतरह तू नीचे गिरा?' राजू कहने लगा, 'कल लोकलमे बहुत भीड थी। उसी धक्का धक्की से मैं किसी भी तरह बाहर आया, दुसरी लोकल करीबही खडी थी। उसे पकडनेके लिए मै दौडपडा। इतने में गाडी छूटि। उस चलती गाडीमें चड़नेका प्रयास किया लेकिन मेरा हाथ छूट गया। और मै प्लाटफार्मपर गिर पडा। मेरे हाथों में गोलियों का डिब्बा था। वह भी दूर फैका गया और सभी गोलियाँ प्लाट्फार्मपर गिर पडे।'

गुरूजी कहने लगे, 'गोलियोंका डिब्बा? कौनसी गोलियाँ?' इतने में एक लडका बीच मे कहने लगा। 'गुरूजी वह तो लोकल में गोलियाँ बेचता है।' यह सुनतेही राजू को उन्होने पूछा, 'क्या यह सच है?' उन्होने सिर्फ होकारार्थी गर्दन हिलाई।

गुरूजी फिर पूछने लगे, 'घरमें और कौन कौन है तुम्हारे?' राजू कहा, 'मा, बाप और दो भाई है।'

'तुम्हारे पिताजी क्या करते है?'

'वे घरमे ही रहते है।'

सही बोध न होने से उन्होने फिर पूछा।

'पिताजी घरमें रहते है इसका मतलब?'

वह कहने लगा, 'वे बीमार रहते है, इसलिए उनकी नौकरी चली गई। माँ चार घरोंकि कपडे, बर्तन धोने का काम करती है और उन्हे मैं थोडा मदत करता हूँ।' गरूजी कहने लगे, 'कैसी मदत करता है तू?' वह कहने लगा, 'स्कूल छुटतेही में घर जाता हूँ और उसके बाद चर्चगेट से विरार तक गोलियाँ बेचता हूँ। एक स्टेशन जाकर दूसरा आनेपर दुसरे डिब्बे मे घुसता हूँ। एक गाडी से दूसरी गाडी मे चढता हूँ। घर वापस आने मे कभी कभी रात के बारह भी बजते है।' गुरूजी कहने लगे, 'इतनी कष्ट उठानेपरभी तुम्हे कितने पैसे मिलते है?' 'कभी दो तो कभी तीन रुपये मिलते है और जो कुछ मिलते है वह सब अपनी माँ के पास देता हूँ।' यह सुनकर गुरूजी कहते है, तो फिर पढाइ कब करते हो? वह कहने लगा, 'रात को थकवा आनेपर सो जाता हूँ, सुबह जल्दी उठकर जितना वक्त मिले उतनी पढाइ कर लेता हूँ। माँ कामपर गइ तो मुझे मेरे छोटे भाइयोंको देखना पडता है। लेकिन छुट्टीके दिन बचा हुवा पूरा अभ्यास मैं कर लेता हूँ।'

राजू अपनी कहानी सुना रहा था तो पूरा क्लास आँखे फाडकर देख रहा था। उसका कथन समाप्त होनेपर उसकी पीठथपथपाकर गुरूजी कहने लगे, 'शब्बास राजू। विद्या पर अपना प्यार चाहिए। तेरी यह जिद्द और धडपड देखकर मुझे बहुत आनंद हुवा। जहा इच्छाऐ है, वहीपर ही मार्ग है, यही सच है। तेरे जैसा विदयार्थी अपने क्लास में है इसका अभिमान किसे नही होगा?' ऐसा कहकर उन्होने अपनी क्लास की तरफ देखा।

गुरूजी का यह वाक्य पूरा खत्म हुवा ही नही था तो पुरा क्लास तालियों कि आवाज से गूंज उठा।

**जिंदगी एक ऐसी गुलिस्थान है, जहाँ हर–तरह के फूल अपने गुण–गंध–रुप आदी से दूसरों पर प्रभाव डालते है। कई इश्वर के गले का हार, कइ पार्थिव देह के गले का हार, कई नारियों के बाल का शृंगार बन जाते है। हर एक की तकदीर भिन्न है। कोई सुख पाता है। कोई सदैव अशांत रहता है।**

# ★ जिंदगी की खोज ★

कु. लता मा. गवळी.
बी.एससी–१.

जिंदगी एक ऐसी गुलिस्थान है, जहाँ हर–तरह के फूल अपने गुण–गंध–रुप आदी से दूसरों पर प्रभाव डालते है। कई इश्वर के गले का हार, कइ पार्थिव देह के गले का हार, कई नारियों के बाल का शृंगार बन जाते है। हर एक की तकदीर भिन्न है। कोई सुख पाता है। कोई सदैव अशांत रहता है।

In fact, the world is lifeless without chemistry. The vital processes of breathing, digestion, oxidation of food for energy release, photosynthesis etc. are all based on chemical reactions. Haemoglobin and chlorophyll, the vital compounds for human and plant life are chemical and participate in important chemical changes in carrying oxygen and storing food. Almost everything around us takes place because of chemical reactions.

It is impossible to count the number of chemical reactions taking place in the course of a split second. The moment we start counting, our brain starts carrying out a number of chemical reactions. We see, hear, smell and taste because of chemical reaction taking place. ***Our brain is able to help us in learning and remembering because of chemical reactions. The various glands in the human body are able to release the most important chemicals that are vital for all the physiological processes that are essential for life.*** Similarly the green plants around us get food by converting the carbondioxide in air and water from the ground in presence of sunlight. When men and animals eat the plant food they convert the food into energy by means of the respiration process.

An interesting example of chemical reaction concerns the formation of **common salt**. Do you know how this safe and essential kitchen item is made in the chemical laboratories? Starting from its basic elements common salt is chemically known as Sodium Chloride. Explosive metallic Na burns in poisonous chlorine gas to form the safest of all kitchen chemicals. Surprising, isn't it?

# Great Woman of Modern India

**— Sandeepkumar Kagarade**

**B.A. I**

India has produced not only great men but also great women whose noble achievements decorate the pages of India's history. Perhaps no country in the world has produced fine examples of distinguished feminity than India. Sarojini Naidu, Annie Besant and others have rendered remarkable services to their country without sacrificing the dignity of womanhood.

Sarojini Naidu was a poet and patriot. Once upon a time, a little Indian girl was shut up in a room alone for a whole day by her father because she would not learn English! The child was Sarojini Chattopadhyaya who later on became one of the most distinguished poets in the very language she had refused to learn.

Sarojini, like the rest of her family, was educated in her early years under her father's own care. Her father wanted her to become a great mathematician or scientist, but she did not like doing sums or experimenting. She loved to dream and to write poems. She wrote her first poem when she was hardly eleven. When she was thirteen she wrote a long poem in the manner of the famous English poet, Sir Walter Scott. In this way began her poetic career.

At the age of twelve she passed the matriculation examination of the Madras University and before she was fifteen she went to England as State scholarship holder. She studied first at King's college, London and then at Girton, the famous woman's college at Cambridge.

It was during her stay in London that she met the late Sir Edmund Gosse, a distinguished critic and man

of letters. He was very much impressed by her poems. Since then she has published three well-known books of poems— The Golden Threshold, The Bird of Time, and The Broken Wing, all of which deal with India. All her poems are full of beauty, music and the magic of the east.

In September 1898 she returned to India, and in the face of all opposition married doctor Naidu, a non Brahmin. By this she proved that she was a great social reformer. She spent quite a number of years in Hyderabad, playing a very important part in the social life of the city. She began to interest herself in the Indian Women's Movement and soon came to be one of its important leaders.

With this, her career as a poet came to an end. Now, she began to feel that it was not enough to write beautiful poems. India needed active service; and so she took to politics. Since then she has taken a great part in all the social and political movements in India. In 1925 she was elected president of the Indian National Congress. She has also been President of the Indian Women's Conference.

***Two ideals seem to have inspired Sarojini Naidu's life her intense love of beauty and her desire to serve her country and mankind. She was both a poet and patriot. She was also a great orator.***

Above all, Sarojini Naidu has been a great peace-maker. She has done much to bring the Hindus and the Muslims together, for she believes that India cannot become great unless there is Hindu-Muslim unity.

## Two Flowers

Two beautiful flowers
Blooming in garden, with pleasure
One white, pink the other
Enchanting smell, full of shower
At morn, a gardener came there
Cut the two with delicate fingers
Offered white to God and
Pink to the dead
Their futures differ.

**— Rajendra G. Patil**
**B.Com II**

## Loneliness

Night, I and empty house
Strong wind banging doors
At the end of a courtyard
The solitary rose.
Now, I and empty house
strong wind, banging door
Thick sorrow draped on walls
and dust falls from yesterday
into eyes and moistens them.

**— Arbhavi B. Ishwar**
**B.Com II**

## Mathematics of Life

In my life of twenty years
No sum did ever favour
But only the work was keeping minus
That totaling the zero forever.
Whatever trials I made so far
Where love and faith to multiply
They merely laughed at me aloud
And thus I have none to divide
The parallel lines do never meet
A line also never ceases to sit
Knew I well, the circle can't be crossed
But always I tried to cross and pass!
Still, I don't know how to keep
With my missing mathematics
Will it diverge to infinity
Or will it converge to a big knot?

**— Ashok G. Devan**
**B.Sc. II**

## What is a Friend

One whose grip is a little tighter
One whose deeds are a little righter
One whose smile is a little brighter
That's what I call a friend
One who'll lend as quickly as borrows
One who's the same today as tomorrow
One who'll share your joy and sorrow
That's what I call a friend
One whose thoughts are a little cleaner
One whose mind is a little keener
One who avoids what's meaner
That's what I call a friend
One who's been fine when life's been rotten
One whose ideas you've not forgotten
One who's given more than taken
That's what I call a friend.

**— Prakash R. Patil**
**B.A. III**

## The Green Signal

The whirl wind has stopped forever
The trees are calm,
like yards of grave
The sea is silent
like a kid sleeping in the arms of his mother
But, Why?
The ship is yet anchored
Perhaps,
The captain might not have got,
'The Green Signal'
'The Green Signal'

**— Patil Shrikrishna B.**
**M.A. I**

## THE THREE RULES OF LIFE

What is the Iron Rule?
The rule of savage men,
If evil is done unto you,
Evil do thou again,
This is the Iron Rule.
What is the Silver Rule?
The rule of worldly men;
If good your neighbour does to you,
Do good to him again,
This is the Silver Rule.
What is the Golden Rule?
The rule of righteous men,
If evil is done unto you,
Return thou good again,
This is the Golden Rule.

**— SandeepKumar S. Kagavade**
**B.A. I**

## Bodyless

This is a short poem. We all know that when man goes to office in the morning and comes in the evening he is too tired. So much so that he feels bodyless. This poem is taken from a Hindi book and is translated into English.

When he came home in the evening
Soon a miracle came to light
No one took care of him
Wife did not ask for tea
Children sat in another room
Servant busy in sweeping floor
As he was not he.
And then slowly he knew
Oh, today where is my body
He wanted to start radio
but, hands were not there
He wanted to speak
but mouth was not there
Oh, sight is there
but eyes had disappeared
He thought head is not working
Then . . . . Then, how I came home?
And at that time he knew that,
Absentmindedly, he had kept his head in office
Hands will have been stuck in bus
Eyes will have been busy checking files
Mouth will have been stuck with telephone
And legs will have been stuck on the road, while walking
So, he came home like a bodyless person.

— **Mulla F. D.**

# Love is . . . . . . .

Love is patience and it is kind
It does not envy and it does not boast
It is not proud and it is not rude
It is not self seeking and is not easily found
Love is like water to a fish
Air to humans and sugar to tea
Love is a feeling
You never felt before
Love is produced by the soul
Nurtured by purity
Grown on the milk of self sacrifice
And made immortal by the truth
Love is an itch around the heart
You cannot scratch
Love is the corner stone of human relationships
If the corner stone crumbles
The whole edifice falls
Love is mutual caring
And sharing
Of sentiments
From the depths of heart
Love is fire
Against which there is no insurance
Love is best used
If is given
When least expected.

**— Gadantram D. L.**
**B.A. II**

# College N.C.C. / N.S.S.



अरविंद डोमणे
ऑल इंडिया ट्रॅकिंग कॅम्प निवड



N.C.C.



मिरहोळी एस्. ओ.
ऑल इंडिया ट्रॅकिंग कॅम्प निवड



पकाले. ए. डी.
ऑर्मी. अॅटॅचमेंट कॅम्प निवड.



परीट पी.ए. अॅन्युअल ट्रॅकिंग कॅम्प,
संगीन योध्दा, व्दितीय क्रमांक.



पाटील यशवंत,
जयसिंगपूर कॅम्प, उत्कृष्ट धावपटू.

*N.S.S.*



दावणे आर.जी.
N.S.S. स्टुडंट लिडर, (कामर्स)



बामणे पी.एस.
N.S.S. स्टुडंट लिडर, (आर्टस्–सायन्स)

## श्री बालाजी
## स्पेशालिस्ट

शुभ कार्यासाठी शुध्द शाकाहारी भोजन
तयार करण्यासाठी आचारी मिळेल.

*संपर्क–*

**दि.श.पांडे**

डॉ.पेडणेकर हॉस्पीटल शेजारी,
भडगांव रोड, गडहिंग्लज.

## हॉटेल शीतल

*रुचकर व खमंग फराळाचे जिन्नस*
*मिळण्याचे एकमेव ठिकाण.*

प्रान्त ऑफीस समोर,
मेनरोड–गडहिंग्लज.

## मे. बी.ए.दिवेकर

फोन नं : ३४२

२०७५–बँक ऑफ इंडिया जवळ,
गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर.

**ए.सी.सी सिमेन्टचे**
**अधिकृत स्टॉकिस्ट.**

***शाखा–*** *यशवंतनगर, गारगोटी.*

फोन नं : १२८

## मे. शाह ब्रदर्स

मेनरोड, गडहिंग्लज–४१६५०२

*सर्व प्रकाराचे तेल, ऑईल इंजिन्स,*
*इलेक्ट्रिक मोटार पंपसेटस्,*
*पाइपफिटिंग, हार्डवेअर इ. साठी भेटा.*

स्टॉकिस्ट – बजाज इलेक्ट्रिक पंपसेट,
सबमर्सीबल पंपसेट–
किसान पी.व्ही.सी.पाईप्स–
बागलकोट आणी एल.टी.सिमेंट.

# विविध विद्या शाखा



–मराठी–हिन्दी–इंग्लिश एम.ए.–



हिन्दी विभाग



मराठी विभाग



इंग्लिश विभाग



पदार्थ विज्ञान विभाग



अर्थशास्त्र विभाग

# विविध विद्या शाखा



समाजशास्त्र विभाग



राज्यशास्त्र विभाग



अकौन्टन्सी



औद्योगिक व्यवस्थापन



ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार



रसायन शास्त्र विभाग

# अहवाल १९८८-८९

## 'शिवराज कथा-कविता स्पर्धा'

१९८८-८९ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यासाठी कथा-कविता स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांनी या निमित्ताने व्यवस्थित लिहायला शिकावे आणि आपल्या कडूगोड अनुभवांना शब्दाद्वारे चित्रित करावे या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन केलेले असते. विद्यार्थ्यांनी लिहून आपल्या अनुभवांना आकर देणे हा विद्यार्थी जीवनातील त्यांच्या जडणघडणीचाच एक भाग आहे हे लक्षात घेऊन त्यांच्यातील गुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धा घेतल्या जातात.

या वर्षी या स्पर्धेत ३० कथा आणि १५० कविता आल्या होत्या.

ज्युनिअर आणि सिनिअर या दोन गटांत, मराठी, हिंदी व इंग्लिश या तीन माध्यमातून आणि कथा व कविता या घेण्यात आल्या. ३६ प्रशस्तीपत्रके असणारी ही महाविद्यालयीन पातळीवर होणारी एकमेव स्पर्धा आहे. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ वार्षिक स्नेहसम्मेलन प्रसंगी विख्यात कथाकार शंकर पाटील यांच्या हस्ते पार पडला.

**प्रा. सुधीर जोशी**
स्पर्धा संयोजक

## भित्तीपत्रक 'शिवांजली'

दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील 'शिवांजली'चे अंक साहित्याने भरगच्च होते. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या साहित्यगुणांना वाव द्यावा यासाठी शिवराज कॉलिज येथे शिवाजंली हे भित्तीपत्रक ( ) चालविले जाते. या भित्तीपत्रकात विद्यार्थ्यांचे कथा, कविता, व्यक्तिचरित्रात्मक लेख, वैचारिक लेख, परिक्षण, संकलन वगैरे तऱ्हेचे साहित्य प्रसिध्द केले जाते.

**विद्यार्थी – प्रतिनिधी**
विनायक कोचरी ११ वी सायन्स,
टी. के. पाटील, प्रथम वर्ष साहित्य,
डी. व्ही. पावणे, द्वितीय वर्ष वाणिज्य

**प्रमुख**
**प्रा. अनील गवळी**

## हुंडा बंदी समिति

१९८८-८९ या शैक्षणिक वर्षामध्ये शिवराज कॉलेजमध्ये हुंडा बंदी समिति स्थापन झाली.

या समितीतर्फे महाविद्यालयीन युवक-युवती व समाजामध्ये हुंडाविरोधी प्रबोधन करण्याच्या उद्दिष्ट्याने काही उपक्रमांचे आयोजन केले गेले.

१) या उपक्रमांचे उद्‌घाटन प्रा. बन्ने व्ही. एस. यांच्या व्याख्यानाने करण्यात आले. त्याचवेळी 'हुंडाबळी समस्या' या विषयावरील पोस्टर्सचे अल्प प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांचा व विद्यार्थिनींचा या प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याच वेळी प्रश्नोत्तरे व चर्चाही घडून आली.

२) १९८८-८९ वार्षिक स्नेह संमेलनामध्ये या समितीतर्फे 'हुंडाबळी समस्या' विषयावर रांगोळी व चित्रांचे प्रदर्शन (कलाकार आमचे विद्यार्थी) व स्पर्धा आयोजन व वर्तमानपत्रातील हुंडाबळी बातम्याचे संकलन करण्यात आले.

३) 'हुंडा एक सामाजिक कलंक', 'हुंडाबळी समाजातील कीड' इ. विषयांवर मराठी, हिंदी व इंग्लिशमध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच या वर्षी समितीतर्फे मनोरंजनाद्वारे प्रबोधन करण्यासाठी काही कार्यक्रमाचे आयोजन केले गेले आहे.

त्यापैकी:-

१) श्री. नारायण अतिवाडकर बेळगांव यांचा 'हुंऽऽ हुंडा' व 'माझीच लेक माझीच सवत' हा एकपात्री प्रयोग.

२) व्याख्याने- यासंबंधी कायदेशीर सल्ला व माहिती देणारे वकिलांचे व्याख्यान झाले.

**प्रा. सौ. मुजूमदार**
विभाग प्रमुख

## रक्षाबंधन

आमच्या कॉलेजमधील बी. एस्सी. भाग-२ या वर्गाने ''राखी बंधनाचा'' कार्यक्रम शनिवार दि. २७ ऑगस्ट १९८८ रोजी आयोजित करून मोठ्या उत्साहात पार पाडला. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. हा रक्षाबंधनाचा कार्यक्रम रौप्यमहोत्सवी वर्षापासून सुरू करून या वर्गाने आमच्या महाविद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेत मानाचा तुरा खोवला आहे व इतर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या पुढे एक नवीन आदर्श ठेवला आहे.

**द्वितीय वर्ष विज्ञान**
विद्यार्थी-विद्यार्थिनी

# वार्षिक स्नेहसंमेलन

(प्रा. एम. आर. धनगर तथा करगार)
स्नेहसंमेलन प्रमुख

विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुका व वार्षिक स्नेहसंमेलन ही दोन महाविद्यालयीन जीवनातील दरवर्षी येणारी दोन प्रमुख आव्हाने आहेत. इथल्या परंपरेला साजेशा वातावरणात पहिले बिनबोभाट यशस्वीरित्या पहिल्या सत्राच्या प्रारंभीच पार पडले. दुसरे आले ते कांहीशा असाधारण पूरिस्थितीतच. दुसऱ्या सत्रातील प्राध्यापकांचा प्रदीर्घकालीन संप व अभ्यासक्रम भरून काढण्याची विवंचना, त्यातच स्नेहसंमेलन आले. विद्यार्थ्यांच्या अपरंपार उत्साहाच्या या दिवशी कला, क्रीडा, कल्पकता, करमणूक, मनोरंजन व गाठीभेटी अशा गोष्टींना उधाण यावयाचे असते. इतर कॉलिजनी या उपक्रमाला सोईस्कररित्या फाटा दिलेला. आमच्या कॉलिजने मात्र तो अत्यंत यशस्वीरित्या आखून पार पाडला.

यंदाच्या ॲन्युअल सोशल गॅदरिंगमध्ये उत्तमोत्तम कार्यक्रम योजून ते सर्वांगसुंदर स्वरूपात विद्यार्थ्यांनी सादर केले. क्रीडा, करमणूक, मनोरंजन, हळदीकुंकू, हुंडाबंदी प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, कविसंमेलन, कथाकथन, फनीगेम्स, फॅन्सीड्रेस, शेला, पागोटे, फिश-पाँड्स्, अल्पोपहार असे भरगच्च व नाविन्यपूर्ण उपक्रम आंखले होते. प्रा. कॅप्टन आनंदराव नाळे व प्रा. श्रीपतराव सावंत यांच्या निपुण अनुभव संपन्न मार्गदर्शनाखाली यू. आर. श्री. सुधीर जाधव, एल. आर. कु. रवपझावि, कु. खानविलकर, ज्यु. जी. एस., ज्यु. एल. आर. यांच्या पुढाकाराने सातत्याच्या परिश्रमाने हॉकी, क्रिकेट, कबड्डी, खोखो, धावणे, लांबउडी, उंच उडी, थाळी फेक, भाला फेक इ. उपक्रम यशस्वीपणे पार पडले. दि. १७-२-८९ रोजी सकाळी ८ वाजता प्रा. चंद्रहास धुमाळ यांच्या सौंदर्यदृष्टीतून साकार केलेल्या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष मा. कदम अण्णा यांच्या स्नुषा सौ. सरिता कदम यांच्या शुभहस्ते पार पडले. प्रा. सौ. मुजूमदार यांच्या संयोजनाखाली आखलेल्या हुंडाबंदी प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे उदार देणगीदार श्री. व सौ. के. जी. पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. हळदीकुंकवाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमात उदंड प्रतिसाद मिळाला. संध्याकाळी खूप उशीरापर्यंत हा सोहळा चालला. प्रा. विष्णू सुरंगे यांच्या कलात्मक धारणी बॅजेस दोन दिवस मिरवले गेले. विविध मनोरंजनाचा अत्यंत देखणा व सिध्दहस्त दिग्दर्शनाचा कार्यक्रम रात्री ९-३० वाजेपर्यंत प्रा. निरंजन खिचडींनी सादर केला. फनीगेम्स व फॅन्सी ड्रेस्चे भरगच्च कार्यक्रम प्रा. डॉ. कृष्णकांत पाटील यांच्या वैयक्तिक देखरेखीखाली दोन दिवस पार पडला. ता. १८ फेब्रुवारी, १९८९ रोजी प्रा. दत्ता म्हेतर यांनी सर्वांना अल्पोपहार दिला. प्रा. सुधीर जोशी यांनी फिशपॉड्स सादर केले.

या वर्षीच्या स्नेहसंमेलनातील प्रमुख पाहुणे प्रसिध्द कथाकार श्री. शंकर पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण पार पडले. त्यांच्या श्रवणसुलभ कथाकथनाने श्रोत्यांच्या मनात आनंदाचे व शैक्षणिक जाणीव जागृतीचे कारंजे निर्माण केले. मा. उपाध्यक्ष श्री कदम अण्णा स्नेहसंमेलनाच्या सर्वच उपक्रमांना जातीने हजर राहून शुभाशिर्वाद दिले.

प्रा. डॉ. डी. व्ही. तोगले यांच्या शिस्तप्रिय नेमक्या प्रेरक धाकाखाली यंदाचे स्नेहसंमेलन अल्पावधीच्या पूर्वतयारीनिशी अत्यंत खेळीमेळीत साजरे झाले. सर्व उपक्रमांची विभागणी वेगवेगळ्या समित्यांमध्ये करण्यात आली होती. यंदाचे विशेष म्हणजे हळदीकुंकू, कथाकथन, कविसंमलेन हे नवे उमक्रम. सर्व समित्यांच्या प्रभारी प्राध्यापकांनी अत्यंत कसोशीने, प्रामाणीकतेने व निष्ठेने आपापल्या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले होते, हे विशेष करून नमूद करावे लागेल. त्यांना उच्चाधिकार, समितीतील ज्येष्ठ वडीलधाऱ्या प्राध्यापकांचे अमोल मार्गदर्शन व प्रशासकीय बंधूना क्रियाशील सहभाग लाभला. सर्वांचाच स्नेह व सहकार्य म्हणून हे स्नेहसंमेलन सफल झाले. इथल्या विद्यार्थ्यांचा आगळावेगळा आज्ञाधारकपणा व गुणीपणा ठायीठायी जाणवत होता. सर्व सहकारी बंधू व विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पुनश्च आभार!

# सांस्कृतिक विभाग

आपल्या महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत शुक्रवार दि. ३० सप्टेंबर १९८८ रोजी एक भव्य कार्यक्रम आयोजित केला होता.

गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार, संभाजीराव माने ज्यु. कॉलेज नामफलक अनावरण, देणगीदारांचा सत्कार व विख्यात कादंबरीकार पद्मश्री रणजीत देसाई यांचे व्याख्यान असा संयुक्त कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या संयुक्त कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. खा. बाळासाहेब माने यांनी भुषविले. प्रा. भैरव कुंभार यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले यांनी प्रस्ताविक व अहवाल वाचला. त्यानंतर जिमखाना निवडणुकीत निवडून आलेल्या विद्यार्थांचा व गुणी विद्यार्थ्यांचा कोल्हापूर जिल्ह्याचे कलेक्टर मा. विश्वासराव धुमाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मा. कलेक्टरनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. या ऐतिहासिक समारंभामध्ये कोल्हापूरचे छत्रपती श्रीमंत शाहू महाराज यांच्या हस्ते ''संभाजीराव माने'' ,ज्यु. कॉलेजच्या नामफलकाचे अनावरण केले. श्रीमंत शाहू महाराजांनी आपल्या मनोगतामध्ये आमच्या महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचे कौतुक केले व महाविद्यालयास शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या नुतन वास्तूसाठी अनेक लोकांनी उदार हस्ते देणग्या दिल्या आहेत. त्यांचा प्रातिनिधीक स्वरूपाचा सत्कार गडहिंग्लजचे आ. मा. श्रीपतराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. देणगीदारांमध्ये संकेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन आ. बसगोंडा पाटील, व्हा. चेअरमन मा. बी. एन. पाटील, गडहिंग्लज अर्बन बँकेचे चेअरमन मा. रविंद्र आत्तरी, डॉ. एस. एम. पाटील व श्री. शिवाजीराव मोकाशी यांचा समावेश होता. संस्थेमार्फत व महाविद्यालयामार्फत या देणगीदारांचे मनपूर्वक आभार मानण्यात आले.

याच समारंभात स्वामीकार पद्मश्री मा. रणजीत देसाई यांचे 'मी व माझ्या कलाकृती' या विषयावर भाषण झाले. आपल्या कादंबरीतील व्यक्तिरेषा व प्रसंग यांचे विवेचन केले.

शेवटी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये खासदार मा. बाळासाहेब माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या भविष्यकालीन योजनांचा उल्लेख केला. रौप्यमहोत्सवी वर्षातील हे कॉलेज एका नव्या जगात प्रवेश करीत आहे. महाविद्यालयाच्या भविष्यकालातील योजना पूर्ण स्वरूपात येण्यासाठी सर्वांनी आवाहन केले.

या समारंभासाठी विशेष अतिथी म्हणून मा. शिवाजीराव खणगावे, मा. कृष्णा रामा पाटील, मा. आप्पासाहेब पाटील, मा. बलीराव देसाई, रावसाहेब कित्तूरकर इ. मान्यवर लोक उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रचंड संख्येने लोक उपस्थित राहून या महाविद्यालयावरचे प्रेम व्यक्त केले.

दि. ५।४।१९८९ रोजी बी. ए., बी. कॉम व बी. एस. सी. च्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रा. निरंजन खिचडी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**प्रा. एन. डी. खिचडी**

# प्रौढशिक्षण विभाग

आमच्या महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाकडून पाच प्रौढ शिक्षण केंद्रे मंजूर झाली. शिवाजी विद्यापीठामार्फत नेहमीप्रमाणे भरविण्यात येणाऱ्या संघटक प्रशिक्षण शिबिरामार्फत आमच्या संघटकांनी प्रशिक्षण पूर्ण केले.

याबरोबर या विभागामार्फतच ''कार्यात्मक साक्षरता सामुहिक कार्यक्रम'' हा कार्यक्रम राबविण्यास घेतलेला आहे. या अभिनव उपक्रमाच्या संदर्भात शिवाजी विद्यापीठामार्फत प्रा. सुर्यवंशी यांनी ''कार्यात्मक साक्षरता सामुहिक कार्यक्रमा''मधील विद्यार्थ्यांना उत्कृष्ठ मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील ७१ विद्यार्थ्यांनी स्वंयंस्फूर्तीने भाग घेतला. या विद्यार्थ्यांनी १३७ निरक्षर प्रौढ निवडलेले आहेत. या निरक्षरांना साक्षरता, जाणीवजागृती आणि कार्यात्मकता या गोष्टींचे ज्ञान देण्याचे कार्य आमचे विद्यार्थी उत्स्फूर्तपणे करीत आहेत.

शिवाजी विद्यापीठातील प्रौढ आणि निरंतर, शिक्षण व विस्तार कार्य विभागाचे प्रमुख प्रा. तावडे आणि त्यांचे सहकारी प्रा. डॉ. अनुराधा गुरव यांनी आमच्या विभागाला भेट देऊन मार्गदर्शन केले.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. जयंत सबनीस यांचे बहुमोल सहकार्य या विभागाला मिळते आहे.

**प्रा. पी. डी. सावंत**
विभाग प्रमुख

# प्लॅनिंग फोरम

चालू शैक्षणिक वर्षात आमच्या महाविद्यालयाच्या नियोजन मंडळासाठी चाळीस विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या नियोजन मंडळामार्फत वरिष्ठ महाविद्यालयासाठी एक निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि या स्पर्धेतून तीन क्रमांक काढण्यात आले.

नियोजन मंडळाच्या वतीने भारतीय पंचवार्षिक योजनाचे एक प्रदर्शन आयोजित केले होते. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन मा. उपप्राचार्य प्रा. बी. के. सोरटे आणि मा. प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. तसेच नियोजन मंडळाच्या विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी गडहिंग्लज तालुक्यातील अत्याळ या दत्तक खेड्याची निवड करण्यात आली. या दत्तक खेड्यात भारतीय नियोजनाच्या यशस्वितेखाली लोकांचा सहभाग मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. अत्याळ या खेड्याचा व त्या गावातील झोपडपट्टीचा आर्थिक, शैक्षणिक सामाजिक सर्वेक्षण हाती घेण्यात येणार आहे. वरील प्रदर्शनाचा कार्यक्रमदेखील आयोजित केला होता. अशाप्रकारे नियोजनासंबंधी विद्यार्थ्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली.

आपला

**नि. मं प्रमुख**

## एन. सी. सी.

आमच्या एन.सी.सी. युनिटमध्ये बावन्न विद्यार्थ्यांना एन.सी.सी. चे प्रशिक्षण देण्यात येते. नियमितपणे होणाऱ्या परेडस् व्यतिरिक्त या वर्षी कॉलिजच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यात्मक साक्षरता सामूहिक कार्यक्रमामध्ये दहा कॅडेटस्नी भाग घेतला व दहा प्रौढ साक्षर केले. कोल्हापूर येथील रक्तदान शिबिरात पाच कॅडेटस्नी रक्तदान केले. ॲन्यूअल रेंज क्लासीफिकेशन फायरिंग प्रॅक्टीससाठी कोल्हापूर येथे पाच कॅडेटस्नी सहभाग घेतला. ॲडव्हेंचर ट्रेनिंगमध्ये आंबोली येथे सायकलीने जावून येण्यात कॅडेटस्नी सहभाग घेतला. जयसिंगपूर येथील वार्षिक कॅंपमध्ये आमच्या युनिटने क्रॉस कंट्रीचे प्रथम शिल्ड, वैयक्तिक क्रॉस कंट्रीत प्रथम बायोनेट, फायटींगमध्ये दुसरा क्रमांक मिळविला. शिवाजी ट्रेल ट्रॅक कॅंप, पुणे येथे दोन कॅडेटस्नी कॉर्टर गार्डमध्ये विशेष प्राविण्य मिळविले. श्री. भोसले एस. टी. या कॅडेटने ''सी'' सर्टिफिकेट मिळविले आणि यावर्षी अकरा कॅडेटस ''बी'' सर्टिफिकेट परीक्षेत विशेष गुणवत्तेसह पास झाले.

या सर्व कार्यासाठी ५६, महाराष्ट्र बी ऑफीस एन.एन.सी.सी. कोल्हापूर स्टाफ व तेथील कमांडिग ऑफीसर ले. कर्नल प्रकाश मिठारी, अे. ओ. मेजर युनियाल, ग्रुप कमांडर कर्नल जाधव, कर्नल सीरौत, आमच्या कॉलेजचे कार्यालयीन अधिक्षक जयंत सबनीस व प्राचार्यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

**प्रा. आर. बी. तेली**
एन. सी. सी. केअरटेकर

## राष्ट्रीय सेवा योजना १९८८-८९

शिवराज महाविद्यालयातील एन. एस. एस. मार्फत १९८८-८९ या रौप्यमहोत्सवी वर्षात २५ हजार निलगिरीची झाडे लावण्यात आली. निलगिरीचे संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी सतत वर्षभर श्रमदान केले. स्वातंत्रदिन, गांधी जयंती, प्रजासत्ताक दिन, राष्ट्रीय युवक सप्ताह, एन.एस.एस.डे वगैरे दिवशी कार्यक्रम आयोजित केले. सामाजिक वनीकरण, सामाजिक अनिष्ट रूढी निर्मूलन याबाबत व्याख्याने आयोजित केली. राष्ट्रीय एकतेची शपथ एन.एस.एस. विद्यार्थ्यांनी घेतली. या सर्व कार्यक्रमात एन.एस.एस. अंतर्गत २०० विद्यार्थी सहभागी झाले. तसेच बटकणंगले ता. गडहिंग्लज या खेडे दत्तक गावात नियमित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी श्रमदान केले.

बटकणंगले या खेडे-दत्तक गावात एन. एस. एस. चे विशेष श्रम-संस्कार शिबीर आयोजित केले. या शिबिरात ५१ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. या शिबिरात व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने विविध विषयांवर व्याख्याने आयोजित केली. श्रमदानाने नवीन रस्ता तयार केला, हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित केला. शिबिरार्थिनी विविध गुणदर्शनाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे मनोरंजन केले. मनोरंजनातून सामाजिक अनिष्ट रूढी, परंपरा निर्मूलनाचा संदेश दिला.

एन. एस. एस. प्रमुख
**प्रा. डी. आर. खटके**

# संभाजीराव माने ज्युनिअर कॉलेज वार्षिक क्रीडा अहवाल

क्रीडा क्षेत्रात आमच्या खेळाडूंनी नेत्रदिपक नैपुण्य दाखविलेले असून ज्युनियर कॉलेजला अनेक क्रीडा स्पर्धेमध्ये सुयश मिळवून दिले. गडहिंग्लज तालुक्यामध्ये शासकीय हिवाळी क्रीडा स्पर्धेमध्ये तालुक्याची चॅम्पीयनशीप मिळवून कोल्हापूर जिल्ह्याची मुलांची जनरल चॅम्पीयनशीप मिळवून दिली. तसेच विभागीय महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या खेळाडूंनी नेत्रदीपक सुयश संपादन करून ज्युनियर कॉलेजची परंपरा जतन करून वृध्दिंगत केली.

१) **हॉकी:-** गडहिंग्लज येथे झालेल्या शालेय हिवाळी क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या ज्युनियर कॉलेजने सतत दोन वर्षे हॉकीमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला व जिल्हास्तरावर सिमीफायनलपर्यंत मजल मारली यामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंची नवि- १) श्री एस. आर. शिंदे कप्तान, २) श्री एस. आर. कुलकर्णी गोल-किपर, ३) श्री आय. डी. पतोड, ४) श्री पी. व्ही. खटावकर, ५) श्री बी. एस. चव्हाण, ६) श्री आर. ए. कसेकर, ७) श्री ए. ए. इंगळे, ८) श्री आर. वाय. मांडवलकर, ९) श्री एस. बी. पाटील, १०) श्री जे. जी. नगरे, ११) श्री जी. सी. देशपांडे, १२) श्री एल. एच. मनवाडकर, १३) श्री एस. जी. गाड्डीवडर, १४) श्री के. के. शिंदे, १५) श्री ए. बी. फडके.

२) **हँडबॉल:-** दि. ११ व १२ ऑगस्ट रोजी गडहिंग्लज येथे झालेल्या शासकीय पावसाळी क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या संभाजीराव माने ज्युनियर कॉलेजने सतत हँडबॉल स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमधील खेळाडू –

१) श्री एम. जे. ठिकारे (कप्तान), २) श्री आय. डी. पताडे, ३) श्री पी. व्ही. खटावकर, ४) श्री व्ही. एम. गवळी, ५) श्री आर. वाय. मांडवलकर, ६) श्री टी. आर. विचारे, ७) श्री बी. एस. चव्हाण, ८) श्री आर. के. पाटील, ९) श्री एस. बी. पाटील, १०) श्री आर. ए. कसेकर

३) **कबड्डी:-** गडहिंग्लज येथे झालेल्या शासकीय पावसाळी क्रीडा स्पर्धेमध्ये आमच्या संभाजीराव माने ज्युनियर कॉलेजने सतत दोन वर्षे द्वितीय क्रमांक संपादन केला. या स्पर्धेतील खेळाडू - १) श्री. कडूकर एस. बी., २) श्री. आर. के. पाटील, ३) श्री. ए. टी. पाटील, ४) श्री. जे. जी. देसाई, ५) श्री. एस. एम. धुरे, ६) श्री. ए. जी. पोवार, ७) श्री. बी. एस. चव्हाण, ८) श्री. एस. एच. आर्दाळकर, ९) श्री. एस. एम. शिंदे

**ॲथलेटिक्स:-** गडहिंग्लज येथे झालेल्या शासकीय हिवाळी ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये सर्वाधिक जास्त गुण मिळवून गडहिंग्लज तालुक्याची जनरल चॅम्पियनशीप पटकाविली व जिल्हास्तरामध्ये मुलांची जनरल चॅम्पियनशीप पटकाविली, रत्नागिरी येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत आमच्या खेळाडूंनी नेत्रदीपक यश संपादन केले. तसेच अमरावती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेसाठी सहा खेळाडूंची निवड झाली व आमचा धावपटू श्री. मारूती जोतीबा ठिकोर वैयक्तिक जनरल चॅम्पियनशीपचा मानकरी ठरला.

या स्पर्धेतील यशस्वी खेळाडू –

१) श्री. मारूती जोतीबा ठिकोर, १२ वी सायन्स

गडहिंग्लज तालुका पातळी

१) ८०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
२) १५०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
३) ५००० मीटर धावणे - प्रथम क्रमांक

कोल्हापूर जिल्हास्तर

१) ८०० मीटर धावणं प्रथम क्रमांक
२) १५०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
३) ५००० मीटर धावणे - प्रथम क्रमांक

विभागीय स्तर रत्नागिरी

८०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
२) १५०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
३) ५००० मीटर धावणे - प्रथम क्रमांक

महाराष्ट्र राज्य अमरावती

१) ८०० मीटर धावणे -द्वितीय क्रमांक
२) १५०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
३) ५००० मीटर धावणे - प्रथम क्रमांक

अमरावती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य शासकीय हिवाळी ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेमध्ये ज्युनियर गटामध्ये सर्वाधिक गुण संपादन करून वैयक्तिक जनरल चॅम्पियनशीप संपादन केली व कटक (ओरीसा) येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली तसेच इतर अनेक ठिकाणी ओपन रेसमध्ये भाग घेऊन अनेक रोख पारितोषिक संपादन करून संभाजीराव माने ज्युनियर कॉलेजचे नांव लौकिक केले.

२) श्री. आर. के. पाटील १२ वी सायन्स

तालुका पातळी

१) १०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
२) २०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक
३) ४०० मीटर धावणे - प्रथम क्रमांक

जिल्हास्तर

१) २०० मीटर धावणे - तृतीय क्रमांक

३) श्री. आय. डी. पताडे ११ वी आर्टस्

तालुका पातळी

१) १०० मीटर धावणे - द्वितीय क्रमांक

(४) श्री पी. व्ही. खटावकर १२ वी आर्टस्

तालुका पातळीवर

१) २०० मीटर धावणे - द्वितीय क्रमांक
२) ४०० मीटर धावणे - द्वितीय क्रमांक

(५) श्री. आर. ए. कसेकर ११ वी आर्टस् १७ वर्षाखालील

तालुका पातळीवर

१) ८०० मीटर धावणे - द्वितीय क्रमांक

कोल्हापूर जिल्हास्तर

१) ८०० मीटर धावणे - द्वितीय क्रमांक

विभागीय स्तर रत्नागिरी

१) ८०० मीटर धावणे - तृतीय क्रमांक

६) श्री. एस. जी. गाड्डीवडर ११ वी कॉमर्स

**गडहिंग्लज तालुका स्तर**

१) भालाफेक - द्वितीय क्रमांक

७) श्री. व्ही. टी. पाटील ११ वी आर्टस्

**गडहिंग्लज तालुका स्तर**

१) भालाफेक - तृतीय क्रमांक

८) श्री. डी. जी. पन्हाळकर १२ वी आर्टस्

**गडहिंग्लज तालुका स्तर**

१) ४८ किलो कुस्तीगट - प्रथम क्रमांक

९) श्री. एस. व्ही. सावंत ११ वी आर्टस्

**गडहिंग्लज तालुका स्तर**

१) तिहेरी उड्डी - द्वितीय क्रमांक

१०) श्री. जी. सी. देशपांडे, ११ वी कॉमर्स

**गडहिंग्लज तालुका स्तर**

१) १०० मीटर धावणे - तृतीय क्रमांक

२) लांब उड्डी - तृतीय क्रमांक

(११) श्री. एम. जे. ठिकोर, २) श्री. आय. डी. पताडे, ३) श्री. आर. के. पाटील, ४) श्री. पी. व्ही. खटावकर, ५) श्री. आर. एम. पोटे, ६) श्री. जी. पी. नार्वेकर या खेळाडूंनी ४×१०० मीटर धावणे रिले रेसमध्ये व ४×४०० मीटरमध्ये धावणे रिले रेसमध्ये गडहिंग्लज तालुका स्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हास्तर येथे ४×१०० मीटर धावणे रिलेमध्ये द्वितीय क्रमांक व ४×४०० मीटर धावणे रिलेमध्ये प्रथम क्रमांक व रत्नागिरी येथे झालेल्या विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये ४×४०० मीटर धावणे रिलेरेसमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला व अमरावती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स [illegible] क्रीडा स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली.

**वार्षिक स्नेहसंमेलन क्रीडा स्पर्धा**

(१) श्री. आर. के. पाटील १२ वी, आर्टस्

या विद्यार्थ्याने वार्षिक स्नेहसंमेलन क्रीडा स्पर्धेमध्ये सर्वाधिक गुण संपादन करून सन १९८८-८९ ची वैयक्तिक जनरल चॅम्पियनशीप मिळविले.

२) कु. ए. जी. कदम, १२ वी आर्टस्

या विद्यार्थिनीने मुलींच्या विभागामध्ये सर्वाधिक गुण संपादन करून ज्युनियर मुलींची वैयक्तिक जनरल चॅम्पियनशीप पटकाविली.

**श्री. प्रा. एस. एस. सावंत**
खेळ विभाग प्रमुख

## वसतीगृह १९८८-८९

वसतीगृह म्हणजे महाविद्यालयाचा आत्मा होय. वसतीगृहामध्ये राहून विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारचे ज्ञान घेता येते. वसतीगृह हे सहजीवनाचे एक साधन आहे. येथे राष्ट्रीयत्वाचा विकास करण्यास फारच मदत होते. परंतु हा आत्माच आमच्या महाविद्यालयात नाही याचे फारच मोठे दुःख होते. याची उणीव भासू नये म्हणून तुटपुंज्या जागेत व कमी भाड्यामध्ये मोजक्याच विद्यार्थ्यांची आम्ही राहण्याची व्यवस्था केलेली आहे. गवळी वाड्यात चार खोल्या आम्ही वसतीगृहासाठी घेतलेल्या आहेत. येथे आम्ही बारा विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था केलेली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला कॉट, टेबल, खुर्ची पुरवून आम्ही विद्यार्थ्यांची निटनेटकी राहण्याची व्यवस्था केलेली आहे. जागा अपुरी असल्यामुळे आम्ही जास्त विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करू शकलो नाही. चंदगडसारख्या लांबच्या विद्यार्थ्यांनाच वसतीगृहात प्रवेश दिलेला आहे. खूपच विद्यार्थी वसतीगृहात राहू इच्छितात. या सर्व विद्यार्थ्यांची अडचन लक्षात घेऊन अत्याधुनिक, स्वतंत्र सर्व सोयींनी युक्त अशा स्वतःच्या जागेत यू. जी. सी. ग्रॅण्डमधून स्वतःच्या मालकीची वसतीगृहासाठी इमारत बांधावी हीच सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इच्छा?

**(प्रा. नाळे ए. एस.)**
वसतीगृह प्रमुख

## पदव्युत्तर विभाग

शिवराज महाविद्यालयातील पदव्युत्तर विभाग हे एक आजरा, चंदगड व गडहिंग्लज या तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी एक वरदान आहे. या भागातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी, आमच्या पदव्युत्तर विभागाने, फार मोलाचे कार्य केले आहे. पूर्वी आमच्या महाविद्यालयातील, शिकवीत असलेल्या मराठी-हिंदी, अर्थशास्त्र-समाजशास्त्र या विषयांखेरीज इंग्रजी हा आणखी एक विषय पदव्युत्तर विभागात सुरू करण्यात आला. या वर्षी त्याचे द्वितीय वर्ष सुरू झाले. विद्यार्थ्यांनी या विभागालाही उत्कृष्ठ प्रतिसाद दिला आहे.

आमच्या समृध्द ग्रंथालयाचा फायदा या विभागातील विद्यार्थ्यांना उत्तम होत आहे. या वर्षी प्राध्यापकांचा संप संपल्यानंतर, विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून, प्राध्यापकांनी जादा तास घेवून आपला अभ्यास पूर्ण केला. पदव्युत्तर विभागाचे काम सुसूत्र व्हावे, या दृष्टीने, मा. प्राचार्य डॉ. तोगले यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळे या विभागाचे काम चांगल्याप्रकारे होवू शकले.

**प्रा. बलवंत देशमुख**
विभाग प्रमुख

# खेळ विभाग अहवाल

(सिनिअर विभाग)

मानवाला आपले आयुष्य सुखा-समाधानाने जगावे असे वाटत असेल तर त्यासाठी त्यांनी नियमितपणे खेळले पाहिजे. खेळामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो. सर्वांगीण विकासासाठीच सर्वजण खेळत असतात असे बरेच शरीरशास्त्र तज्ञ सांगतात. महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास म्हणजेच शारीरिक, मानसिक, बौध्दिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास होण्यासाठी म्हणून आम्ही सर्वांना खेळावयास शिकवीत असतो तो म्हणजे खिलाडीवृत्ती होय. एकदा जर का ही कृती माणसांच्या अंगात बाणली तर ती व्यक्ति जीवनामध्ये सर्वच बाबीकडे खिलाडीवृत्तीने पहात राहाते. याचा परीणाम म्हणजे खेळाडू व्यक्ति नेहमी आनंदी राहाते. खेळामुळे सुख दुःखाकडे सारख्याच नजरेने पाहाणे व स्वतः आनंदी राहून दुसऱ्याला आनंदी ठेवणे ही महत्त्वाची गोष्ट साध्य होते. त्याचप्रमाणे सांघिक वृत्ती व राष्ट्रीय एकात्मता चांगल्या प्रकारे जोपसली जाते. म्हणूनच आम्ही सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना नेहमी म्हणत असतो की, सर्वजण नेहमी खेळत राहा! खेळत राहा.

यावर्षी आमच्या महाविद्यालयाने कोल्हापूर जिल्हा आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत १) बुध्दिबळ, २) फुटबॉल, ३) कबड्डी, ४) हॉकी वगैरे सांघिक आणि मैदानी स्पर्धा व कुस्ती या वैयक्तिक स्पर्धेत भाग घेतला.

**बुद्धिबळः-** बुद्धिबळ स्पर्धेसाठी चौघांचा संघ जयसिंगपूर येथे खेळण्यासाठी पाठविला होता. प्रत्येकाने सहा गुणांपैकी कमी अधिक प्रमाण गुण मिळविले. श्री. पाटील ए. एस. या बि. एस. सी. २ विद्यार्थ्यांनि सर्वाधिक पांच गुण मिळविले.

**फुटबॉलः-** पहिला व दुसरा सामना जिंकून आमच्या महाविद्यालयाच्या संघाने तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. तिसऱ्या फेरीत कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर सारख्या बलाढ्य संघाबरोबर आमच्या संघाने चांगलीच झुंज दिली. आमच्या संघाचा कप्तान श्री. पाटील एस. ए. बी. ए. भाग-३ यांचा खेळ उत्कृष्ठ झाला.

**कबड्डीः-** आमच्या महाविद्यालयाचा मुलांचा कबड्डी संघ गडहिंग्लज, चंदगड, आजरा या भागात अजिंक्य म्हणून वावरत आहे. या आमच्या कबड्डी संघाने विभागीय स्पर्धेत उत्कृष्ठ खेळ करून सर्वांच्या डोळ्याचे पारणे फेडले. विशेषः आमच्या संघाचा कप्तान श्री पाटील टी. एम. बी. ए. भाग-२ याचा खेळ विभागीय स्पर्धेत फारच चांगला झाला. आतापर्यंत आमच्या या संघाने ओपन स्पर्धेत भाग घेऊन नंदगड जि. बेळगांव, तारळे ता. राधानगरी जि. कोल्हापूर, हिरलगे ता. गडहिंग्लज व हानिमनाळ ता. गडहिंग्लज येथील ढाली व रोख रक्कमेची बक्षीसे महाविद्यालयास यावर्षी मिळवून दिलेल्या आहेत.

मुलींच्या कबड्डी संघाचाही खेळ विभागीय स्पर्धेत फारच चांगला झाला. अनेक स्पर्धा जिंकत आमच्या मुलींच्या संघाने उपांत फेरीत प्रवेश केला. कु. हिरेमठ व्ही. आर., कु. केसरकर पी. बी., चव्हाण एस. टी. यांचा खेळ उत्कृष्ठ झाला.

**कुस्तीः-** कुस्तीमध्ये आमच्या भागामध्ये म्हणावी तशी प्रगती दिसत नाही. तरीपण यावर्षी चार कुस्तीगीरांनी विभागीय स्पर्धेत भाग घेतला होता. विभागीय स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाचा कुस्तीगीर श्री. शंकर कुरळे बी. ए. भाग-३ याने पांच कुस्त्या जिंकून चांगलीच वाहःवा मिळविली. तसेच गडहिंग्लज येथे तालीम संघाच्यावतीने घेण्यात आलेल्या बैठक मारण्याच्या स्पर्धेतही श्री. शंकर कुरळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. हा आमचा कुस्तीगीर भागातील छोटी मोठी मैदाने जिंकत आपला दबदबा निर्माण करीत आहे.

**हॉकीः-** आमच्या महाविद्यालयाच्या हॉकी संघाने विभागीय स्पर्धेत चांगलीच चमक दाखविली. कोल्हापूर विभागातील अनेक नामवंत संघाना हरवून आमच्या महाविद्यालयाच्या संघाने उपान्त फेरीपर्यंत मजल मारली. या वर्षीच्या विजेत्या संघाबरोबर आम्हास टॉयब्रेकरवर हार पत्करावी लागली. पुढील वर्षी निश्चितच आम्ही विभागीय व आंतर विभागीय हॉकी स्पर्धा जिंकू अशी उमेद बाळगून आमचे खेळाडू आहेत. विभागीय स्पर्धेत सर्वच खेळाडूंचा खेळ उत्कृष्ठ झाला. विशेष करून श्री. जाधव एस. एस. बी. कॉम भाग-१ व श्री. काळे एस. आर. (कप्तान) बी. एस. सी. ३, श्री. पताडे व्ही. डी. बी. एस. सी. ३ यांचा खेळ फारच चांगला झाला. तसेच श्री. नाईक टी. आर. बी. ए. भाग-३ याने गोल रक्षकांचे काम वाखाणण्यासारखे केले.

**ॲथलेटिक्सः-** शिवराज म्हटले की ॲथलेटिक्स गेले कित्येक वर्षे आम्ही ॲथलेटिक्स खेळाचे वर्चस्व कोल्हापूर विभागापुरते तरी अजिंक्य ठेवलेले आहे. पुन्हा एकदा यावर्षी आमचे वर्चस्व आम्ही सिध्द करून दाखविलेले आहे. विभागीय स्पर्धेतील यशस्वी खेळाडू –

१) श्री. चव्हाण ए. एस. बी. कॉम.
- १) ४०० मीटर धावणे - तिसरा क्रमांक
- २) ८०० मीटर धावणे - दुसरा क्रमांक
- ३) १५०० मीटर धावणे - तिसरा क्रमांक

२) श्री. चौगुले ए. एम. बी. ए.-३
- १) ४०० मीटर हर्डल्स - तिसरा क्रमांक
- २) उंच-उडी - तिसरा क्रमांक

३) श्री. जाधव पी. बी. बी. ए.-१
- १) लांबउडी - तिसरा क्रमांक

४) श्री. जाधव पी. बी. बी. ए.-१
- १) थाळी फेक - दुसरा क्रमांक
- २) गोळा फेक - तिसरा क्रमांक

५) श्री. म्हेत्री के. के. बी. ए.-२
- १) बांबू उडी - दुसरा क्रमांक

६) ४×४०० मीटर रिले (मुले) पहिला क्रमांक

१) श्री. चव्हाण ए. एस., २) श्री. भोसले बी. बी., ३) श्री म्हेत्री के. के., ४) श्री. खोत आर. जी, ५) श्री चौगुले ए. एम.

७) ४×१०० मीटर रिले (मुले) दुसरा क्रमांक

१)श्री. जाधव पी. बी., २) श्री. नाईक एस. आर. ३) श्री. पाटील टी. एम., ४) श्री. चौगुले ए. एम., ५) श्री. पतोंडे डी. एन.

८) कु. हिरेमठ व्ही. बी. एस.सी.-३
- १) १०० मीटर हर्डल्स - दुसरा क्रमांक
- २) ४०० मीटर हर्डल्स - तिसरा क्रमांक

९)कु. कदम आर. एम. बी. एस सी. -३
१) उंच-उडी प्रथम क्रमांक
१०) ४×४०० मी. रिले मुली
१) कु. पोवार एस. बी., २) कु. शिंदे एन. बी., ३) कु. शिंदे व्ही. एच, ४) कु. हिरेमठ व्ही. आर, ५) कु. कदम आर. एम.

**आंतर विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धा सोलापूर**

१) कु. हिरेमठ व्ही. आर.
१) १०० मीटर्स हर्डल्स् - दुसरा क्रमांक
२) कु. कदम आर. एम.
१) उंच-उडी - तिसरा क्रमांक

आमच्या महाविद्यालयाच्या रिले मुली व मुलांच्या संघानी अंतिम फेरीत प्रवेश केला होता. त्याचप्रमाणे वैयक्तिक मुलांच्या स्पर्धेत बहुतेक सर्वांनी अंतिम फेरी गाठली.

आता सर्व खेळांतील खेळांडूचे लक्ष आहे. (१९८९-९०) पुढील वर्षी शिवराजच्या मैदानावर होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेमध्ये पाहूया आपण पुढच्या वर्षी आपल्या स्वतःच्या मैदानावर काय पराक्रम करतो आहोत? सन १९८९-९० या सालाकरिता कोल्हापूर जिल्ह्याचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाने शिवराज महाविद्यालयास बहाल केलेले आहे. आम्ही हे यजमान पद अगदी आनंदाने स्वीकारीले आहे.

**(स्नेह सम्मेलन) वार्षिक क्रीडा स्पर्धा १९८८-८९**

या वर्षीच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा दि. ७-२-८९ ते १६-२-८९ या कालावधीमध्ये व्यवस्थितरित्या पार पाडल्या. दि. ७-२-८९ रोजी सकाळी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगलेसाहेब व यू. आर. श्री. जाधव यांचे हस्ते झाले. यावर्षी या क्रीडा स्पर्धेसाठी कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, टे-टे, बुद्धिबळ व ॲथलेटिक्स हे खेळ ठेवलेले होते.

## वार्षिक क्रीडा स्पर्धेतील खेळांचा अंतीम निकाल खालीलप्रमाणे

| अ.नं. | खेळ | यश | वर्ग |
|---|---|---|---|
| १) | क्रिकेट- | विजेता | बी. एस. सी. भाग-२ |
| | | उपविजेता | बी. कॉम. भाग-१ |
| २) | कबड्डी- | विजेता | बी. ए. भाग-२ |
| | | उपविजेता | बारावी आर्टस् |
| ३) | व्हॉलीबॉल | विजेता | बी. ए. भाग-३ |
| | | उपविजेता | बी. ए. भाग-१ |
| ४) | टेबल-टेनिस- | विजेता | बी. एस. सी. भाग-३ |
| | (डबल) | उपविजेता | बी. कॉम. भाग-३ |
| ५) | बुद्धिबळ- | विजेता | बी. एस. सी. भाग-३ |
| | | उपविजेता | बी. एस. सी. भाग-२ |

६) वैयक्तिक चॅम्पीयन (सिनीयर) मुले
श्री चव्हाण ए. एस. बी. कॉम
७)वैयक्तिक चॅम्पियन (सिनीयर) मुली
कु. पोवार एस. बी. बी. ए. भाग-२
८) वैयक्तिक चॅम्पियन (ज्युनियर) मुले
श्री. पाटील आर. के. बारावी आर्टस्
९)वैयक्तिक चॅम्पियन (ज्युनियर) मुली
कु. कदम जी. बारावी आर्टस्

**(प्रा. नाळे ए. एस.)**

# ग्रंथालय वार्षिक अहवाल १९८८-८९

ग्रंथालयाचा दर्जा हा त्या ग्रंथालयाकडे असणाऱ्या दर्जेदार ग्रंथसंपदेवर ठरत असतो. आमच्या ग्रंथालयात उत्तम, दर्जेदार आणि दूर्मिळ असे ग्रंथ आहेत. नियत कालिके आहेत.

उत्तम, दर्जेदार ग्रंथ आहेत, चोखंदळ असा विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी वाचक वर्ग आहे. वाचकांचा आणि ग्रंथाचा समेट घडवून आणणारा सेवाभावी ग्रंथालयीन सेवक वर्ग आहे. परंतू ग्रंथालयासाठी स्वतंत्र अशी हवी तशी इमारत आज उपलब्ध नाही. याचे भान संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार बाळासाहेब माने, संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले यांना आहेच म्हणून या वर्षी संस्थेने विद्यापीठ अनुदान मंडळाच्या अनुदानात आपला शेअर घालून चार लाख रुपये किंमतीची ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचा संकल्प केलेला असून त्याच्या कार्यवाहीसही सुरूवात केलेली आहे. येत्या वर्षभरात इमारत पूर्णत्वास जाईल यात संदेह नाही.

प्राचार्य डॉ. डी. व्ही. तोगले, प्रा. विठ्ठल बन्ने, कार्याध्यक्ष ग्रंथालय समिती व समितीचे इतर सदस्य यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांच्या वाचनाची, ग्रंथाची, नियतकालिकांची आवड, निवड व निकड भागवली जाते. स्पर्धात्मक परीक्षेस बसणारे, प्रथम वर्ग मिळवणारे विद्यार्थी व आर्थिकदृष्ट्या कमकूवत असणारे विद्यार्थी यांना विशेष सवलती दिल्या जातात.

पुस्तक पेढीतून हे पुस्तकसंच वर्षभरासाठी दिले जातात. अभ्यासाची सोय व्हावी म्हणून अभ्यासिका सकाळी ८-३० ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवलेली असते.

## दृष्टीक्षेपात ग्रंथालय

| | |
|---|---|
| एकूण ग्रंथ संख्या | ३५,००० |
| | एकूण किमंत रु. ६,००,०००=०० |
| नियतकालिके | ६५ |
| | वार्षिक वर्गणी रु. ८०००=०० |
| पुस्तक देवघेव वेळ | सकाळी ८-३० ते १२-३० |
| | दूपारी ४ ते ६ |
| अभ्यासिका वेळ | सकाळी ८-३० ते रात्री १२ पर्यंत |
| | रविवार सुट्टीचा दिवस |

**- श्री. टी. ए. पाटील**
ग्रंथपाल



A UNIQUE GAUVA OF
WEIGHT 750 GRAMS
**BY Mr. GURAV** S.Y.B.Com.


Form No IV (Rule No 3)

| | | |
|---|---|---|
| Place of Publication | — | Shivraj College, Gadhinglaj |
| Periodicity of Publication | — | Annual |
| Printers Name | — | Elegant Offset Printers, Belgaum |
| Nationality | — | Indian |
| Editor's Name | — | Prof. Sudhir C. Joshi |
| Nationality | — | Indian |
| Address | — | Shivraj College, Gadhinglaj |

I, Principal Dr. D.V. Togale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dr. D.V. Togale.

22-4-89

Signature

# विद्यार्थी नेतृत्व

विद्यापीठ प्रतिनिधी



सुधीर जाधव
एम.ए.१

ज्युनिअर जी.एस



आनंद शिंदे
११वी कला.

विद्यार्थिनी प्रतिनिधी



ज्योती खानवीलकर
बि.ए.३

विद्यार्थिनी प्रतिनिधी



निर्मल खणगावे
एम.ए.१

विद्यार्थिनी प्रतिनिधी



कदम.ए.जी
१२वी कला.



पोवार एस.एम.
एम.ए.२



ताडे बी.एम.
बि.ए.३

विद्यार्थ्यांची प्रतिनिधी



इनामदार एस.एस.



जॉन्सन डिसोझा
बी.एस्सी.३



सुभाष पावले
बि.ए.३



सागर पाटील
बि.कॉम ३

# ज्युनियर कॉलेज नामकरण समारंभ



नूतन इमारतः वास्तुशांती



स्वामीकारांचे हृद्‌गत




ज्युनि. कॉलेज नामकरण समारंभः मान्यवरांची उपस्थिती

शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स अॅन्ड डी.एस्.कदम सायन्स कॉलेज, संभाजीराव माने ज्युनि. कॉलेज.

